म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १०४०
१९०६
REFBK-0000543
REFBK-0000543

म. ग्रं. सं. ठाणे
य [illegible]
नं. २०५०
९-११९०७

# [तु]कारामाचे निवडक अभंग.

( चरित्र, वेंचे, स्पष्टीकरण व कोश यांसह )

लेखक

यादव भास्कर वाघीकर

तोडिलें भांडार धन्याचाची माल ।
मी तंव हमाल भार वाही — तुकाराम

श्रीयुत गोविंद भास्कर वाघीकर यांनी

प्रकाश स्टीम प्रेस मध्ये छापून प्रसिद्ध केलें.

[illegible] आणे.

[illegible]anesh B[illegible] [illegible]kanu

[illegible] 923

मुलामुलींना पाठ करण्याकरितां

( उत्तमोत्तम व अत्यंत बोधपर )

# तुकारामाचे निवडक अभंग.

( चरित्र, वेंचे, स्पष्टीकरण व कोश यांसह )

लेखक

यादव शंकर वावीकर

फोडिलें भांडार धन्याचाची माल ।
मी तंव हमाल भार वाही — तुकाराम.

श्रीयुत गोविंद शंकर वावीकर यांनीं
मुंबई इंदुप्रकाश स्टीम प्रेस मध्यें छापून प्रसिद्ध केलें.

सन १९०९.

किंमत पांच आणे.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर
करून सर्व हक्क स्वाधीन ठेविलें आहेत.

REFBK-0000543

REFBK-0000543



धरिल्या देहाचें सार्थक करीन । आनंदें भरीन तिन्ही लोक ॥ १ ॥
लावीन निशाण जावया वैकुंठा । माजवीन पेठा कीर्तनाच्या ॥ २ ॥
नामाचिया नौका करीन सहस्रवरि । नावाडी श्रीहरि पांडुरंग ॥ ३ ॥
भाविक हो येथें धरा रे आवांका । ह्मणे दास तुका शुद्धयाती ॥ ४ ॥

## श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड.



### अर्पण पत्रिका.

सत्ता, वैभव, मान, राजपदवी, तूतें सदा वंदिती ।
विद्या, ज्ञान, सुधारणा, बुधकृती तूं आदरीसी अती ।
देशोद्धाररता ! उदार चरिता ! हे गुर्जराधीपते !
स्वीकारीं मम ही कृती जरी असे ती अल्पशी धीमते !

**ग्रंथकर्ता.**

# प्रस्तावना.

तुकाराम महाराजांचे अभंग किती हृदयं म व बोधपर आहेत, हें सर्वांना माहीत आहेच. विविध कवींचे उतारे घेऊन त्यांत तुकारामाच्या अभंगांचे थोडे उतारे घेतलेलीं अशीं मुलांकरितां कांहीं पुस्तकें आहेत. गाथेंतून बोधपर व उत्तम अभंग निवडून काढून त्यांची विषयवार मांडणी ज्यांत केली आहे, असें हेंच पुस्तक आहे. आपण मुलांमुलींकरितां हें पुस्तक तयार करीत आहों, ही कल्पना पुढें ठेवून अभंग निवडण्याचें, ते प्रतवार लावण्याचें, टीपा, स्पष्टीकरण व कोश देण्याचें काम केलें आहे. सारांश, ही तुकाराम बुवांची 'बालगाथा'च होय. या दिशेनें हा पहिलाच प्रयत्न आहे. यांत अश्लील शब्द होतां होईल तों टाळले आहेत. दोन तीन ठिकाणीं अश्लील शब्द गाळून साधे शब्द घातले आहेत. ह्या पुस्तकापासून काव्याचा अभ्यास होऊन शिवाय नैतिक व धार्मिक शिक्षणाचाही सहज लाभ होणार आहे. कुटुंबांतील वडील माणसांनीं किंवा शिक्षकांनीं मुलांमुलींना एक एक अभंगाचा अर्थ स्पष्ट करून सांगावा आणि तो त्यांच्याकडून नेमानें पाठ करून घ्यावा. याप्रमाणें हळूं हळूं अभ्यास होऊन दोन तीन वर्षांत जरी हें पुस्तक पुरें झालें तरी बस्स आहे. अभंग जितके सावकाश व वारंवार वाचले जातील, जितके ते मनांत खोल बिंवतील, तितका त्यांचा मनावर अधिक सुपरिणाम होईल. एकदां अभंगांचें रहस्य मनांत बिंबलें कीं, त्यांच्या भावी चरित्रास उत्तम वळण लागल्याखेरीज राहाणार नाहीं.

गृहशिक्षणांत या पुस्तकाचा अवश्य उपयोग व्हावा. त्याच प्रमाणें खाजगी शाळांतून नीति शिक्षणाकरितां किंवा धर्म शिक्षणाकरितां हें पुस्तक लावावें. सरकारी शाळांतून या पुस्तकाचा प्रवेश झाल्यास ती गोष्ट सर्वांसच रुचणार आहे. कवि ह्या नात्यानें तुकारामाची योग्यता कमी कोण ह्मणेल ? त्याचे विचार सर्व धर्मांच्या लोकांना रुचतील असे उदात्त व व्यापक आहेत. मुलांमुलींना धर्म शिक्षण मिळत नाहीं, ही ओरड फार जुनी आहे. बरें, कोणतीं पुस्तकें धर्म शिक्षणाकरितां पसंत करावीं, हाही वादग्रस्त प्रश्न आहे. परंतु तुकारामाचे अभंग असे आहेत कीं, ते भिन्न मतांच्या लोकांना सुद्धां पसंत होतील.

# प्रस्तावना.

तुकाराम महाराजांचे अभंग किती हृदयंगम व बोधपर आहेत, हें सर्वांना माहीत आहेच. विविध कवींचे उतारे घेऊन त्यांत तुकारामाच्या अभंगांचे थोडे उतारे घेतलेलीं अशीं मुलांकरितां कांहीं पुस्तकें आहेत. गाथेंतून बोधपर व उत्तम अभंग निवडून काढून त्यांची विषयवार मांडणी ज्यांत केली आहे, असें हेंच पुस्तक आहे. आपण मुलांमुलींकरितां हें पुस्तक तयार करीत आहों, ही कल्पना पुढें ठेवून अभंग निवडण्याचें, ते प्रतवार लावण्याचें, टीपा, स्पष्टीकरण व कोश देण्याचें काम केलें आहे. सारांश, ही तुकाराम बुवांची '**बालगाथा**'च होय. या दिशेनें हा पहिलाच प्रयत्न आहे. यांत अश्लील शब्द होतां होईल तों टाळले आहेत. दोन तीन ठिकाणीं अश्लील शब्द गाळून साधे शब्द घातले आहेत.* ह्या पुस्तकापासून काव्याचा अभ्यास होऊन शिवाय नैतिक व धार्मिक शिक्षणाचाही सहज लाभ होणार आहे. कुटुंबांतील वडील माणसांनीं किंवा शिक्षकांनीं मुलांमुलींना एक एक अभंगाचा अर्थ स्पष्ट करून सांगावा आणि तो त्यांच्याकडून नेमानें पाठ करून घ्यावा. याप्रमाणें हळूं हळूं अभ्यास होऊन दोन तीन वर्षांत जरी हें पुस्तक पुरें झालें तरी बस्स आहे. अभंग जितके सावकाश व वारंवार वाचले जातील, जितके ते मनांत खोल बिंबतील, तितका त्यांचा मनावर अधिक सुपरिणाम होईल. एकदां अभंगांचें रहस्य मनांत बिंबलें कीं, त्यांच्या भावी चरित्रास उत्तम वळण लागल्याखेरीज राहाणार नाहीं.

गृहशिक्षणांत या पुस्तकाचा अवश्य उपयोग व्हावा. त्याच प्रमाणें खाजगी शाळांतून नीति शिक्षणाकरितां किंवा धर्म शिक्षणाकरितां हें पुस्तक लावावें. सरकारी शाळांतून या पुस्तकाचा प्रवेश झाल्यास ती गोष्ट सर्वांसच रुचणार आहे. कवि ह्या नात्यानें तुकारामाची योग्यता कमी कोण म्हणेल ? त्याचे विचार सर्व धर्मांच्या लोकांना रुचतील असे उदात्त व व्यापक आहेत. मुलांमुलींना धर्म शिक्षण मिळत नाहीं, ही ओरड फार जुनी आहे. बरें, कोणतीं पुस्तकें धर्म शिक्षणाकरितां पसंत करावीं, हाही वादग्रस्त प्रश्न आहे. परंतु तुकारामाचे अभंग असे आहेत कीं, ते भिन्न मतांच्या लोकांना सुद्धां पसंत होतील.

ह्यांतील पाठ दोन तीन प्रतींवरून ताडून पाहून इंदुप्रकाश प्रेस मध्यें छापलेल्या मूळ प्रती प्रमाणें बहुत करून ठेविले आहेत. पाठभेद टिपांमध्यें कौंसांत दिले आहेत. फर्ग्युसन कॉलेजांतील प्रो. वा. ब. पटवर्धन, तुकाराम सोसायटीचे चिटणिस यांनीं कठीण अभंगांचे अर्थ सांगण्याच्या कामीं ग्रंथकारास जी मदत केली, ती बद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार ऋणी आहे.

मुंबई ता. १५–७–०९ ग्रंथकर्ता.

---

## अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ मातृप्रेम ... ... | १ | २१ आत्मस्थिति... ... | २३ |
| २ आईबापांची योग्यता | २ | २२ बोलणें व आचरण ... | २४ |
| ३ गुरु ... ... ... | २ | २३ भूतांच्या ठायीं ईश्वर | २६ |
| ४ अभ्यास ... ... | २ | २४ संत अथवा सज्जन ... | २७ |
| ५ प्रेम ... ... ... | ३ | २५ दुर्जन ... ... | ३१ |
| ६ नम्रता ... ... | ३ | २६ ढोंगी लोक ... ... | ३८ |
| ७ दया ... ... ... | ५ | २७ दृष्टांतपर ... ... | ४० |
| ८ क्षमा ... ... | ६ | २८ बोधपर ... ... | ४३ |
| ९ शांति ... ... | ६ | २९ उपदेशपर ... ... | ४६ |
| १० गर्व ... ... ... | ७ | ३० श्रद्धा... ... ... | ५९ |
| ११ वैर ... ... ... | ७ | ३१ देवाच्याठायीं विश्वास | ६० |
| १२ लाज ... ... | ८ | ३२ भक्ति ... ... | ६४ |
| १३ पोट ... ... | ९ | ३३ ज्ञान व भक्ति ... | ६८ |
| १४ शरीर ... ... | ९ | ३४ करुणापर ... ... | ७० |
| १५ आशा ... ... | ११ | ३५ अनन्य भक्ति ... | ७९ |
| १६ नीति ... ... | १३ | ३६ स्वतां विषयीं ... | ८१ |
| १७ संगति ... ... | १७ | वेंचे ... ... ... | ८४ |
| १८ एकान्त ... ... | १८ | विशेष स्पष्टीकरण ... | ८९ |
| १९ मन ... ... ... | १८ | कठिण शब्दांचा कोश | ९७ |
| २० चित्तशुद्धि ... ... | २१ | | |

पु. क्र. नं. १२१७

# तुकाराम महाराजांचें संक्षिप्त चरित्र

(**कुलवृत्त**) पुण्यापासून आठ कोसांवर इंद्रायणी नदीच्या तिरीं **देहू** गांव आहे. त्या गांवीं तुकारामाचे पूर्वज राहत असत. पंढरीची वारी व नित्य भजन हा त्यांचा परंपरागत कुलाचारच. यांचे पूर्वज सातवे पुरुष **विश्वंभर** बुवा हे पांडुरंगाचे येवढे निःसिम भक्त होते कीं, ते दर एकादशीस पंढरीची वारी करीत असत. पुढें त्यांना साक्षात्कार होऊन त्यांनी देहूस श्री पांडुरंगाचें देवालय बांधलें. तुकारामाचे वडील **बोल्होबा** हे किराणा विक्रीचा धंदा करीत. पंढरीची वारी व नित्य भजन हा त्यांचा क्रम अबाधित चालू होता. तुकारामाची आई **कनकाई** ही महान् साध्वी स्त्री असून नवऱ्याप्रमाणें परम भगवद्भक्त होती. त्यांना पुष्कळ वर्षे संतती न झाल्यामुळें तीं उभयतां उद्विग्न असत. ईश्वरकृपेनें पुढें त्यांना **सावजी, तुकाराम** आणि **कान्होबा** असे तीन मुलगे झाले.

(**बालपण**) तुकारामांच्या जन्म तिथीचा नक्की शोध लागत नाहीं. तरी त्यांचा जन्म शके १५३०–३१ (सन १६०८–०९) सालीं झाला असावा, असें अनुमान आहे. त्यांच्या बालपणाचीही विशेष हकिगत उपलब्ध नाहीं. तरी पण उनाड, खेळाडू आई-बापांचें न ऐकतां स्वैर वागणारा असा तुकाराम खास नव्हता. 'मुळीं बाप होता ज्ञानी । तरी आम्हीं लागलों ध्यानीं' असें त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. त्यावरून बालवयांत बापाबरोबर भजन करण्याचा यांना सहवास असून ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ इत्यादि कवींच्या कांहीं कविता यांना मुखोद्गत झाल्या होत्या. बालपणापासूनच यांना भक्तीचें बाळकडू मिळालें होतें. यांच्यापुढें यांच्या आईबापांचा अनुकरणीय कित्ता होता. **सावजी** हा उदासीन वृत्तीचा असून संसारांत तो फारसें लक्ष घालीत नसे. **तुकाराम** संसारांतील कामें मोठ्या उत्सुकतेनें व दक्षतेनें करूं लागल्यामुळें **बोल्होबास** तो फार आवडूं लागला.

**( संसार )** तुकाराम मोठ्या सचोटीनें आपला धंदा करूं लागला त्याच्या अंगीं लीनता व परोपकार बुद्धि हे गुण विशेष होते. त्याचें वर्तन शुद्ध व बोलण्यांत खरेपणा असल्यामुळें तो विशेष मान्यता पावला. त्याची गिऱ्हाइकी वाढली. त्याच्या पहिल्या बायकोचें नांव **रुखमाई.** तिला दम्याची व्यथा असल्यामुळें बोल्हो-बानें तुकारामाचें दुसरें लग्न पुण्यांतील सावकार आप्पाजी गुळवे ह्याच्या मुलीशीं केलें. तिचें नांव **जिजाबाई.** याप्रमाणें तुकाराम संसार करूं लागल्यावर त्याच्या वयाच्या १७ व्या वर्षी त्याच्या आईबापांचा काळ झाला. या दुःखाची तुकारामास विस्मृति पडते न पडते तोंच, त्याचा वडील भाऊ **सावजी** ह्याची बायको निवर्तली आणि तो गोसावी बनून तीर्थयात्रेस निघून गेला. यामुळें तुकारामाचें मन अगदीं खिन्न झालें. घरीं कुटुंब मोठें असून सर्व भार त्याजवर पडला. कोणाचाच आधार राहिला नाहीं.

**( उपरति )** याप्रमाणें तुकाराम विवंचनेंत पडला असतांना भयंकर दुष्काळ पडला. धारण शेराची झाली. ढोरें मेलीं. व्यापार बसला. लोकांकडे थकलेले पैसे वसूल होईनात. अशा हालाखींत तो असतांना त्याची पहिली बायको अन्नान करून मेली. तिचा एकुलता एक व तुकारामाचा आवडता मुलगा **संताजी** हाही अन्नावांचून मरण पावला. **जिजाबाई** ही तापट स्वभावाची स्त्री असल्यामुळें तिचे वाक्प्रहार वारंवार होऊं लागले. तिच्या कित्येक कठोर भाषणांचा उल्लेख तुकारामानें आपल्या अभंगांत केला आहे. यामुळें भजन पूजनाकडे विशेष लक्ष लागून संसारतापांत पोळलेलें त्याचें मन तिकडेच विशेष रमूं लागलें. त्याला विरक्ति उत्पन्न झाली. या झूट पसाऱ्यांत आपणास सौख्य मिळणें नाहीं, अशी त्यांची खात्री झाली. पूर्वीप्रमाणें मन घालून तो व्यवसाय करीनासा झाला. यामुळें आंत बट्याचा व्यापार होऊं लागला.

**( परोपकारवृत्ति )** नित्य भजन व संसारांत उदासीन वृत्ति यांना परोपकार वृत्तीची विशेष भर मिळाली. परोपकार हा तुका

रामाचा पहिला धंदा होय. कोणी आजारी असल्यास त्याची सुश्रुषा करावी, कोणास कांहीं लागल्यास आणून द्यावें. कोणा प्रवाशास स्नानास ऊन पाणी तर कोणाचे पाय चेंपणें. कोणाचें ओझें नेणें तर कोणाचें आडलें काम करणें. कथा--कीर्तनांत दिवे लावणें, बसणें घालणें, धृपद धरणें हीं कामें तो करी. हें काम हलकें आहे, तें काम आपल्या योग्यतेचें नाहीं, लोक आपणास हांसतील, आपली निंदा करतील, ह्याचा विचारच त्यानें सोडून दिला होता. ही परोपकारवृत्ति इतकी वाढली कीं, घरांत पोटास मिळण्याची भ्रांत असतांना त्यानें भिक्षेकऱ्यांस दाणे घालावे. उघड्यांना अंगावरचीं किंवा घरांतील वस्त्रें द्यावीं. गयावया करून कोणीं कांहीं जिन्नस उधार मागितला तर त्याला तो मिळावयाचाच. पैसे कमी दिले तरी हरकत नाहीं. न दिले तरी मागणें नाहीं. माझ्या मुलांमुलींचीं लग्नें व्हावयाचीं आहेत, असें कोणीं सांगितलें कीं, स्वारीनें विक्रीचे किंवा भांडवलांतून पैसे दिलेच. स्वतःचें भांडवल घालवून तुकाराम फार हालाखींत आला असतांना **जिजाबाईनें** दोनशें रुपये कर्ज काढून पतीला व्यापारास भांडवल दिलें. ते मीठ घेऊन देशावर गेले. लहर लागली ह्मणजे भजन व लहर लागेल तेथें मुक्काम. यामुळें बरोबरची मंडळी ह्यांना कंटाळली. या व्यापारांत त्यांना सुदैवानें दोन पैसे मिळाले. परंतु घरीं येत असतांना शिपायांच्या ताब्यांत असलेला कोणी कैदी त्यांना वाटेंत भेटला. तो ह्मणाला 'कर्जामुळें मी कैदेंत पडलों असून माझी शेतवाडी जप्त केली आहे. माझीं मुलेंबाळें मरत आहेत. कृपा करून मला सोडवा.' झालें. तुकारामानें सर्व पैसे त्याला देऊन टाकले. घरीं आल्यावर **जिजाबाईनें** यथेच्छ वाक्ताडण केलें! घरची ही स्थिति. लोकांनीं तर त्याला मूर्खांतच काढलें. नीच लोक त्याची वाटेल तशी विटंबना करूं लागले. पैसा मिळवितां येत नाहीं, ह्मणून हें भक्तीचे ढोंग करतो, असें ह्मणूं लागले. पैसा मिळविनासा झाल्यामुळें घरच्या मंडळीसही तो आवडेनासा झाला.

(**पूर्वतयारी**) याप्रमाणें चोहोंकडून मारा चालू असतांना तुकोबाची मनोवृत्ति बालरवीप्रमाणें आपलें तेज प्रकाशित करूं लागली. या काळोखमय मेघराशींतून चिरंतन प्रकाशणारें रविबिंब बाहेर पडून त्याचा प्रकाश भूमंडळावर पडावयाचा होता. आपलें जीवित कर्तव्य करण्याचा **तुकारामा**चा निश्चय ठरला होता. संसारांत निमग्न होऊन कर्तव्य विसरणारा तो नव्हता. लोकप्रवादास भीक घालून त्यांच्या छंदाप्रमाणें वागण्याइतका तो मूर्ख राहिला नव्हता. त्याच्या भावी उन्नतीची तयारी या विपरीत स्थितींत चालू होती. एके दिवशीं बायकोच्या त्रासास कंटाळून देहूपासून दोन कोसांवर **भांवनाथ** नामक डोंगर आहे तेथें जाऊन तो एकांतांत ईश्वरचिंतन करीत बसला. इकडे घरच्या मंडळीनें शोध चालविला. चार दिवसांनीं कान्होबाची व त्याची भेट झाली. त्यांनीं संसार करण्याचें साफ नाकारलें. कान्होबास अर्धीं खतपत्रें देऊन आपल्या वाट्याची अर्धीं त्यांनीं इंद्रायणींत बुडवून टाकिलीं.

(**ईश्वरीसंदेश**) त्यांना ज्ञानदेव नामदेव एकनाथ, कबीर ह्यांचे कांहीं अभंग, पदें, दोहोरे वगैरे पाठ येत होतेंच. शिवाय त्यांनीं अनेक ग्रंथ वाचून पाठांतर चालविलें. पौराणिक ग्रंथांची माहिती करून घेतली. हरदासाच्या मागें उभे राहून ध्रुपद धरावें व कीर्तनाचा अभ्यास चालवावा. देहू जवळ **भंडारा** नामक जो डोंगर आहे, तेथें जाऊन एकान्तांत त्यांनीं ग्रंथ पठण व मनन करावें. ह्याप्रमाणें अभ्यास चालू असतांना त्यांना नामदेवाचे राहिलेले अभंग पूर्ण करण्याविषयीं दृष्टांत झाला. एक दिवस पहाटेस त्यांना स्वप्न पडलें कीं, आपण गंगा स्नानास जात असतांना कोणी **केशवचैतन्य राघवचैतन्य** या सत्वशील ब्राह्मणास आपण नमस्कार केल्यावर त्यांनीं **रामकृष्णहरि** हा गुरुमंत्र दिला. भोजनास पावशेर तूप मागितलें. परंतु जिजाबाईनें दुरुत्तरें केल्यामुळें ब्राह्मण विन्मुख परत गेला. हाच त्यांचा गुरूपदेश.

(**कविता**) प्रथम त्यांनीं बाळक्रीडेचे अभंग केले. गौळणी, काला, खेळांवरील रूपकें, चरित्रात्मक अभंग हीं केलीं. पौराणिक

आख्यानें ऐकून ते कीर्तन करूं लागले. पुढें त्यांची कवित्व शक्ति इतकी वाढली कीं, ते कीर्तनांत सहज अभंग करून सांगत असत. त्यांचें बोलणें सुद्धां अभंगमय झालें होतें. त्यांची कविता खोल, हृदयंगम व प्रासादिक आहे. एक दोन ओळी वाचतांच मनांत अर्थ उतरतो व मनोवृत्ती जागृत होतात. आपण अज्ञान, आपण जें बोलतों तें ईश्वरी प्रेरणेनेंच होय, अशी त्यांची ठाम समजूत होती. कीर्तनांतील त्यांचें वक्तृत्व इतकें अलौकिक असे कीं, श्रोत्यांवर त्याचा उत्तम परिणाम व्हावयाचाच. कशाचीही आशा न करितां दररोज कथा करून ते लोकांना उपदेश करीत असत. त्यांची कीर्ति लांबवर पसरली. त्याचें कीर्तन ऐकण्यास लांबलांबून लोक येत असत.

( **छळ** ) तुकारामाची कीर्ति चोहोंकडे पसरलेली पाहून कुत्सित व मत्सरी लोकांच्या पोटांत दुखूं लागलें. देहूस कोणी **मंबाजी** गोसावी रहात असे. त्याचें प्रस्थ अर्थातच कमी झालें. तो **तुकारामा**चा द्वेश करूं लागला.देवळाच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर त्यानें कांट्या लाविल्या होत्या. त्या यात्रेकरूंना बोचत असत. ही अडचण दूर करावी ह्मणून तुकारामांनीं त्या उपटून रस्ता साफ केला. येवढेंच निमित्य **मंबाजी**स पुरें झालें! त्यानें तुकारामास त्याच कांट्यांखालीं खूप झोडपलें. **तुकोबा**नें अभंग ह्मणून हें गाऱ्हाणें देवाला कळीविलें व **मंबाजी**ला फार श्रम झाले ह्मणून उलट त्यानें त्याचे हात पाय चेंपले! **तुकाराम**बुवा शूद्र असून कीर्तनांत वेद, गीता, उपनिषदें यांतील रहस्य सर्वांना समजावून सांगतो. ब्राह्मण त्याच्या पायां पडतात. या अधर्माबद्दल **रामेश्वरभट्टानें** दिवाणांत फिर्याद केली. तुकारामास हद्दपार करावें असा हुकूम सुटला. हें कृत्य **रामेश्वर**भट्टाचें आहे, असें समजतांच ते **वाघोलीस** त्याच्या भेटीस गेले. त्यांनी तेथें कीर्तन केलें. श्रुतिप्रमाण वचनें त्यांच्या तोंडून ऐकून **रामेश्वर**भट्ट संतापून बोलले, ' तूं शूद्र हीं श्रुतिवचनें बोलून आपणास आणि श्रोत्यांस

रौरव नरकांत घालीत आहेस. करितां अभंग करणें व कीर्तन करणें सोडून दे.' **तुकाराम** ह्मणाले 'बरें आहे, परंतु आजपर्यंत मीं जे अभंग रचले आहेत, त्यांची वाट काय ?' भट्ट ह्मणले 'ते बुडवून टाक.' घरीं येऊन तुकारामबुवांनीं अभंगांच्या वह्या फडक्यांत गुंढाळल्या आणि दगड बांधून त्या इंद्रायणीच्या डोहांत टाकल्या. त्यावेळीं त्यांना अतिशय दुःख झालें! त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या! त्यांनीं तेथेंच १३ दिवस धरणें घेतलें आणि पांडुरंगाचा धांवा चालविला. हे शोकपर वीस अभंग आहेत. चवदाव्या दिवशीं वह्या पाण्यावर तरंगूं लागल्या! हा साक्षात्कार पाहून सर्व आश्चर्यचकित् झालें! यामुळें तुकारामबुवांची कीर्ति अधिकच पसरली.

इकडे पुण्यास **नागनाथाचें** दर्शनास रामेश्वर भट्ट गेले असतां तेथें जवळच **अनघडशा** फकिराची बाग होती. तेथील विहिरींत रामेश्वर भट्टानें स्नान केलें. तेव्हांपासून त्याच्या अंगाचा दाह होऊं लागला. तो कांहींकेल्या शमेना. तेव्हां तो आळंदीस जाऊन ज्ञानेश्वराची आराधना करूं लागला. तेथें त्याला तुकारामबुवाकडे जा, असा दृष्टांत झाला. इकडे तुकारामबुवांच्या वह्या पाण्यावर निघाल्या, हें वृत्त त्याच्या कानीं आल्यावर तो पश्चात्तापानें व लज्जेनें शरमला! त्यानें तुकाराममहाराजांचे पाय धरले. तेव्हां त्यांनीं त्याला चित्तशुद्धीविषयीं ( अभंग ८० ) उपदेश केला तो ऐकून त्याचा दाह शांत झाला. पुढें हाच रामेश्वरभट्ट तुकारामाचा शिष्य झाला. याचप्रमाणें तुकारामाची भक्ति व वैराग्य पाहून कोंडभट्ट पुराणिक नामक एक विद्वान् ब्राह्मण त्याचा शिष्य झाला.

एकदां तुकाराम बुवांनीं लोहगांवीं नाममहिमा वर्णन करून यज्ञयाग, जपतपादि अनेक खटाटोपांचें ह्यापुढें तेज नाहीं, असा उपदेश केला. तो ऐकून एक **संन्यासी** क्रोधाविष्ट होऊन पुण्याचा मोकाशी **दादोजी कोंडदेव** याजकडे गेला आणि फिर्याद केली कीं, तुकाराम हा वैदिक धर्माचा उच्छेद करीत आहे. त्याचा

बंदोबस्त झालाच पाहिजे. **दादोजीनें** तुकारामास बोलावणें पाठ-विलें. तुकाराम आपल्या १४ शिष्यांसह तेथें गेले. त्या दिवशीं पुण्यांत तुकाराम बुवांचें कीर्तन मोठ्या थाटानें व अत्यंत भक्तिप्रचुर वाणीनें झालें. सर्व लोक भक्तिप्रेमांत तन्मय झाले. तो संन्यासी जरी विकारवश व हट्टी होता तरी त्याचें हृदय द्रवलें. तुकारामाच्या ह्मणण्याची सत्यता त्यानें कबूल केली ! साधूचा नाहक छळ केला ह्मणून **दादोजीनें** त्याची गाढवावर धिंड काढण्याविषयीं हुकूम फर्माविला. परंतु तुकारामाच्या मध्यस्तीमुळें त्याला तो हुकूम रद्द करावा लागला.

(**चरित्रांतील कांहीं गोष्टी**) तुकारामांची ख्याति ऐकून **शिवाजी** महाराजांनीं त्यांजकडे कारकून, घोडे, छत्री, अबदागिरी वगैरे लवाजमा पाठवून त्यांना आपल्या घरीं येण्याविषयीं विनंति केली. ‘ आह्मां हरिदासांना ह्या लवाजम्याचें व या भेटीचें प्रयोजन नाहीं. तुह्मी परतजा आणि आमचें **शिवाजी** राजाला पत्र द्या. असें निक्षुण सांगून त्यांनीं **महाराजांना** पत्र दिलें. त्यांत त्यांनीं **महाराजांचा** गौरव करून सांगितलें कीं, ‘ सद्गुरु **रामदासावर** एकविध श्रद्धा ठेवा. सर्वांभूतीं ईश्वर आहे, हा भाव मनांत ठेवून अनाथांची दया करा. आह्मांस भिक्षा थोर आहे. आकाश हें पांघरूण व भूमीचें अंथरूण हीं आह्मांला पुरेशीं आहेत. आह्मांस तुह्मांपाशीं कांहीं मागावयाचें नाहीं. ’ हें निस्पृहतेचें पत्र पाहून तुकारामांविषयीं महाराजांची श्रद्धा दुणावली. ते **तुकारामाच्या** भेटीस गेले. नमस्कार करून रत्नांनीं भरलेलें ताट त्यांनीं तुकारामापुढें ठेविलें. स्वामींनीं तीं रत्नें ब्राह्मणांना वांटून दिलीं. **शिवाजींची** तुकारामावर विशेष भक्ति जडली. एकदां त्यांना वैराग्य उत्पन्न होऊन त्यांनीं राज्य चालविण्याचें नाकारिलें. तेव्हां त्यांची आई **जिजाबाई** त्यांना शरण गेली व ह्मणाली ‘ माझ्या एकुलत्या एका मुलाला जी उपरति झाली आहे ती योग्य नसून तो पूर्वी-प्रमाणें राज्य चालवील असें करा. तेव्हां स्वामींनीं त्यांना आपलें

कर्तव्य योग्यप्रकारें करून धर्माचरण करण्याविषयीं उपदेश केला त्या उपदेशाचा **महाराजांवर** उत्तम परिणाम होऊन ते पूर्ववत राज्यशकट हाकूं लागले. लोहगांवीं **शिवाजी कासार** नामक एक महा दुर्जन व कृपण मनुष्य होता. तो कीर्तनास येत तर नसेच, परंतु तुकारामाची निंदा मात्र करी. एकदां खास तुकारामानें त्यास बोलावणें केल्यावरून तो कीर्तनास गेला. बुवांचें तें हृदयंगम कीर्तन ऐकून त्याचें मन द्रवलें. पुढें तो दररोज कीर्तनास जाऊं लागला व तुकारामाचा शिष्य झाला. वृत्तींत पालट पडल्यामुळें या कृपणानें पुढें दान धर्मांत आपली संपत्ति खर्च केली.

**(निर्वाण)** साधुवर्य तुकाराम महाराजांची कीर्ति सर्वत्र पसरली. त्यांच्या भजनीं अनेक लोक लागले. उपदेश श्रवणार्थ देहूस दर रोज यात्रा जमूं लागली. तुकारामाविषयीं स्तुतिघोष दुमदुमूं लागले. हें तुकारामास आवडेना. 'या महत्वाच्या भारानें मी वाहवला जात आहें, देवा मला संभाळ' असें त्यांनीं ह्मटलें आहे. पूर्वींचा साधेपणा आतां राहिला नव्हता. शिवाजी महाराजांसारखे मोठमोठे लोक त्याच्या चरणीं मिलिंदायमान झाले होते. मला या लौकिकांत व्यर्थ पाडलेंस, असें ते देवास वारंवार ह्मणत. एके दिवशीं सकाळीं ते इंद्रायणीतिरीं भजनास गेले आणि भजन चालू असतांना शिष्यांदेखत नाहींसे झाले. त्यांना सुद्धां त्यांचा पत्ता लागला नाहीं. यावेळीं त्यांचें वय ४२ वर्षांचें होतें. ते सदेह वैकुंठास गेले, असें भाविक लोकांचें ठाम मत आहे.

**(उपसंहार)** तुकारामाच्या अंगीं दया, क्षमा, शांति, विरक्ती, निरपेक्ष बुद्धि, शुद्धाचरण, अलौकिक धैर्य इत्यादि अनेक सद्गुण वास करीत असल्यामुळें लोकांत त्यांचें तेज पडलें. लोकांमध्यें त्यांनीं भगवद्भक्ति उत्पन्न केली. श्री पांडुरंगावर त्यांची एकविध निःसीम भक्ति होती. आपण हीन पामर, आपली योग्यता ती काय, परंतु पांडुरंग आपणास वदवितो. हा त्यांचा आपणास संदेश आहे. जड जीव उद्धरण्याकरितां या अभंगनौका आहेत. ईश्वर प्राप्तीची हीच भरंवशाची वाट आहे, अशी त्यांची खात्री होती.

## १. मातृप्रेम.

१. लागलिया मुख स्तनां । वाळी पान्हा माउली ॥१॥ उभयतां आवडी लाडें । कोडें कोड पुरतसे ॥२॥ मेळवितां अंगें अंग । प्रेमें रंग वाढतो ॥३॥ तुका ह्मणे जड भारी । अवघें शिरीं जननीचे ॥ ४ ॥

२. पुढिलिया सुखें निंब देतां भले । बहुत वारलें होय दुःख ॥१॥ हें तों वर्म असे माउलीचे हातीं । हाणी मारी प्रीती हितासाठीं ॥ २ ॥ खेळतां विसरे भूक तान घर । धरूनियां कर आणी बळें ॥३॥ तुका ह्मणे पाळी तोंडींचिया घांसें । उदार सर्वस्वें सर्व काळ ॥ ४ ॥

३. नलगे मायेसी बाळें निरवावें । आपुल्या स्वभावें ओढे त्यासी ॥१॥ मज कां लागला करणें विचार । ज्याचा जार भार त्याचे माथां ॥ २ ॥ गोड धड त्यासी ठेवी न मागतां । समाधान खातां नेदी मना ॥ ३ ॥ खेळतां गुंतलें उमगूनी आणी । बैसोनियां स्तनीं लावी बळें ॥ ४ ॥ त्याच्या दुःखेंपणें आपण खापरीं[2] । लाही तळीं वरी होय जैसी ॥ ५ ॥ तुका ह्मणे देह विसरे आपुला । आघात तो त्याला लागों नेदी ॥ ६ ॥

४. काय नाहीं माता गौरवीत बाळा । काय नाहीं लळा पाळीत ते ॥१॥ काय नाहीं त्याची करीत ते सेवा । काय नाहीं जीवा गोमटें तें ॥२॥ अमंगळपणें कांटाळा न धरी । उचलोनि करीं कंठी लावी ॥ ३ ॥ लेववी आपुलें

---

१ सांभाळावें ( हातें ). २ खापराच्या परळींत भाजतांना लाह्या जशा उडतात त्याप्रमाणें, तिचें काळीज दुःखानें उडतें.

अंगीं अळंकार । संतोषा ये फार देखोनियां ॥४॥ तुका ह्मणे स्तुति योग्य नाहीं परी । तुह्मां लाज थोरी अंकिताची ॥५॥

## २. आईबापाची योग्यता.

५. मायबापें केवळ काशी । तेणें न वजावें तीर्थासी ॥१॥ पुंडलीकें काय केलें । परब्रह्म उभें ठेलें ॥ २ ॥ तैसा होईं सावधान । हृदयीं धरीं नारायण ॥ ३ ॥ तुका ह्मणे मायबापें । अवधीं देवाचीं स्वरूपें ॥ ४ ॥

## ३. गुरु.

६. सद्गुरुवांचूनी सांपडेना सोय । धरावे ते पाय आधीं त्याचे ॥ १ ॥ आपणासारिखे करिती तात्काळ । कांहीं काळवेळ नलगे त्याशीं ॥ २ ॥ लोह परिसासी न साहे उपमा । सद्गुरु-महिमा अगाधची ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसें आंधळें हें जन । गेलें विसरून खऱ्या देवा[1] ॥ ४ ॥

## ४. अभ्यास.

७. ओलें मूळ भेदी खडक चें अंग । अभ्यासासी सांग कार्यसिद्धि ॥ १ ॥ नव्हे ऐसें काहीं नाहीं अवघड । नाहीं कईवाड तोंच वरि ॥२॥ दोरें चिरा कापे[2] पडिला कांचणीं । अभ्यासें सेवनीं विष पडे ॥३॥ तुका ह्मणे कैंचा बैसण्यासी ठाव । जठरीं बाळा वाव एकाएकीं ॥ ४ ॥

---

१ गुरु हाच देव ह्यास. २ दोरांनीं दगड कापले जातात. ३ आईच्या पोटांत मूल हळूंहळूं वाढतें त्याला तेथें एकदम बसण्यास स्थळ मिळत नाहीं.

८. साधूनी बचनाग खाती तोळा तोळा । आणिकातें डोळां न पाहावें ॥ १ ॥ साधूनी भुजंग धरितील हातीं । आणिकें कांपती देखोनियां ॥२॥ असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका ह्मणे ॥ ३ ॥

९. उपदेश तो भलत्या हातीं । जाला चित्तीं धरावा ॥१॥ नये जाऊं पात्रावरी । कवटी सार नारळें ॥ २ ॥ स्त्री पुत्र बंदीजन । नारायण स्मरवीती ॥ ३ ॥ तुका ह्मणे रत्नसार । परि उपकार चिंधीचे ॥ ४ ॥

## ५. प्रेम.

१०. प्रेम नये सांगतां बोलतां दावितां । अनुभव चित्ता चित्त जाणे ॥ १ ॥ कासवीचें बाळ वाढे कृपादृष्टी । दुधा नाहीं भेटी अंगसंगें ॥२॥ पोटामध्यें कोणें सांगितलें सर्पा । उपजत लपा ह्मणऊनि ॥ ३ ॥ बाळें नेणें परी जाणे गोड क्षार । अंतरीं विचार त्यासी ठावा ॥ ४ ॥ तुका ह्मणे बरें विचारावें मनीं । आणीक भल्यांनीं पुसों नये ॥ ५ ॥

११. प्रीतीचा तो कळवळा । जिव्हाळाचि वेगळा ॥१॥ बहु नेदी रडों माता । दुश्चित होतां धीर नव्हे ॥ २ ॥ वरी वरी तोंडापुरतें । मोहोरी तें कळतसे ॥ ३ ॥ जाणोनियां नेणता तुका । नव्हे लोकांसारिखा ॥ ४ ॥

## ६. नम्रता.

१२. नम्र जाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ॥ १ ॥

१ विष. २ जें दर्शनीय तें लवकर तेव्हांच कळतें.

हेंचि शूरत्वाचें अंग । हेरी आणिला श्रीरंग ॥ २ ॥ अवघा झाला पण । लवण सकळां कारण ॥३॥ तुका ह्मणे पाणी । पाताळ तें परी खणी* ॥ ४ ॥

१३. अग्नीमाजी पडे धातु । लीन होउनि राहे आंतु । होय शुद्ध न पवे घातु । पटतंतुप्रमाण ॥ १ ॥ बाह्यरंगाचें कारण । मिथ्या अववेंचि भाषण¶ । गर्व ताठा हें अज्ञान । मरण सवें वाहातसे ॥ २ ॥ पुरें मातलिया नदी । लव्हों नांदे जीवनसंधी । वृक्ष उन्मळोनि भेदी । परि तो कधीं भंगेना ॥ ३ ॥ हस्ती परदळा जो भंगी । तया पायीं न मरे मुंगी । कोण जाय संगीं । पाणोवाणी तयेच्या ॥ ४ ॥ पिटितां घणें वरि सैरा । तया पोटीं राहे हिरा । तैशा काय तगती गारा । तया थोरा होऊनि ॥ ५ ॥ लीन दीन हेंचि सार । भव उतरावया पार । बुडे माथां भार तुका ह्मणे वाहोनि ॥ ६ ॥

१४. मुंगी होउनि साखर खावी । निजवस्तूंची भेटी घ्यावी ॥ १ ॥ वाळवंटीं साकर पडे । गज येउनि काय रडे ॥ २ ॥ जाला हरिदास गोसावी । अवघी मायिक क्रिया दावी ॥ ३ ॥ पाठ पाठांतरिक विद्या । जनरंजवणी संध्या ॥ ४ ॥ प्रेम नसतां अंगा आणी । दृढ भाव नाहीं मनीं ॥ ५ ॥ ब्रह्मज्ञान वाचे बोले । करणी पाहतां न निवती डोळे ॥६॥ मिथ्या भगलें वाढविती । आपुली आपण पूजा घेती ॥७॥ तुका ह्मणे धाकुटें व्हावें । निजवस्तूसी मागुनि घ्यावें॥८॥

---

१ जेरीस (* पातळपणें तळा आणि) (¶ भूषण). २ लव्हाळा (राहोनी). ३ नम्र होऊन आत्महित साधावें. ४ ढोंग.

१५. लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥१॥ ऐरावत रत्न थोर । तया अंकुशाचा मार ॥ २ ॥ ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाण । व्हावें लहानाहुनि लहान ॥ ४ ॥

१६. नीचपण* बरवें देवा । न चले कोणाचाही हेवा ॥ १ ॥ महापुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे राहाती ॥ २ ॥ येतां सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती वरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ॥ ४ ॥

---

## ७. दया.

१७. दया तिचें नांव भूतांचें पाळण । अणिक निर्दळण कंटकांचें ॥१॥ पाप त्याचें नांव न विचारीतां नीत । भलतेंचि उन्मत्त करी सदा ॥ २ ॥ धर्म नीतीचा हा ऐक वेव्हार । निवडिलें सार असार तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे धर्म रक्षावयासाठीं । देवासही आटी जन्म घेणें ॥ ४ ॥

१८. देवाची पूजा हे भूतांचें पाळण । मत्सर तो सीण बहुतांचा ॥ १ ॥ रुसावें फुगावें आपुलियावरी । उरला तो हरी सकळही ॥ २ ॥ तुका ह्मणे संतपण याचि नांवें । जारी होय जीव सकळांचा ॥ ३ ॥

१९. उपकारासाटीं बोलों हे उपाय । येणेंविण काय चाड आह्मां ॥ १ ॥ बुडतां हे जन न देखवे डोळां । येतो कळवळा ह्मणउनि ॥ २ ॥ तुका ह्मणे माझे देखतील डोळे । भोग देतेवेळे येईल कळों ॥ ३ ॥

---

( * निंचपण ).

हेंचि शूरत्वाचें अंग । हेरी आणिला श्रीरंग ॥ २ ॥ अवघा झाला पण । लवण सकळां कारण ॥३॥ तुका ह्मणे पाणी । पाताळ तें परी खणी* ॥ ४ ॥

१३. अग्नीमाजी पडे धातु । लीन होउनि राहे आंतु । होय शुद्ध न पवे घातु । पटतंतुप्रमाण ॥ १ ॥ बाह्यरंगाचें कारण । मिथ्या अववेंचि भाषण¶ । गर्व ताठा हें अज्ञान । मरण सवें वाहातसे ॥ २ ॥ पुरें मातलिया नदी । लव्हों नांदे जीवनसंधी । वृक्ष उन्मळोनि भेदी । परि तो कधीं भंगेना ॥ ३ ॥ हस्ती परदळा जो भंगी । तया पायीं न मरे मुंगी । कोण जाय संगीं । पाणोवाणी तयेच्या ॥ ४ ॥ पिटितां वर्णे वरि सैरा । तया पोटीं राहे हिरा । तैशा काय तगती गारा । तया थोरा होऊनि ॥ ५ ॥ लीनं दीन हेंचि सार । भव उतरावया पार । बुडे माथां भार तुका ह्मणे वाहोनि ॥ ६ ॥

१४. मुंगी होउनि साखर खावी । निजवस्तूंची भेटी घ्यावी ॥ १ ॥ वाळवंटीं साकर पडे । गज येउनि काय रडे ॥ २ ॥ जाला हरिदास गोसावी । अवघी मायिक क्रिया दावी ॥ ३ ॥ पाठ पाठांतरिक विद्या । जनरंजवणी संध्या ॥ ४ ॥ प्रेम नसतां अंगा आणी । दृढ भाव नाहीं मनीं ॥ ५ ॥ ब्रह्मज्ञान वाचे बोले । करणी पाहतां न निवती डोळे ॥६॥ मिथ्या भगलें वाढविती । आपुली आपण पूजा घेती ॥७॥ तुका ह्मणे धाकुटें व्हावें । निजवस्तूसी मागुनि घ्यावें॥८॥

---

१ जेरीस (* पातळपणें तळा आणि) (¶ भूषण). २ लव्हाळा (राहोनी). ३ नम्र होऊन आत्महित साधावें. ४ ढोंग.

१५. लहानपण देगा देवा । मुंगी साखरेच्या रवा ॥ १ ॥ ऐरावत रत्न थोर । तया अंकुशाचा मार ॥ २ ॥ ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाण । व्हावें लहानाहुनि लहान ॥ ४ ॥

१६. नीचपण* बरवें देवा । न चले कोणाचाही हेवा ॥ १ ॥ महापुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे राहाती ॥ २ ॥ येतां सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती वरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ॥ ४ ॥

## ७. दया.

१७. दया तिचें नांव भूतांचें पाळण । अणिक निर्दळण कंटकांचें ॥१॥ पाप त्याचें नांव न विचारीतां नीत । भलतेंचि उन्मत्त करी सदा ॥ २ ॥ धर्म नीतीचा हा ऐक वेव्हार । निवडिलें सार असार तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे धर्म रक्षावयासाठीं । देवासही आटी जन्म घेणें ॥ ४ ॥

१८. देवाची पूजा हे भूतांचें पाळण । मत्सर तो सीण बहुतांचा ॥ १ ॥ रुसावें फुगावें आपुलियावरी । उरला तो हरी सकळही ॥ २ ॥ तुका ह्मणे संतपण याचि नांवें । जारी होय जीव सकळांचा ॥ ३ ॥

१९. उपकारासाटीं बोलों हे उपाय । येणेंविण काय चाड आह्मां ॥ १ ॥ बुडतां हे जन न देखवे डोळां । येतो कळवळा ह्मणउनि ॥ २ ॥ तुका ह्मणे माझे देखतील डोळे । भोग देतेवेळे येईल कळों ॥ ३ ॥

( * निंचपण ).

२०. धिग तो दुर्जन नाहीं भूतदया । व्यर्थ तया माय प्रसवली ॥ १ ॥ कठिण हृदय तया चांडाळाचें । जो नेणें पराचें दुःख कांहीं ॥ २ ॥ आपुला हा प्राण तैसे सकळ लोक । न करी विवेक पशु जैसा ॥ ३ ॥ तुका ह्मणे सुखें कापीतसे गळे । आपुलिया वेळे रडतसे ॥ ४ ॥

## ८. क्षमा.

२१. दया क्षमा शांति । तेथें देवाचि वसती ॥ १ ॥ पावे धांवोनियां घरा । राहे धरोनियां थारा ॥२॥ कीर्तनाचे वाटे । बराडियां[1] ऐसा लोटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे घडे । पूजा नामें देव जोडे ॥ ४ ॥

२२. क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रति काय करी ॥ १ ॥ तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोनि आपसया ॥२॥ तुका ह्मणे क्षमा सर्वांचे स्वहित। धरा अखंडित सुखरूप ॥ ३ ॥

## ९. शांति.

२३. शांतीपरतें नाहीं सुख । येर अवघेंची दुःख ॥१॥ ह्मणउनी शांति धरा । उतराल पैल तीरा ॥२॥ खवळलिया कामक्रोधीं । अंगीं भरती आधिव्याधी ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्रिविध ताप । जाती मग आपेंआप ॥ ४ ॥

---

१. भिकारी.

## १०. गर्व.

२४. हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा । चित्तशुद्धी सेवा देवाची हे ॥ १ ॥ आवडी विठ्ठल गाईजे एकांतीं । अलभ्य ते येती लाभ घरा ॥२॥ आणिकां अंतरीं न द्यावी वसती । करावी हे शांती वासनेची ॥ ३ ॥ तुका ह्मणे बाण हाचि निर्वाणींचा । वाउगी हे वाचा वेचूं नये ॥ ४ ॥

२५. मायबापें जरी सर्पीण कीं बोका । त्यांचे संगें सुखा न पवे बाळ ॥ १ ॥ चंदनाचा शूळ सोनियाची बेडी । सुख नेदी फोडी प्राण नाशी ॥ २ ॥ तुका ह्मणे नरकीं घाली अभिमान । जरी होय ज्ञान गर्वे ताठा ॥ ३ ॥

२६. वसोनि थिल्लरीं । बेडुक सागरा धिक्कारी ॥ १ ॥ नाहीं देखिला ना ठावा । तोंडपिटी करी हांवा ॥ २ ॥ फुगतें काउळें । ह्मणे मी राजहंसा आगळें ॥ ३ ॥ गजाहूनि खर । ह्मणे चांगला मी फार ॥ ४ ॥ मुलाम्याचें नाणें । तुका ह्मणे नव्हे सोनें ॥ ५ ॥

२७. कवण दिस येईल कैसा । न कळे संपत्तीचा भरंवसा ॥ १ ॥ चौदा चौकाडिया लंकापति । त्याची कोण जाळी गति ॥२॥ लंकेसारिखें भुवन । त्याचें त्यासी पारखें जाण ॥ ३ ॥ तेहतीस कोटी बांदवडी । राज्य जातां नलगे घडी ॥४॥ ऐसे अहंतेनें नाडिले । तुका ह्मणे वांयां गेले ॥५॥

---

## ११. वैर.

२८. निर्वैर होणें साधनाचें मूळ । येर ते विव्हाळ सांडीमांडी ॥ १ ॥ नाहीं चालों येत सोंगसंपादणी । निवडे

---

१ बंदीजन.

अवसानीं शुद्धाशुद्ध ॥२॥ त्याग नांव तरी निर्विषयवासना। कार्यकारणापुरते विधि ॥ ३ ॥ तुका ह्मणे राहे चिंतनीं आवडी। येणें नांवें जोडी सत्यत्वेंशीं ॥ ४ ॥

२९. निर्वैर व्हावें सर्वभूतांसवें। साधन बरवें हेंचि एक ॥ १ ॥ तरीच करील अंगीकार नारायण। बडबड तो सीण येणेंविण ॥ २ ॥ सोइरें पिशुन समानचि वडे। चित्त पर ओढे उपकारीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्त जालिया निर्मळ। तरिच सकळ केलें होय ॥ ४ ॥

---

## १२. लाज.

३०. देवाच्या निरोपें पिटितों डांगोरा। लाजे नका थारा देऊं कोणी ॥ १ ॥ मोडिले या रांडें सुपंथ मारग। चालविलें जग यमपंथें ॥२॥ परिचारी[1] केली आपुलीच रूढी। पोटींची ते कुडी ठावी नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे आणा राउळा धरून। फजित करून सोडूं मग ॥ ४ ॥

३१. आतां येथें लाजे नाहीं तुझें काम। जाय मज राम आठवूं दे ॥ १ ॥ तुझे भिडे माझे बहु जाले घात। केलों या अंकित दुर्जनाचा ॥ २ ॥ माझें केलें मज पारिखें[2] माहेर। नटोनी साचार चालविलें ॥ ३ ॥ सुखासाठीं एक वाहियेलें खांदीं। तेणें बहु मांदी मेळविली ॥ ४ ॥ केला चौघाचार नेलों पांचांमधीं। नाहीं दिली शुद्धी धरूं आशा ॥५॥ तुका ह्मणे आतां घेईन कांटीवरी। धनी म्यां कैवारी केला देव ॥ ६ ॥

---

१ दासी. २ समुदाय.

## १३. पोट.

३२. पोट लागलें पाठीशीं । हिंडवितें देशोशीं ॥ १ ॥ पोटाभेणें जिकडे जावें । तिकडे पोट येतें सवें ॥ २ ॥ जप तप अनुष्ठान । पोटासाठीं जाले दीन ॥३॥ पोटें सांडियेली चवी । नीचापुढें तें नाचवी ॥ ४ ॥ पोट काशियानें भरे । तुका ह्मणे झुरझुरूं मरे ॥ ५ ॥

३३. वितीयेवढेंसें पोट । केवढा बोभाट तयाचा ॥१॥ जळो याची विटंबना । भूक जना नाचवी ॥२॥ अभिमाना सिरीं भार । झाले खर तृष्णेचे ॥ ३ ॥ तुका ह्मणे नरका जावें । हाचि जीवें व्यापार ॥ ४ ॥

३४. निंदा स्तुती करवी पोट । सोंग दाखवी बोभाट ॥ १ ॥ जटा राख विटंबना । धीर नाहीं क्षमा मना ॥२॥ शृंगारिलें मडें । जीवेंवीण जैसें कुडें ॥ ३ ॥ तुका ह्मणे रागें । भलतें चावळे वाउगें ॥ ४ ॥

## १४. शरीर.

३५. सकळ चिंतामणी शरीर । जरी जाय अहंकार आशा समूळ । निंदा हिंसा नाहीं कपट देहबुद्धि । निर्मळ स्फटिक जैसा ॥ १ ॥ मोक्षाचें तीर्थ न लगे वाराणसी । येती तयापासीं अवघीं जनें । तीर्थासी तीर्थ जाला तोचि एक । मोक्ष तेणें दर्शनें ॥ २ ॥ मन शुद्ध तया काय करिसी माळा । मंडित सकळा भूषणांसी ॥ हरिच्या गुणें गर्जताती सदा । आनंद तया मानसीं ॥ तन मन धन दिलें

१ पोटाचे कोड न पुरवितां त्याच्या इच्छा मारल्या पाहिजेत.

पुरुषोत्तमा । आशा नाहीं कवणाची ॥ तुका ह्मणे तो परिसाहूनि आगळा । काय महिमा वर्णू त्याची ॥ ४ ॥

३६. इहलोकींचा हा देहे । देव इच्छिताती पाहें ॥ १ ॥ धन्य आह्मी जन्मा आलों । दास विठोबाचे झालों ॥ २ ॥ आयुष्याच्या या साधनें । सच्चिदानंद पदवी घेणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाठवणी । करूं स्वर्गाची निशाणी ॥ ४ ॥

३७. ओले मातीचा भरंवसा । कां रे धरिशी मानसा ॥ १ ॥ डोळे चिरीव चांगले । वृद्धपणीं सरक्या जाले ॥ २ ॥ नाक सरळ चांगलें । येउन हनुवटी लागलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आलें नाहीं । तंव हरिला भजरे कांहीं ॥ ४ ॥

३८. पिंडं पोसावे हें अधमाचें ज्ञान । विलास मिष्टान्न करूनियां ॥ १ ॥ शरीर रक्षावें हा धर्म बोलती । काय असे हातीं तयाचिया ॥ २ ॥ क्षणभंगुर हें जाय न कळतां । ग्रास गिळों सत्ता नाहीं हातीं ॥ ३ ॥ कर्वतिलीं देहें कापियेलें मांस । गेले वनवासास शुकादिक ॥ ४ ॥ तुका ह्मणे राज्य करितां जनक । अग्नीमाजी एक पाय जळे ॥ ५ ॥

३९. देहबुद्धि वसे जयाचिये अंगीं । पूज्यता ते जगीं सुख मानी ॥ १ ॥ थोर असे दगा झाला त्यासी हाटीं । सोडोनियां गांठी चोरीं नेली ॥ २ ॥ गांठीचें जाऊनि नव्हे तो मोकळा । *बांधिलासे गळा दंभलोभें ॥ ३ ॥ पुढिल्या उदिमा झालेंसे खंडण । दिसे नागवण पडे गांठी ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसें बोलतील संत । जाणूनियां घात कोण करी ॥ ५ ॥

---

१ शरीर. २ मकरध्वज, शिबी ह्यांनीं शरीरें कापून देऊन आपलीं नांवें अमर केलीं. ( * बांधविला. )

## १५. आशा.

४०. कांहीं न मागे कोणासी । तोचि आवडे देवासी ॥ १ ॥ देव तयासी ह्मणावें । त्याचे चरणीं लीन व्हावें॥२॥ भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ॥ ३ ॥ नाहीं नाहीं त्या समान । तुका ह्मणे मी जमान[1] ॥ ४ ॥

४१. आशाबद्ध जन । काय जाणे नारायण ॥ १ ॥ करी इंद्रियांची सेवा । पाहे आवडीचा हेवा[2] ॥ २ ॥ भ्रमलें चावळे[3] । तैसें उचित न कळे ॥ ३ ॥ तुका ह्मणे विषें । अन्न नाशियेलें जैसें ॥ ४ ॥

४२. आशा ते करविते बुद्धीचा लोप । संदेह तें पाप कैसे नव्हे ॥ १ ॥ आपला आपण करावा विचार । प्रसन्न तें सार मन ग्वाही ॥ २ ॥ नांवें रूपें अंगीं लाविला विटाळ । होतें त्या निर्मळ शुद्ध बुद्ध ॥ ३ ॥ अंधळ्यानें नये देखण्याची चाली । चालों ऐसी बोली तुका बोले ॥४॥

४३. नसावें ओशाळ । मग मानिती सकळ ॥ १ ॥ जाय तेथें पावे मान । चाले बोलिलें वचन ॥ २ ॥ राहों नेदी बाकी । दान ज्याचें त्यासी टाकी ॥ ३ ॥ होवा वाटे जना । तुका ह्मणे साटीं गुणां ॥ ४ ॥

४४. आशा हे समूळ खाणोनि काढावी । तेव्हांचि गोसावी व्हावें तेणें ॥१॥ नाहीं तरि सुखें असावें संसारीं । फजिती दुसरी करूं नये ॥ २ ॥ आशा मारुनियां जयवंत

---

१ जामीन. २ आपली हौस पूर्ण व्हावी अशी इच्छा करतो. ३ [अ]निष्ट बडबडतें.

व्हावें । तेव्हांचि निवावें सर्वांतूनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे जरी योगाची तांतडी । आशेची बीबुडी करीं आधीं ॥ ४ ॥

४५. आशाबद्ध वक्ता । भय श्रोतियाच्या चित्ता ॥ १ ॥ गातो तेंही नाहीं ठावें । तोंड वासी कांहीं द्यावें ॥ २ ॥ झालें लोभाचें मांजर । भीक मागे दारोदार ॥ ३ ॥ उभयता लोभीं मन । वांयां गेलें तें भजन ॥ ४ ॥ बहिरे मुके एके ठायीं । तैसें झालें तया दोहीं ॥ ५ ॥ माप आणि गोणी । तुका ह्मणे रितीं दोन्ही ॥ ६ ॥

४६. आशाबद्ध तो जगाचा दास । पूज्य तो उदास सर्वजना ॥ १ ॥ आहे तें अधीन आपुले हातीं । आणिकां ठेविती काय बोल ॥२॥ जाणतिया पाठीं लागला उपाध । नेणता तो सिद्ध *भोजनासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भय बांधलेंसे गांठीं । चोर लागे पाठी दुम तया ॥ ४ ॥

४७. जरी आलें राज्य मोळविक्या हाता । तरी तो मागुता व्यवसायी ॥ १ ॥ तृष्णेचीं मजुरें नेणती विसांवा । वाढे हांव हांवा काम कामीं ॥२॥ वैभवाचीं सुखें नातळतां अंगा । चिंता करी भोगा विघ्न जाळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाहे मरणाचें भय । रक्षणउपाय करूनि असे ॥ ४ ॥

४८. जोडीच्या हव्यासें । लागे धनाचेंचि पिसें ॥१॥ मग आणीक दुसरें । लोभ्या नावडती पोरें ॥ २ ॥ पाहे रुक्याकडे । मग अवघे ओस पडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । तुला बहुतचि हेवा ॥ ४ ॥

---

१ निर्मुलन ( * भजनासी. )

४९. ऐसे कुळीं पुत्र होती । बुडविती पूर्वजां ॥ १ ॥ चाहाडी चोरी भांडवला । वांटा आला भागासी ॥ २ ॥ त्याचियानें दुःखी मही । भार तेही न साहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे ग्रामपशु । केला नाशु आयुष्या ॥ ४ ॥

५०. नयो वाचे अनुचित वाणी । नसो मनीं कुडी बुद्धि ॥ १ ॥ ऐसें मागा अरे जना । नारायणा विनवूनि ॥ २ ॥ कामक्रोधां पडो चिरीं । ऐसा बरा सायास ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाना छंदें । या विनोदें न पडावें ॥ ४ ॥

५१. काय बा करिसी सोवळें ओवळें । मन नाहीं निर्मळ वाउगेंचि ॥ १ ॥ काय बा करिसी पुस्तकांची मोट । घोकितां हृदयस्फोट हातां नये ॥ २ ॥ काय बा करिसी टाळ आणि मृदंग । जेथें पांडुरंग रंगला नाहीं ॥ ३ ॥ काय बा करिसी ज्ञानाचिया गोष्टी । करणी नाहीं पोटीं बोलण्याची ॥ ४ ॥ काय बा करिसी दंभ लौकिकातें । हित नाहीं मात तुका ह्मणे ॥ ५ ॥

५२. पापाची वासना नको दावूं डोळां । त्याहूनि अंधळा बराच मी ॥ १ ॥ निंदेचें श्रवण नको माझे कानीं । बधिर करोनी ठेवीं देवा ॥ २ ॥ अपवित्र वाणी नको माझ्या मुखा । त्याजहुनि मुका बराच मी ॥ ३ ॥ नको मज कधीं परस्त्रीसंगति । जनांतून माती उठतां भली ॥ ४ ॥ तुका ह्मणे मज अवध्याचा कंटाळा । तूं एक गोपाळा आवडसी ॥ ५ ॥

---

१ दगड.

५३. अन्यायासी राजा जरि न करी दंड । बहुच ते लंड पीडिती जना ॥ १ ॥ न करी निगा कुणबी न काढितां तणें । कैंचे येती कणें हातासी ते ॥ २ ॥ तुका ह्मणे संतां करूं नये अनुचित । पाप नाहीं नीत विचारितां ॥ ३ ॥

५४. पराविया नारी माउलीसमान । मानिलिया धन काय वेचे ॥ १ ॥ न करितां परनिंदा परद्रव्य अभिलाष । काय तुमचें यास वेचे सांगा ॥ २ ॥ बैसलिये ठायीं ह्मणतां रामराम । काय हो श्रम ऐसें सांगा ॥ ३ ॥ संतांच्या वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेचे सांगा ॥ ४ ॥ खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेचे यास तुमचें सांगा ॥ ५ ॥ तुका ह्मणे देव जोडे याजसाठीं । आणीक ते आटी न लगे कांहीं ॥ ६ ॥

५५. विटाळ तो परद्रव्य परनारी । येथुनि जो दुरी सोंवळा तो ॥ १ ॥ गद्यें पद्यें कांहीं न धरावी उपाधी । स्वाधीनाचि बुद्धि करुनी ठेवा ॥ २ ॥ विचाराचें कांहीं करावें स्वहित । पापपुण्यातीत भांडवल ॥ ३ ॥ तुका ह्मणे न लगे जावें वनांतरा । विश्व विश्वंभरा सारिखोंचि ॥ ४ ॥

५६. कासया गुणदोष पाहों आणिकांचे । मज काय त्यांचें उणें असे ॥ १ ॥ काय पापपुण्य पाहों आणिकांचें । मज काय त्यांचें उणें असे ॥ २ ॥ नष्टदुष्टपण कवणाचें वाणूं । तयाहून अणु अधिक माझें ॥ ३ ॥ कुचर खोटा मज कोण असे आगळा । तो मी पाहों डोळां आपुलिये

१ गवत. २ धान्य. ३ विद्येसंबंधीं.

॥ ४ ॥ तुका ह्मणे मी भांडवलें पुरता । तुंजसी पंढरिनाथा लावियेलें ॥ ५ ॥

६७. अवघा तो शकुन । हृदयीं देवाचे चरण ॥ १ ॥ येथें नसतां वियोग । लाभा उणें काय मग ॥ २ ॥ संग हरिच्या नामाचा । शुचिर्भूत सदा वाचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरिच्या दासा । शुभकाळ अवघ्या दिशा ॥ ४ ॥

६८. ब्रह्मचारीधर्म घोकावें अक्षर । आश्रमीं विचार षटकर्मैं ॥ १ ॥ वानप्रस्थ तरी संयोगीं वियोग । संन्यास तो त्याग संकल्पाचा ॥ २ ॥ परमहंस तरी जाणे सहज वर्म । तेथें याति धर्म कुळ नाहीं ॥ ३ ॥ बोले वर्म जो चाले याविरहित । तो जाणा पतित श्रुति बोले ॥ ४ ॥ तुका ह्मणे कांहीं नाहीं नेमाविण । मोकळा तो सीण दुःख पावे ॥ ५ ॥

६९. आपुलें वेचूनि खोडा घाली पाव । ऐसा तो हा जीव हीनबुद्धि ॥ १ ॥ विषयांच्या संगें आयुष्याचा नाश । पडियेलें ओस स्वहिताचें ॥ २ ॥ भुलल्याचें अंग आपणा पारिखें । छंदाच सारिखें वर्ततसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे दुःख उमटें परिणामीं । लंपटासी कामीं रतलिया ॥ ४ ॥

७०. नव्हे ब्रह्मचर्य बाइलेच्या त्यागें । वैराग्य वाउगें देशत्यागें ॥ १ ॥ काम वाढे भय वासनेच्या द्वारें । सांडावें तें धीरें आचावाचा ॥ २ ॥ कांपवूनि टिरी शूरत्वाची

---

१ मी या भांडवलानें पूर्ण असून तें मी तुजकडे लाविलें आहे. २ शुद्ध. ३ १ यजन २ याजन ३ अध्ययन ४ अध्यापन ५ दान ६ प्रतिग्रह, हीं शट्कर्मं होत. ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ व संन्यास, हे चार आश्रम. ४ इच्छेच्या ठायीं. ५ अंग.

मात । केलें वाताहात उचित काळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे करी जिव्हेसी विटाळ । लटिक्याची मळ स्तुति होतां ॥४॥

६१. जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करी ॥ १ ॥ उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥ २ ॥ परउपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥ ३ ॥ भूतदया गाईपशूंचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥ ४ ॥ शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचें ॥ ५ ॥ तुका ह्मणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥६॥

६२. निवडे जेवण शेवटींच्या घांसें । होय त्याच्या ऐसें सकळही ॥ १ ॥ न पाहिजे झाला बुद्धीचा पालट । केली खटपट जाय वांयां ॥२॥ संपादिलें व्हावें धरिलें तें सोंग । विटंबना व्यंग पडिलिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे वर्म नेणतां जो रांधी । पाववी ते बुद्धि अवकळा ॥ ४ ॥

६३. यासी कोणी ह्मणे निंदेचीं उत्तरें । नागवला खरें तोचि एक ॥ १ ॥ आड वाटे जातां लावी नीट सोई । धर्मनीत तेही ऐसी आहे ॥ २ ॥ नाइकतां सुखें करावें ताडण । पाप नाहीं पुण्य असे फार ॥ ३ ॥ जन्म व्याधि फार चुकतील दुःखें । खंडावा हा सुखें मान त्याचा ॥४॥ तुका ह्मणे लिंब दिलियावांचून । अंतरींचा सीण कैसा जाय ॥ ५ ॥

६४. सर्वस्वाचा त्याग तो सदा सोंवळा । न लिंपे विटाळा अग्नि जैसा ॥ १ ॥ सत्यवादी करी संसार सकळ । अलिप्त कमळ जळीं जैसें ॥ २ ॥ घडे ज्या उपकार

भूतांचि ते दया । आत्मस्थिति तया अंगीं वसे ॥ ३ ॥ न बोले गुण दोष नाइके जो कानीं । वर्तोनि तो जनीं जनार्दन ॥ ४ ॥ तुका ह्मणे वर्म जाणियल्याविण । पावे करितां सीण सांडीमांडी ॥ ५ ॥

६५. जेणें वाढे अपकीर्ति । सर्वार्थी तें त्यजावें ॥१॥ सत्य रुचे भलेपण । वचन तें जगासी ॥ २ ॥ होइजेतें शुद्ध त्यागें । वाउगें तें सारावें ॥३॥ तुका ह्मणें खोटें वर्म । निंद्य कर्म काळिमा ॥ ४ ॥

## १७. संगति.

६६. ढेंकणाचे संगें हिरा जो भंगला । कुसंगें नाडला साधु तैसा ॥ १ ॥ ओढाळाच्या संगें सात्विकें* नासलीं । क्षण एक नाडलीं समागमें ॥ २ ॥ डांकाचे संगती सोनें हीन झालें । मोल तें तुटलें लक्ष कोडी ॥ ३ ॥ विषानें पक्वान्नें गोड कडू झालीं । कुसंगानें केली तैसी परी ॥ ४ ॥ भावें तुका ह्मणे सत्संग हा बरा । कुसंग हा फेरा चौऱ्याशींचा ॥ ५ ॥

६७. कस्तुरी भिनली जये मृत्तिके । तयेसी आणिकें कैसी सरी ॥ १ ॥ लोखंडाचे अंगीं लागतां परिस । तया आणिकास कैसी सरी ॥ २ ॥ तुका ह्मणे मी न वंजें यातीवरी । पूज्यमान करीं वैष्णवांसी ॥ ३ ॥

६८. अग्निमाजी गेलें । अग्नि होऊन तेंच ठेलें ॥ १ ॥

( * सात्विक ) १ मी जातीवर न जातां जे खरे भक्त आहेत त्यांना पूज्य समजतों.

काय उरलें तया पण । मागील तें नाम गुण ॥ २ ॥ लोह लागे परिसा अंगीं । तोही भूषण जाला जगीं ॥ ३ ॥ सरिता ओहळ ओघा । गंगे मिळोनि झाल्या गंगा ॥ ४ ॥ चंदनाच्या वासें । तरु चंदन झाले स्पर्शें ॥ ५ ॥ तुका जडला संतां पायीं । दुजेपणा ठाव नाहीं ॥ ६ ॥

---

## १८. एकान्त.

६९. संगें वाढे सीण न घडे भजन । त्रिविध हें जन बहु देवा ॥ १ ॥ याचिमुळें आला संगाचा कांटाळा । दिसताती डोळां नानाछंद ॥ २ ॥ एकविध भाव रहावया ठाव । नेदी हा संदेह राहों चित्तीं ॥ ३ ॥ शब्दज्ञानी हित नेणती आपुलें । आणकि देखिलें नावडे त्यां ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां एकलेंचि भलें । बैसोनि उगलें राहावें तें ॥ ५ ॥

७०. वृक्ष वल्ली आह्मां सोयरीं वनचरें । पक्षी ही सुस्वरें आळविती ॥ १ ॥ येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुण दोष अंगा येत ॥ २ ॥ आकाश मंडप पृथिवी आसन । रमे येथें मन क्रीडा करी ॥ ३ ॥ कंथाकमंडलु देह उपचारा । जाणवितो वारा अवसरु ॥ ४ ॥ हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुची ॥ ५ ॥ तुका ह्मणे होय मनासी संवाद । आपुलाचि वाद अपणांसी ॥ ६ ॥

---

## १९. मन.

७१. मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचें कारण ॥ मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा तें ॥ १ ॥

मनें प्रतिमा स्थापिली । मनें मना पूजा केली । मनें इच्छा पुरविली । मन माउली सकळांची ॥ २ ॥ मन गुरु आणि शिष्य । करी आपुलेंचि दास्य । प्रसन्न आपआपणास । गति अथवा अधोगति ॥ ३ ॥ साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात । नाहीं नाहीं आन* दैवत । तुका ह्मणे दुसरें ॥ ४ ॥

७२. फजितखोरा मना किती तुज सांगों । नको कोणा लगों मागें मागें ॥ १ ॥ स्नेहवादें दुःख जडलेंसे अंगीं । निष्ठुर हें जगीं प्रेमसुख ॥ २ ॥ निंदा स्तुति कोणी करो दया माया । न धरीं चाड या सुखदुःखें ॥ ३ ॥ योगिराज कां रे न राहाती बैसोनि । एकिये आसनीं याचि गुणें ॥ ४ ॥ तुका ह्मणे मना पाहें विचारून । होईं रे कठिण वज्राऐसें ॥ ५ ॥

७३. गति अधोगति मनाची हे युक्ती । मन लावीं एकांतीं साधुसंगें ॥ १ ॥ जतन करा जतन करा । धांवतें सैरा ओढाळ तें ॥ २ ॥ मान अपमान मनाचें लक्षण लाविलिया ध्यान तेंचि करी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन उतरी भवसिंधु । मन करी बंधु चौऱ्याशींचा ॥ ४ ॥

७४. साहोनियां टांकीघाये । पाषाण देवाचि जाला पाहें ॥ १ ॥ तया रीति दृढ मन । करीं साधाया कारण ॥ २ ॥ बाण शस्त्र साहे गोळी । शूरा ठाव उंच स्थळीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे सती । अग्नि न देखे ज्या रीती ॥ ४ ॥

७५. फळ पिकें देंठीं । निमित्य वारियाची भेटी ॥१॥

---

* ( आनु ).

हा तों अनुभव रोकडा । कळों येतो खरा कुडा ॥ २ ॥ तोडिलिया बळें । वांयां जातीं काचीं फळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन । तेथें सकळ कारण ॥ ४ ॥

७६. जवळी नाहीं चित्त । काय मांडियलें प्रेत ॥१॥ कैसा पाहे चर्मदृष्टी । दीप स्नेहाच्या शेवटीं[1] ॥ २ ॥ कांतेलेंसें[2] श्वान । तैसें दिशा हिंडे मन ॥ ३ ॥ त्याचे कानीं हाणे[3] । कोण बोंब. तुका ह्मणे ॥ ४ ॥

७७. अवघ्या उपचारा । एक मनचि दातारा ॥ १ ॥ घ्यावीघ्यावी हेचि सेवा । माझी दुर्बळाची देवा ॥ २ ॥ अवघियाचा ठाव । पायांवरी जीवभाव ॥ ३ ॥ चित्ताचें आसन । तुका करितो कीर्तन ॥ ४ ॥

७८. होऊं नको कांहीं या मना आधीन । नाइकें वचन याचें कांहीं ॥ १ ॥ हटियाची गोष्टी मोडून टाकावी। सोई ही धरावी विठोबाची ॥ २ ॥ आपुले आधीन करूनियां ठेवा । नाहीं तरी जीवा घातक हें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाले जे मना आधीन । तयांसी बंधन यम करी ॥ ४ ॥

७९. काय करूं सांगतांही न कळे वर्म । उपस्थित भ्रम उपजवितो ॥ १ ॥ मन आधीं ज्याचें आलें होईल हाता । तयावरी सत्ता केली चाले ॥ २ ॥ अभुकेचे अंगीं चवी ना सवाद । मिथ्या ऐसा वाद दुराग्रह ॥ ३ ॥ तुका ह्मणे आप राखावें आपणा । संकोचोंचि कोणा नये आतां ॥ ४ ॥

---

१. दिवा विझाल्यावर. २ कांतवलेलें, पिसाळलेलें. ३ कोणी जरी त्याच्या कानाशीं ओरडलें तरी त्याला ऐकूं जाणें नाहीं.

## २०. चित्तशुद्धि.

८०. चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ॥ १ ॥ विष तें अमृत आघात[1] तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥ २ ॥ दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ॥ ३ ॥ आवडेल जीवां जीवाचिये परी । सकळां अंतरीं एक भाव ॥ ४ ॥ तुका ह्मणे कृपा केली नारायणें । जाणिजेते येणें अनुभवें ॥५॥

८१. जाऊनियां तीर्थी काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें[2] वरी वरी ॥ १ ॥ अंतरींचें शुद्ध कासयानें जालें । भूषण त्वां केलें आपणया ॥ २ ॥ वृंदावन फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा[3] मोडेचिना ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया फुंदा[4] तुह्मी ॥ ४ ॥

८२. चंदनाच्या वासें धरितील नाक । नावडे कनक न घडे हें ॥ १ ॥ साकरेची गोडी सारिखी सकळां । थोरां मोठ्यां बाळां धाकुटिया ॥ २ ॥ तुका म्हणे माझें चित्त शुद्ध होतें । तरि कां निंदिते जन मज ॥ ३ ॥

८३. याचि नांवें दोष । राहे अंतरीं किल्मिश[5] ॥ १ ॥ मना अंगीं पुण्य पाप । शुभ उत्तम संकल्प ॥ २ ॥ बीजाऐसीं फळें । उत्तम कां अमंगळें ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्त । शुद्ध करावें हें हित ॥ ४ ॥

८४. उचित जाणावें मुख्य धर्म आधीं । चित्त शुद्ध बुद्धी ठायीं स्थीर ॥ १ ॥ न घालावी धांव मनाचिये

---

१ ताडण. २ धुतलें. ३ आंतील कडुपण. ४ गर्व करतां. ५ पापवासना.

ओढी१। वचन आवडी संतांचिये ॥ २ ॥ अंतरीं या राहे वचनाचा विश्वास । न लगे उपदेश तुका म्हणे ॥ ३ ॥

८५. काय काशी करिती गंगा । भीतरिं चांगा नाहीं तो ॥ १ ॥ अधर्णी कुचर बाहेर तैसा । नये रसा पाकासी ॥ २ ॥ काय टिळे करिती माळा । भाव खळा नाहीं त्या ॥ ३ ॥ तुका म्हणे प्रेमेंविण । बोले भुंके अवघा शीण ॥ ४ ॥

८६. नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ॥१॥ तैसी चित्तशुद्धि नाहीं । तेथें बोध करील काई ॥ २ ॥ वृक्ष न धरीं पुष्पफळ । काय करील वसंतकाळ ॥ ३ ॥ प्राण गेलिया शरीर । काय करील वेव्हार ॥ ४ तुका ह्मणे जीवनेंविण । पीक नव्हे नव्हे जाण ॥ ५ ॥

८७. वचनेंचि व्हावें आपण उदार । होइल विश्वंभर संतुष्टाचि ॥ १ ॥ सत्यसंकल्पाचीं फळें बीजाऐशीं । शुद्ध नाहीं नासी पावों येत ॥ २ ॥ वंचिलिया काय येतसे उपेगा । शरीर हें नरकाचेंचि आळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीव जितां थारे लावा । पडलिया गोवा देशधडी ॥ ४ ॥

८८. मीच विखळ मीच विखळ । येर सकळ बहु वरें ॥ १ ॥ पाहिजे हें क्षमा केलें । येणें बोलें विनवणी ॥ २ ॥ मीच माझें मीच माझें । झालें ओझें अन्याय ॥३॥ आधीं आंचवला आधीं आंचवला । तुका झाला निमनुष्य ॥ ४ ॥

---

१ पापी.

## २१. आत्मस्थिति.

८९. अंगीं ज्वर तया नावडे साकर । जन तो इतर गोडी जाणे ॥ १ ॥ एकाचिये तोंडीं पडिली ते माती । अवघे ते खाती पोटभरी ॥ २ ॥ चारितां बळें येत असे दांतीं । मागोनियां घेती भाग्यवंत ॥ ३ ॥ तुका ह्मणे नसे संचित हें बरें । तयासि दुसरें काय करी ॥ ४ ॥

---

९०. आंधळ्यासि जन अवघेचि आंधळे । आपणासि डोळे दृष्टी नाहीं ॥ १ ॥ रोग्या विषतुल्य लागें हें मिष्टान्न तोंडासी कारण चवी नाहीं ॥ २ ॥ तुका ह्मणे शुद्ध नाहीं जो आपण । तया त्रिभुवन अवघें खोटें ॥ ३ ॥

९१. न लगे चंदना पुसावा परिमळ । वनस्पतिमेळ हाकारुनि ॥ १ ॥ अंतरींचें धांवें स्वभावें बाहेरी । धरितांही परी आवरेना ॥ २ ॥ सूर्य नाहीं जागें करीत या जना । प्रकाश किरणा कर म्हूण ॥ ३ ॥ तुका ह्मणे मेघ नाचवी मयूरें । लपवितां खरें येत नाहीं ॥ ४ ॥

९२. चंदन तो चंदनपणें । सहजगुणें संपन्न ॥ १ ॥ वेधलिया धन्य जाती भाग्यें होती सन्मुख ॥ २ ॥ परिसा-अंगीं परिसपण । बाणोनि तें राहिलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कैंची खंती । सुजाती ते टांकणी[1] ॥ ४ ॥

९३. जेवीं नवज्वरें तापलें शरीर । लागे तया क्षीर विषतुल्य ॥ १ ॥ तेवीं परमार्थ जीहीं दुराविला । तयालागीं

---

१ तुका ह्मणे अशाला खंती कशाची ते आपल्या जातीचा उत्तम गुण टाकीत नाहींत.

झालों संन्निपात ॥ २ ॥ कामिनी जयाच्या जाहाली नेत्रासी । देखी तो चंद्रासी पीतवर्ण ॥ ३ ॥ तुका ह्मणे मद्यपानाची आवडी । न रुचे त्या गोडी नवनीताची ॥४॥

९४. माकडा दिसती कंवटी नारळा । भोक्ता तो निराळा वरील सारी ॥ १ ॥ एका रस एका तोंडीं पडे माती । आपुलाले नेती विभाग ते ॥ २ ॥ सुनियांसी क्षीर चारिल्या ओकवी । भोक्ता तो सेवी धणीवरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मूर्ख वागविती भार । नेतील तें सार परीक्षक ॥ ४ ॥

९५. नमस्कारी भूतें विसरोनि याती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ १ ॥ परउपकारीं वेचियल्या शक्ती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ २ ॥ द्वैताद्वैतभाव नाहीं जया चित्तीं । तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥ ३ ॥ जयाचिये वाचे नये निंदास्तुती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ ४ ॥ उचित अनुचित जाणे धर्मनीती । दृढ भाव भक्ति मानव तो ॥ ५ तुकयाबंधु ह्मणे वरकड ते येर । संसाराचे खर भारवाही ॥ ६ ॥

## २२. बोलणें आणि आचरण.

९६. ह्मणवितों दास ते नाहीं करणी । आंत वरी दोन्ही भिन्न भाव ॥ १ ॥ गातों नाचतों तें दाखवितों जना । प्रेम नारायणा नाहीं अंगीं ॥ २ ॥ पाविजे तें वर्म न कळेचि कांहीं । बुडालों या डोहीं दंभाचिया ॥ ३ ॥ भांडवल काळें हातोहातीं नेलें । माप या लागलें आयु-

ष्यासी ॥ ४ ॥ तुका ह्मणे वांयां गेलों ऐसा दिसें । होईल या हांसें लौकिकांचें ॥ ५ ॥

९७. बोलविसी तैसें आणीं अनुभवा । नाहीं तरी देवा विटंबना ॥ १ ॥ मिठेंविण काय करावें मिष्टान्न । शव जीवेंवीण शृंगारिलें ॥ २ ॥ संपादणीविण विटंबिलें सोंग । गुणेंविण चांग रूप हीन ॥ ३ ॥ कन्यापुत्रेंविण मंगलदायकें । वेचिलें हें फिकें द्रव्य तरी ॥ ४ ॥ तुका ह्मणे तैसी होते मज परी । न देखें अंतरीं प्रेमभाव ॥ ५ ॥

९८. जैसें दावी तैसा राहे । तरि कां देव [२]दुरी आहे ॥ १ ॥ दुःख पावायाचें मूळ । रहणी ठाव नाहीं ताळ ॥ २ ॥ माळमुद्रांवरी । कैंचा सोंगें जोडे हरि ॥३॥ तुका ह्मणे देखें । ऐसे परीचीं बहुतेकें ॥ ४ ॥

९९. बोले तैसा चाले । त्याचीं वंदीन पाउलें ॥ १ ॥ अंगें झाडीन अंगण । त्याचें दासत्व करीन ॥ २ ॥ त्याचा होईन किंकर । उभा ठाकेन जोडोनि कर ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवे । त्याचे चरणीं माझा भाव ॥ ४ ॥

१००. बोल बोलतां वाटे सोपें । करणी करितां टीर[३] कांपे ॥१॥ नव्हे वैराग्य सोपारें । मज बोलतां न वाटे खरें ॥२॥ विष खावें ग्रासोग्रासीं । धन्य तोचि एक सोसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे करूनि दावी । त्याचे पाय माझे जीवीं ॥ ४ ॥

१०१. ब्रह्मज्ञानाची भरोवरी । पुढिला सांगे आपण न करी ॥ १ ॥ थू थू त्याच्या तोंडावरी । व्यर्थ सिणवी

---

१ लोकांचें. २ तो केवळ देव. ३ अंग.

वैखरी ॥२॥ कथा करी वारिवरी । प्रेम नसेचि अंतरीं ॥३॥ तुका ह्मणे कवित्व करी । मान वस्तु हे आदरी ॥ ४ ॥

१०२. नका दंतकथा येथें सांगों कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥ १ ॥ अनुभव येथें पाहिजे साचार । न चलती चार आह्मांपुढें ॥ २ ॥ निवडीं वेगळें क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें पाहिजे जातीचें । येरा गाबाळाचें नाहीं काम* ॥ ४ ॥

१०३. मांडे पुऱ्या मुखें सांगों जाणे मात । तोंडीं लाळ हात चोळी रिते ॥१॥ ऐसियाच्या गोष्टी फिक्या मिठें-विण । रुचि नेदी अन्न चवी नाहीं ॥२॥ बोलों जाणे अंगीं नाहीं शूरपण । काय तें वचन जाळावें तें ॥३॥ तुका ह्मणे बहु तोंडें जे वाचाळ । तेंग तेंचि मूळ लटिक्याचें ॥ ४ ॥

## २३. भूतांच्या ठायीं ईश्वर.

१०४. भूतीं देव ह्मणोनि भेटतों या जना । नाहीं हे भावना नरनारी ॥ १ ॥ जाणे भाव पांडुरंग अंतरींचा । नलगे द्यावा साचा परिहार ॥ २ ॥ दयेसाठीं केला उपाधि-पसारा । जड जीवा तारा नाव कथा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं पडत उपवास । फिरतसे आस धरोनियां ॥ ४ ॥

१०५. विश्वीं विश्वंभर । बोले वेदांताचें सार ॥ १ ॥ जगीं जगदीश । शास्त्रें वदती सावकाश ॥ २ ॥ व्यापिलें हें नारायणें । ऐसीं गर्जती पुराणें ॥ ३ ॥ जनीं जनार्दन ।

---

* (काय काम.) १ तुका ह्मणे जे वाचाळ बहु तोंडें तें त्यांचें वडबडणें खोट्याचें मूळ. तेंग-हिंग-तोंडी लावणें.

संत बोलती वचन ॥ ४ ॥ सूर्याचिया परी तुका[1] लोकीं क्रीडा करी ॥ ५ ॥

---

## २४. संत अथवा सज्जन.

१०६. चंदनाचे हात पायही चंदन । परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥ १ ॥ दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार । सर्वांगें साकर अवघी गोड ॥ २ ॥ तुका ह्मणे तैसा सज्जनापासून । पाहातां अवगुण मिळेचि ना ॥ ३ ॥

१०७. काय सांगों आतां संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ॥ १ ॥ काय द्यावें त्यांसी व्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ॥ २ ॥ सहज बोलणें हित उपदेश । करूनि सायास शिकविती ॥ ३ ॥ तुका ह्मणे वत्स धेनुवेच्या चित्तीं । तैसे मज येती सांभाळीत ॥ ४ ॥

१०८. जे कां रंजले गांजले । त्यांसि ह्मणे जो आपुले ॥ १ ॥ तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥२॥ मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥ ३ ॥ ज्यासि आपंगितां नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥ दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥ तुका ह्मणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥

१०९. अर्भकाचे[2] साठीं । पंतें[3] हातीं धरिली पाटी ॥ ॥ १ ॥ तैसे संत जगीं । क्रिया करुनी दाविती अंगीं ॥२॥ बाळकाचे चाली । माता जाणुनि पाउल घाली ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाव । जनासाठीं उदकीं ठाव ॥ ४ ॥

---

१ सांभाळणारा. २ बालक. ३ पंतोजीनें.

वैखरी ॥२॥ कथा करी वारेवरी । प्रेम नसेचि अंतरीं ॥३॥ तुका ह्मणे कवित्व करी । मान वस्तु हे आदरी ॥ ४ ॥

१०२. नका दंतकथा येथें सांगों कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥ १ ॥ अनुभव येथें पाहिजे साचार । न चलती चार आह्मांपुढें ॥ २ ॥ निवडीं वेगळें क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें पाहिजे जातीचें । येरा गाबाळाचें नाहीं काम* ॥ ४ ॥

१०३. मांडे पुऱ्या मुखें सांगों जाणे मात । तोंडीं लाळ हात चोळी रिते ॥१॥ ऐसियाच्या गोष्टी फिक्या मिठें-विण । रुचि नेदी अन्न चवी नाहीं ॥२॥ बोलों जाणें अंगीं नाहीं शूरपण । काय तें वचन जाळावें तें ॥३॥ तुका ह्मणे बहु तोंडें जे वाचाळ । तेंग तेंचि मूळ लटिक्याचें ॥ ४ ॥

## २३. भूतांच्या ठायीं ईश्वर.

१०४. भूतीं देव ह्मणोनि भेटतों या जना । नाहीं हे भावना नरनारी ॥ १ ॥ जाणे भाव पांडुरंग अंतरींचा । नलगे द्यावा साचा परिहार ॥ २ ॥ दयेसाठीं केला उपाधि-पसारा । जड जीवा तारा नाव कथा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं पडत उपवास । फिरतसे आस धरोनियां ॥ ४ ॥

१०५. विश्वीं विश्वंभर । बोले वेदांताचें सार ॥ १ ॥ जगीं जगदीश । शास्त्रें वदती सावकाश ॥ २ ॥ व्यापिलें हें नारायणें । ऐसीं गर्जती पुराणें ॥ ३ ॥ जनीं जनार्दन ।

---

* (काय काम.) १ तुका ह्मणे जे वाचाळ बहु तोंडें तें त्यांचें वडबडणें खोट्याचें मूळ. तेंग-हिंग-तोंडी लावणें.

संत बोलती वचन ॥ ४ ॥ सूर्याचिया परी तुका[1] लोकीं क्रीडा करी ॥ ५ ॥

---

### २४. सत अथवा सज्जन.

१०६. चंदनाचे हात पायही चंदन । परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥ १ ॥ दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार । सर्वांगें साकर अवघी गोड ॥ २ ॥ तुका ह्मणे तैसा सज्जनापासून । पाहातां अवगुण मिळेचि ना ॥ ३ ॥

१०७. काय सांगों आतां संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ॥ १ ॥ काय द्यावें त्यांसी व्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ॥ २ ॥ सहज बोलणें हित उपदेश । करूनि सायास शिकविती ॥ ३ ॥ तुका ह्मणे वत्स धेनुवेच्या चित्तीं । तैसे मज येती सांभाळीत ॥ ४ ॥

१०८. जे कां रंजले गांजले । त्यांसि ह्मणे जो आपुले ॥ १ ॥ तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥२॥ मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥ ३ ॥ ज्यासि आपंगितां नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥ दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥ तुका ह्मणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥

१०९. अर्भकाचे[2] साठीं । पंतें[3] हातीं धरिली पाटी ॥ ॥ १ ॥ तैसे संत जगीं । क्रिया करुनी दाविती अंगीं ॥२॥ बाळकाचे चाली । माता जाणुनि पाउल घाली ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाव । जनासाठीं उदकीं ठाव ॥ ४ ॥

---

१ सांभाळणारा. २ बालक. ३ पंतोजीनें.

११०. हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥१॥ तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ॥ २ मोहरा तोचि अंगें । सूत न जळे ज्याचे संगें ॥ ३ । तुका ह्मणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥ ४ ॥

१११. काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ थोरीव सांडिली आपुली परिसें । नेणे शिवों कैसें लोखंडासी ॥ २ ॥ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ॥ ३ ॥ भूतांची दया हें भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ॥५॥

११२. संतांचिया गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ॥ १ ॥ तेथें मी राहीन होऊनि याचक । घालितील भीक तेचि मज ॥ २ ॥ संतांचिया गांवीं वैरो भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥ ३ ॥ संतांचें भोजन अमृताचें पान । करितीं कीर्तन सर्वकाळ ॥ ४ ॥ संतांचा उदीम उपदेशाची पेंठ । प्रेमसुख साटीं घेती देती ॥ ५ ॥ तुका ह्मणे तेथें आणिक नाहीं परी । ह्मणोनि भिकारी झालों त्यांचा ॥ ६ ॥

११३. लेंकराचें हित । वाहे माउलीचें चित्त ॥ १ ॥ ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती ॥ २ ॥ पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझें । तैसें तुह्मां संतां ओझें ॥ ४ ॥

११४. देव वसे चित्तीं । त्याची घडावी संगती ॥१॥

---

१ हातोडा. २ खोट्याचा. ३ अमित. ४ व्यापार. ५ बदला.

ऐसें आवडतें मना । देवा पुरवावी वासना ॥ २ ॥ हरि-जनासी भेटी । नहो अंगसंगें तुटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे जिणें । भलें संतसंघट्टणें ॥ ४ ॥

११५. वैराग्याचें भाग्य । संतसंग हाचि लाभ ॥ १ ॥ संतकृपेचे हे दीप । करी साधकां[1] निष्पाप ॥ २ ॥ तोचि देवभक्त । भेदाभेद नाहीं ज्यास ॥ ३ ॥ तुका प्रेमें नाचे गाये । गाणियांत विरोन जाये ॥ ४ ॥

११६. नव्हती ते संत करितां कवित्व । संतांचे ते आप्त नव्हती संत ॥१॥ येथें नाहीं वेश सरत आडनांवें[2] । निवडे घावडाव व्हावा अंगीं ॥ २ ॥ नव्हती ते संत धरितां भोपळा । करितां वाकळा[3] प्रावरण ॥ ३ ॥ नव्हती ते संत करितां कीर्तन । सांगतां पुराणें नव्हती संत ॥ ४ ॥ नव्हती ते संत वेदाच्या पठणें । कर्म आचरणें नव्हती संत ॥ ५ ॥ नव्हती संत करितां तप तीर्थाटण । सेविलिया वन नव्हती संत ॥ ६ ॥ नव्हती संत माळा-मुद्रांच्या भूषणें । भस्मउद्‌ळणें[4] नव्हती संत ॥ ७ ॥ तुका ह्मणे नाहीं निरसला देहे । तों अवघे हे संसारिक ॥ ८ ॥

११७. जिचें पीडे बाळ । प्राण तियेचा विकळ[5] ॥१॥ ऐसा मातेचा स्वभाव । सूत्र दोरी एक जीव ॥ २ ॥ सुखाची विश्रांती । उमटे मातेचिये चित्तीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे संत । तुह्मीं बहु कृपावंत ॥ ४ ॥

---

१ शिष्य. २ येथें वेष, आडनांव सरत नाहीं, चालत नाहीं. घाव निवडतो, डाव निवडतो. घाव डाव ह्या कसोटीनें संत निवडला जातो. ३ फाटका कांबळा. ४ भस्म लावणें. ५ दिव्हळ.

११०. हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥ ॥१॥ तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ॥ २ ॥ मोहरा तोचि अंगें । सूत न जळे ज्याचे संगें ॥ ३ ॥ तुका ह्मणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥ ४ ॥

१११. काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ थोरीव सांडिली आपुली परिसें । नेणे शिवों कैसें लोखंडासी ॥ २ ॥ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ॥ ३ ॥ भूतांची दया हें भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ॥५॥

११२. संतांचिया गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ॥ १ ॥ तेथें मी राहीन होऊनि याचक । घालितील भीक तेचि मज ॥ २ ॥ संतांचिया गांवीं वैरो भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥ ३ ॥ संतांचें भोजन अमृताचें पान । करिती कीर्तन सर्वकाळ ॥ ४ ॥ संतांचा उदीमें उपदेशाची पेंठ । प्रेमसुख साटीं घेती देती ॥ ५ ॥ तुका ह्मणे तेथें आणिक नाहीं परी । ह्मणोनि भिकारी झालों त्यांचा ॥ ६ ॥

११३. लेंकराचें हित । वाहे माउलीचें चित्त ॥ १ ॥ ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती ॥ २ ॥ पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझें । तैसें तुह्मां संतां ओझें ॥ ४ ॥

११४. देव वसे चित्तीं । त्याची घडावी संगती ॥१॥

---

१ हातोडा. २ खोड्याचा. ३ अमित. ४ व्यापार. ५ बदला.

११०. हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥
॥१॥ तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ॥ २ ॥
मोहरा तोचि अंगें । सूत न जळे ज्याचे संगें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥ ४ ॥

१११. काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ थोरीव सांडिली आपुली परिसें । नेणे शिवों कैसें लोखंडासी ॥ २ ॥ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ॥ ३ ॥ भूतांची दया हें भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्त्रवतसे ॥५॥

११२. संतांचिया गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ॥ १ ॥ तेथें मी राहीन होऊनि याचक । घालितील भीक तेचि मज ॥ २ ॥ संतांचिया गांवीं वैरो भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥ ३ ॥ संतांचें भोजन अमृताचें पान । करिती कीर्तन सर्वकाळ ॥ ४ ॥ संतांचा उदीम उपदेशाची पेंठ । प्रेमसुख साटीं घेती देती ॥ ५ ॥ तुका ह्मणे तेथें आणिक नाहीं परी । ह्मणोनि भिकारी झालों त्यांचा ॥ ६ ॥

११३. लेंकराचें हित । वाहे माउलीचें चित्त ॥ १ ॥ ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती ॥ २ ॥ पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझें । तैसें तुह्मां संतां ओझें ॥ ४ ॥

११४. देव वसे चित्तीं । त्याची घडावी संगती ॥१॥

---

१ हातोडा. २ खोट्याचा. ३ अमित. ४ व्यापार. ५ बदला.

ऐसें आवडतें मना । देवा पुरवावी वासना ॥ २ ॥ हरि-जनासी भेटी । नहो अंगसंगें तुटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे जिणें । भलें संतसंघट्टणें ॥ ४ ॥

११५. वैराग्याचें भाग्य । संतसंग हाचि लाभ ॥ १ ॥ संतकृपेचे हे दीप । करी साधकां[1] निष्पाप ॥ २ ॥ तोचि देवभक्त । भेदाभेद नाहीं ज्यास ॥ ३ ॥ तुका प्रेमें नाचे गाये । गाणियांत विरोन जाये ॥ ४ ॥

११६. नव्हती ते संत करितां कवित्व । संतांचे ते आप्त नव्हती संत ॥१॥ येथें नाहीं वेश सरत आडनांवें[2]। निवडे घावडाव व्हावा अंगीं ॥ २ ॥ नव्हती ते संत धरितां भोपळा । करितां वाकळा[3] प्रावरण ॥ ३ ॥ नव्हती ते संत करितां कीर्तन । सांगतां पुराणें नव्हती संत ॥ ४ ॥ नव्हती ते संत वेदाच्या पठणें । कर्म आचरणें नव्हती संत ॥ ५ ॥ नव्हती संत करितां तप तीर्थाटण । सेविलिया वन नव्हती संत ॥ ६ ॥ नव्हती संत माळा-मुद्रांच्या भूषणें । भस्मउद्धूळणें[4] नव्हती संत ॥ ७ ॥ तुका ह्मणे नाहीं निरसला देहे । तों अवघे हें संसारिक ॥ ८ ॥

११७. जिचें पीडे बाळ । प्राण तियेचा विकळ[5] ॥१॥ ऐसा मातेचा स्वभाव । सूत्र दोरी एक जीव ॥ २ ॥ सुखाची विश्रांती । उमटे मातेचिये चित्तीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे संत । तुह्मीं बहु कृपावंत ॥ ४ ॥

---

१ शिष्य. २ येथें वेष, आडनांव सरत नाहीं, चालत नाहीं. घाव निवडतो, डाव निवडतो. घाव डाव ह्या कसोटीनें संत निवडला जातो. ३ फाटका कांबळा. ४ भस्म लावणें. ५ विव्हळ.

११८. दह्यांचिया अंगीं निघे ताक लोणी । एका मोलें दोन्ही मागों नये ॥ १ ॥ आकाशाचे पोटीं चंद्र तारां-गणें । दोहींशीं समान पाहों नये ॥ २ ॥ पृथ्वीच्या पोटीं हीरा गारगोटी । दोहींसी संसाटी करूं नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे तैसे संत आणि जन । दोहींसी समान भजूं नये ॥४॥

११९. मऊ मेणाहूनी आह्मी विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥ १ ॥ मेले जित असों निजलियां जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं ॥ २ ॥ भले तरी देऊं कंब-रेची लंगोटी । नाठ्याळाचे काठी देऊं माथां ॥ ३ ॥ माय-बापाहूनि बहु मायावंत । करूं घातपात शत्रुहूनि ॥ ४ ॥ अमृत तें काय गोड आह्मांपुढें । विष तें बापुडें कडू किती ॥ ५ ॥ तुका ह्मणे आह्मी अवघेचि गोड । ज्याचें पुरे कोड त्याचेपरि ॥ ६ ॥

१२०. अमृताचीं फळें अमृताची वेली । तेचि पुढें चाली बीजाचीही ॥ १ ॥ ऐसियांचा संग देईं नारायणा । बोलावा वचना जयाचिया ॥ २ ॥ उत्तम सेवन सितळ कंठासी । पुष्टी कांती तैसी दिसे वरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तैसें होईजेत संगें । वास लागे अंगें चंदनाच्या ॥ ४ ॥

१२१. पवित्र सोंवळीं । एक तींच भूमंडळीं ॥ १ ॥ ज्यांचा आवडता देव । अखंडित प्रेमभाव ॥ २ ॥ तींच भाग्यवंतें । सरतीं पुरतीं धनवित्तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । त्यांची केल्या पावे सेवा ॥ ४ ॥

१२२. मुखें बोले ब्रह्मज्ञान । मनीं धन अभिमान ॥१॥

---

१ साम्य. २ परिपूर्ण.

ऐशियाचे करितां सेवा । काय सुख होय जीवा[1] ॥ २ ॥ पोटासाठीं संत । झाले कलींत बहुत ॥ ३ ॥ विरळा ऐसा कोणी । तुका त्यासी लोटांगणीं ॥ ४ ॥

१२३. आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ॥ १ ॥ कुळीं कन्यापुत्र होती जीं सात्विक । तयाचा हरिख[1] वाटे देवा ॥ २ ॥ गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज घडो त्यांची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ॥ ४ ॥

१२४. संतांच्या धिक्कारें अमंगळ जिणें । विश्वशत्रु तेणें[2] सांडी परी ॥ १ ॥ कुळ आणि रूप वांयां संसार । गेला भरतार[3] मोकलितां ॥ २ ॥ मूळ राखे तया फळा काय उणें । चतुर लक्षणें राखों जाणे ॥ ३ ॥ तुका ह्मणे सायास तो एके ठायीं । दीप हातीं तई अवघें बरें ॥ ४ ॥

१२५. नाहीं संतपण मिळत हें हाटीं । हिंडतां कपाटीं[4] रानीं वनीं ॥ १ ॥ नये मोल देतां धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें ॥ २ ॥ तुका ह्मणे मिळे जिवाचिये साटीं । नाहीं तरी गोष्टी बोलों नये ॥ ३ ॥

---

## २५ दुर्जन.

१२६. आवडे सकळां मिष्टान्न । रोग्या विषा त्यासमान ॥ १ ॥ दर्पण नावडे तया एका । ठाव नाहीं ज्याच्या नाका ॥ २ ॥ तुका ह्मणे तैसा खळा । उपदेशाचा कंटाळा ॥ ३ ॥

---

१ आनंद. २ विश्वशत्रु जेणें परी तेणें परी तो सांडी=विश्वशत्रु समजून त्याचा त्याग करावा. ३ नवरा. ४ दारोदार.

१२७. किती उपदेश करावा खळासी । नावडे तयासी बरें कांहीं ॥ १ ॥ शुद्ध हे वासना नाहीं चांडाळाची । होळी आयुष्याची केली तेणें ॥ २ ॥ नाहीं शुद्ध भाव नाइके वचन । आपणा आपण नाडियेलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्यासी काय दिला जन्म । करितो बडबड रात्रंदिवस ॥ ४ ॥

१२८. बोली मैंदाची बरवी असे । वाटे अंतरीं घालावे फांसे ॥ १ ॥ कैसा वरिवरि दिसताहे चांग । नव्हे भाविक केवळ मांग ॥ २ ॥ टिळा टोपी माळा कंठीं । अंधारीं नेउनि चेपी घांटी[1] ॥ ३ ॥ तुका ह्मणे तो केवळ पुंड । त्यावरि वाजति यमदंड ॥ ४ ॥

१२९. भोरप्यानें सोंग पालटिलें वरी । बक ध्यान करी मत्स्या जैसें ॥ १ ॥ टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं । देखों नेदी जगीं फांसे जैसे ॥ २ ॥ ढींवर[2] या मत्स्या चारा घाली जैसा । भीतरील फांसा कळों नेदी ॥ ३ ॥ खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी । कापावया नळी तयासाठीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे तैसा भला मी लोकांत । परी तूं कृपावंत पांडुरंग ॥ ५ ॥

१३०. जळो प्रेमा तैसा रंग । जाय उडोनि पतंग ॥ १ ॥ सासूसाठीं रडे सून । भाव अंतरींचा भिन्न ॥ २ ॥ मैंद मुखींचा कोंवळा । भाव अंतरीं निराळा ॥ ३ ॥ जैसी वृंदावनकांती । उत्तम धरूं नये हातीं ॥ ४ ॥ बक ध्यान धरी । सोंग करूनि मासे मारी ॥ ५ ॥ तुका ह्मणे सर्प डोले । तैसा कथेमाजी खुले[3] ॥ ६ ॥

---

१ गळा. २ कोळी. ३ सर्प डुलतो परंतु तो विषारी तसा खळ कथेमध्यें शोभतो तरी त्याचें अंतर्याम काळें कुट्ट असतें.

१३१. सापें ज्यासी खावें । तेणें प्राणासी मुकावें ॥१॥ काय लाधला दुर्जन । तोंडावरी थुंके जन ॥ २ ॥ विंचु हाणी नांगी । अग्न लावी आणिकां अंगीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाती । नरक पाउलीं चालती ॥ ४ ॥

१३२. दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडण ॥ १ ॥ लात हाणोनियां वोंरी । गुंडा वाट शुद्ध करी ॥ २ ॥ बहुतां पीडी खळ । त्याचा धरावा विटाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे नखें । काढुनि टाकिजेतीं सुखें ॥ ४ ॥

१३३. सदा सर्वकाळ अंतरीं कुटिल । तेणें गळां माळ घालूं नये ॥ १ ॥ ज्यासी नाहीं धर्म दया क्षमा शांति । तेणें अंगीं विभूती लावूं नये ॥ २ ॥ जयासी न कळे भक्तीचें महिमान । तेणें ब्रह्मज्ञान बोलों नये ॥ ३ ॥ ज्याचें मन नाहीं लागलें हातासीं । तेणें प्रपंचासी टाकूं नये ॥ ४ ॥ तुका ह्मणे ज्यासी नाहीं हरिभक्ति । तेणें भगवें हातीं धरूं नये ॥ ५ ॥

१३४. रोगिया मिष्टान्न मर्कटा चंदन । कागासी लेपन कर्पूराचें ॥ १ ॥ निर्नासिका जैसा नावडे आरिसा । मूर्खालागीं तैसा शास्त्रबोध ॥ २ ॥ दास तुका ह्मणे विठ्ठलउदारें । अज्ञानअंधेरें दूरी केलें ॥ ३ ॥

१३५. दुधाचे घागरीं मद्याचा हा बुंद । पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥ १ ॥ तैसें खळां मुखें न करावें श्रवण । अहंकारें मन विटाळलें ॥ २ ॥ काय करावीं तीं बत्तीस

---

१ गुंडा लात हाणोनिया वारी—दूर सारा. २ स्वाधीन झालें नाहीं.

१२७. किती उपदेश करावा खळासी । नावडे तयासी बरें कांहीं ॥ १ ॥ शुद्ध हे वासना नाहीं चांडाळाची । होळी आयुष्याची केली तेणें ॥ २ ॥ नाहीं शुद्ध भाव नाइके वचन । आपणा आपण नाडियेलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्यासी काय दिला जन्म । करितो बडबड रात्रंदिवस ॥ ४ ॥

१२८. बोली मैंदाची बरवी असे । वाटे अंतरीं घालावे फांसे ॥ १ ॥ कैसा वरिवरि दिसताहे चांग । नव्हे भाविक केवळ मांग ॥ २ ॥ टिळा टोपी माळा कंठीं । अंधारीं नेउनि चेपी घांटी[१] ॥ ३ ॥ तुका ह्मणे तो केवळ पुंड । त्यावरि वाजति यमदंड ॥ ४ ॥

१२९. भोरप्यानें सोंग पालटिलें वरी । बक ध्यान करी मत्स्या जैसें ॥ १ ॥ टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं । देखों नेदी जगीं फांसे जैसे ॥ २ ॥ ढींवर[२] या मत्स्या चारा घाली जैसा । भीतरील फांसा कळों नेदी ॥ ३ ॥ खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी । कापावया नळी तयासाठीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे तैसा भला मी लोकांत । परी तूं कृपावंत पांडुरंग ॥ ५ ॥

१३०. जळो प्रेमा तैसा रंग । जाय उडोनि पतंग ॥ १ ॥ सासूसाठीं रडे सून । भाव अंतरींचा भिन्न ॥ २ ॥ मैंद मुखींचा कोंवळा । भाव अंतरीं निराळा ॥ ३ ॥ जैसी वृंदावनकांती । उत्तम धरूं नये हातीं ॥ ४ ॥ बक ध्यान धरी । सोंग करूनि मासे मारी ॥ ५ ॥ तुका ह्मणे सर्प डोले । तैसा कथेमाजी खुले[३] ॥ ६ ॥

---

१ गळा. २ कोळी. ३ सर्प डुलतो परंतु तो विषारी तसा खळ कथेमध्यें शोभतो तरी त्याचें अंतर्याम काळें कुट्ट असतें.

१३१. सापें ज्यासी खावें । तेणें प्राणासी मुकावें ॥१॥ काय लाधला दुर्जन । तोंडावरी थुंके जन ॥ २ ॥ विंचु हाणी नांगी । अग्न लावी आणिकां अंगीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाती । नरक पाउलीं चालती ॥ ४ ॥

१३२. दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडण ॥ १ ॥ लात हाणोनियां वारी । गुंडा वाट शुद्ध करी ॥ २ ॥ बहुतां पीडी खळ । त्याचा धरावा विटाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे नखें । काढुनि टाकिजेतीं सुखें ॥ ४ ॥

१३३. सदा सर्वकाळ अंतरीं कुटिल । तेणें गळां माळ घालूं नये ॥ १ ॥ ज्यासी नाहीं धर्म दया क्षमा शांति । तेणें अंगीं विभूती लावूं नये ॥ २ ॥ जयासी न कळे भक्तीचें महिमान । तेणें ब्रह्मज्ञान बोलों नये ॥ ३ ॥ ज्याचें मन नाहीं लागलें हातासीं । तेणें प्रपंचासी टाकूं नये ॥ ४ ॥ तुका ह्मणे ज्यासी नाहीं हरिभक्ति । तेणें भगवें हातीं धरूं नये ॥ ५ ॥

१३४. रोगिया मिष्टान्न मर्कटा चंदन । कागासी लेपन कर्पूराचें ॥ १ ॥ निर्नासिका जैसा नावडे आरिसा । मूर्खालागीं तैसा शास्त्रबोध ॥ २ ॥ दास तुका ह्मणे विठ्ठलउदारें । अज्ञानअंधेरें दूरी केलें ॥ ३ ॥

१३५. दुधाचे घागरीं मद्याचा हा बुंद । पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥ १ ॥ तैसें खळां मुखें न करावें श्रवण । अहंकारें मन विटाळलें ॥ २ ॥ काय करावीं तीं बत्तीस

---

१ गुंडा लात हाणोनिया वारी—दूर सारा. २ स्वाधीन झालें नाहीं.

लक्षणें । नाक नाहीं नेणें वांयां गेलीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे अन्न जिरों नेदी माशी । आपुलिया जैशी संवसर्गें ॥ ४ ॥

१३६. कुतऱ्या ऐसें ज्याचें जिणें । संग कोणीं न करीजे ॥ १ ॥ जाय तिकडे हाडहाडी । गोऱ्हवाडीच सोइरीं ॥ २ ॥ अवगुणांचा त्याग नाहीं । खवळे पाहीं उपदेशें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कैंची लवी । ठेंग्या केत्रीं अंकुर ॥ ४ ॥

१३७. दुष्टाचें चित्त न भिने अंतरीं । जरी जन्मवरी उपदेशिला ॥ १ ॥ पालथे घागरीं घातलें जीवन । न धरीच्च जाण तेही त्याला ॥ २ ॥ जन्मा येउनि तेणें पतनचि साधिलें । तमोगुणें व्यापिलें जया नरा ॥ ३ ॥ जळो जळो हें त्याचें झालेपण । कासया हे आले संवसारा ॥ ४ ॥ पाषाण जीवनीं असतां कल्पवरी । पाहतां अंतरीं कोरडा तो ॥ ५ ॥ कुचर मुग नयेचि पाका । पाहतां सारिखा होता तैसा ॥ ६ ॥ तुका ह्मणे असे उपाय सकळां । न चले या खळा प्रयत्न कांहीं ॥ ७ ॥ ह्मणऊनि संग न करितां भला । धरितां अबोला सर्वहित ॥ ८ ॥

१३८. भुंकती तीं द्यावीं भुंकों । आपण त्यांचें नये शिकों ॥ १ ॥ भाविकांनीं दुर्जनाचें । मानूं नये कांहीं साचें ॥ २ ॥ होइल तैसें बळ । फजीत करावे ते खळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्यांचें । पाप नाहीं ताडणाचें ॥ ४ ॥

१३९. पापी तो नाठवी आपुल्या संचिता । ठेवी भगवंतावरी बोल ॥ १ ॥ भेईना करितां पापाचे डोंगर । दुर्जन पामर दुराचारी ॥ २ ॥ नाठवी तो खळ आपुली

---

१ सोडण्याला.

करणी । देवासी निंदोनि बोलतसे ॥३॥ तुका ह्मणे त्याच्या तोंडा लागो कांटी । नाहीं जया चित्तीं जगजेठी ॥ ४ ॥

१४०. निंदक तो परउपकारी । काय वर्णूं त्याची थोरी । जो रजकाहुनि भला पारी । सर्व गुणें आगळा ॥१॥ नेघे मोल धुतो फुका । पाप वरच्यावरी देखा । करीतसे साधका । शुद्ध सरते तिहीं लोकीं ॥ २ ॥ मुखसवंदेणी सांगातें । अवघें सांटविलें तेथें । जिव्हा साधण निरुतें । दोष काढी जन्माचे ॥ ३ ॥ तया ठाव यमपुरीं । वास करणें अघोरीं । त्यासी दंडण करी । तुका ह्मणे न्हाणी ते॥४॥

१४१. असो खळ ऐसे फार । आह्मां त्यांचे उपकार ॥ १ ॥ करिती पातकांची धुणी । मोल न घेतां सावणीं ॥ २ ॥ फुकाचे मजूर । ओझें वागविती भार ॥ ३ ॥ पार उतरुन ह्मणे तुका । आह्मां आपण जाती नरका ॥४॥

१४२. भाव धरी तया तारीला पाषाण । दुर्जना सज्जन काय करी ॥ १ ॥ करितां नव्हे नीट श्वानाचें हें पुच्छ । खापरा परिस काय करी ॥ २ ॥ काय करील तया साकरेचें आळें । बीज तैसीं फळें येती तया ॥ ३ ॥ तुका ह्मणे वज्र भंगे एक वेळ । कठीण हा खळ तयाहूनी ॥४॥

१४३. दुर्जनाचें अंग अवघेंचि सरळ । नर्काचा कोथळ सांटवण ॥ १ ॥ खाय अमंगळ बोले अमंगळ ।

---

१ धोण्याचें धुण्याचें पात्र. मोरी. २ त्याला ( दंडण ) शिक्षा झटली ह्मणजे तुका ह्मणे ते न्हाणी पाप धुण्याची जागा असें समज. किंवा–त्यासी दंड न करी तुका ह्मणे ती मोरी, मळ धुण्याची जागा होय. किंवा-ज्याला तो ताडण करतो त्याची तो मोरी होऊन बसतो.

उठवी कपाळ संघष्टणें ॥ २ ॥ सर्पा मंत्र चाले धरावया हातीं । खळाची ते जाती निखळची ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं न साहे उपमा । आणीक अधमा वोखव्याची ॥ ४ ॥

१४४. आणिकांच्या घातें । ज्यांचीं निवतील चित्तें ॥१॥ तेचि ओळखावे पापी । निरयवासी शीघ्रकोपी ॥ २ ॥ कान पसरोनि । ऐके वदे दुष्ट वाणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भांडा । धीर नाहीं ज्याच्या तोंडा ॥ ४ ॥

१४५. आणिकांच्यां कापिती माना । निरष्ठुरपणा पार नाहीं ॥ १ ॥ करिती बेटे उसणवारी । यमपुरी भोगावया ॥ २ ॥ सेंदराचें दैवत केलें । नवस बोले तयासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाचती पोरें । खोडितां येरें अंग दुखे ॥ ४ ॥

१४६. ज्यासी विषयाचें ध्यान । त्यासी कैंचा नारायण ॥ १ ॥ साधु कैंचा पापीयासी । काय चांडाळासी काशी ॥ २ ॥ काय पतितासी पिता । काय अधमासी गीता ॥३॥ तुका ह्मणे निरंजनीं । शठ कैंचा ब्रह्मज्ञानी ॥ ४ ॥

१४७. रासभ धुतला महा तीर्थामाजी । नव्हे जैसा तेजी शामकर्ण ॥ १ ॥ तेवीं खळा काय केल्या उपदेश । नव्हेचि मानस शुद्ध त्याचें ॥ २ ॥ सर्पासी पाजिलें शर्करापीयूष । अंतरींचें विष जाऊं नेणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे श्वाना क्षीरीचें भोजन । सवेंचि वमन जेवीं तया ॥ ४ ॥

१४८. कावळियासी नाहीं दया उपकार । काळिमा

---

१ ह्मसोबा बिरोबा इत्यादि दैवतांना कोंबडीं बकरीं यांचे नवस करतात त्या विषयीं. २ दुसऱ्यांनीं त्यांना खोटें केलें असतांना त्यांचें कपाळ उठतें.

अंतर विटाळसें ॥ १ ॥ तैसें कुजनाचें जिणें अमंगळ । घाणेरी वोंगळ वदे वाणी ॥ २ ॥ कडु भोंपळ्याचा उपचारें पाक । सेविल्या तिडीक कपाळासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे विष सांडूं नेणे साप । आदरें तें पाप त्याचे ठायीं ॥ ४ ॥

१४९. काय ढोरापुढें घालूनि मिष्टान्न । खरा विलेपन चंदनाचें ॥ १ ॥ नको नको देवा खळाची संगती । रस ज्या पंगती नाहीं कथे ॥ २ ॥ काय सेज बाज माकडा विलास । अळंकारा नास करूनि टाकी ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय पाजूनि नवनीत । सर्पा विष थीत अमृताचें ॥ ४ ॥

१५०. निंबाचिया झाडा साकरेचें आळें । आपलीं तीं फळें न सं१डीच ॥ १ ॥ तैसें अधमाचें अमंगळ चित्त । वमन तें हित करूनि सांडी ॥ २ ॥ परिसाचे अंगीं लाविलें खापर । पालट अंतर नेघे त्याचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेळू चंदनासंगतीं । काय ते नसती जवळिक ॥ ४ ॥

१५१. कावळ्याच्या गळां मुक्ताफ२ळ माळा । तरी काय त्याला भूषण शोभे ॥१॥ गजालागीं केला कस्तूरीचा लेप । तिचें तो स्वरूप काय जाणे ॥२॥ ३बैकापुढें सांगे भावार्थवचन । वाउगाची सीण होय त्यासी ॥३॥ तुका ह्मणे तैसे अभाविक जन । त्यांसी वायां सीण करूं नये ॥ ४ ॥

१५२. काय वृंदावन ४मोहियेलें गुळें । काय जिरें काळें उपचारिलें ॥१॥ तैसी अधमाची जातीच अधम । उपदेश श्रम करावा तो ॥२॥ न कळे विंचासी कुरवाळिलें अंग ।

१ सांडीच. २ मोतीं. ३ ढोंगी. ४ माखलें.

आपले ते रंग दावीतसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे नये पाकासी दगड । शूकरासी गोड जैसी विष्ठा ॥ ४ ॥

१५३. भुंकुनियां सुनें लागे हस्तीपाठीं । होऊनि हिंपुटी दुःख पावे ॥ १ ॥ काय त्या मशकें तयाचें करावें । आपुल्या स्वभावें पीडतसे ॥ २ ॥ मातलें बोकड विटवी पंचानना । घेतलें मरणा धरणें तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे संतां पीडितील खळ । घेती तोंड काळें करूनियां ॥ ४ ॥

## २६. ढोंगी लोक.

१५४. लांब लांब जटा काय वाढवूनि । पावडें घेऊनि क्रोधें चाले ॥ १ ॥ खायाचा वोळसा शिव्या दे जनाला । ऐशा तापशाला बोध कैंचा ॥ २ ॥ सेवी भांग अफू तमाखू उदंड । परि तो अखंड भ्रांतीमाजी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसा सर्वस्वें बुडला । त्यासी अंतरला पांडुरंग ॥ ४ ॥

१५५. संतचिन्हें लेउनि अंगीं । भूषण मिरविती जगीं ॥ १ ॥ पडिले दुःखाचे सागरीं । वहावले ते भवपुरीं ॥ २ ॥ कामक्रोधलोभ चित्तीं । वरिवरि दाविती विरक्ती ॥ ३ ॥ आशापाशीं बांधोनि चित्त । ह्मणती झालें आह्मी मुक्त ॥४॥ त्यांचे लागले संगती । जाली त्यांची तेचि गति ॥ ५ ॥ तुका ह्मणे शब्दज्ञानें । जग नाडियेलें तेणें ॥ ६ ॥

१५६. ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनि ह्मणती साधु ॥ १ ॥ अंगा लावूनियां राख । डोळे झांकुनि करिती पाप ॥ २ ॥ दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयांचा सोहळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगों किती । जळो तयांची संगती ॥४॥

१५७. ऐसे संत झाले कळीं । तोंडीं तमाखूची नळी ॥ १ ॥ स्नानसंध्या बुडविली । पुढें भांग वोडवली ॥ २ ॥ भांगभुर्का हें साधन । पचनीं पडे मद्यपान ॥ ३ ॥ तुका ह्मणे अवघें सोंग । तेथे कैंचा पांडुरंग ॥ ४ ॥

१५८. ऐसे नाना भेष घेऊनि हिंडती। पोटासाठीं घेती प्रतिग्रह ॥ १ ॥ परमार्थासी कोण त्यजी संवसार । सांग पां साचार नांव त्याचें ॥ २ ॥ जन्मतां संवसार त्यजियेला शुकें । तोचि निष्कळंक तुका ह्मणे ॥ ३ ॥

१५९. टिळा टोपी उंच दावी। जगीं मी एक गोसावी ॥ १ ॥ अवघा वरपंग सारा । पोटीं विषयांचा थारा ॥२॥ मुद्रा लावितां कोरोनी । मान व्हावयासी जनीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ॥ ४ ॥

१६०. डोई वाढवूनि केश । भूतें आणिती अंगास ॥ १ ॥ तरी ते नव्हती संतजन । तेथें नाहीं आत्मखुण ॥ २ ॥ मेळवूनि नरनारी । शकुन सांगती नानापरी ॥३॥ तुका ह्मणे मैंद । नाहीं त्यापाशीं गोविंद ॥ ४ ॥

१६१. दाढी डोई मुंडी मुंडुनियां सर्व । पांघुरती बरव वस्त्र काळें ॥ १ ॥ उफराटी काठी घेऊनियां हातीं । उपदेश देती सर्वत्रांसी ॥ २ ॥ चाळवुनि रांडा देऊनियां भेष । तुका ह्मणे त्यास यम दंडी ॥ ३ ॥

१६२. सांगों जाणती शकून । भूत भविष्य वर्तमान ॥ १ ॥ त्यांचा आह्मांसी कंटाळा । पाहों नावडती डोळां ॥ २ ॥ रिद्धिसिद्धींचे साधक। वाचासिद्ध होती एक ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाती । पुण्यक्षयें अधोगती ॥ ४ ॥

१६३. गुळें माखोनियां दगड ठेविला । वर दिसे भला लोकाचारीं ॥ १ ॥ अंतरीं विषयाचें लागलें पैं पिसें । बाहिरल्या वेषें भुलवी लोकां ॥ २ ॥ ऐशिया दांभिका कैंची हरिसेवा । नेणेचि सद्भावा कोणेकाळीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे येणें कैसा होय संत । विटाळलें चित्त कामक्रोधें ॥ ४ ॥

१६४. होउनी जंगम विभूति लाविती । शंख वाजविती घरोघरीं ॥ १ ॥ शिवाचें निर्माल्य तीर्थ न सेविती । घंटा वाजविती पोटासाठीं ॥ २ ॥ तुका ह्मणे त्यांसी नाहीं शिवभक्ति । व्यापार करिती संसाराचा ॥ ३ ॥

१६५. भोंदावया मीस घेऊनि संताचें । करी कुटुंबाचें दास्य सदा ॥ १ ॥ मनुष्याचे परी बोल रावा करी । रंजवी नरनारी जगामध्यें ॥ २ ॥ तिमयाचा बैल करी शिकविलें । चित्रींचें बाहुलें गोष्टी सांगें ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा जळो हे महंती । लाज नाहीं चित्तीं निसुगातें ॥ ४ ॥

१६६. मुखें सांगे ब्रह्मज्ञान । जन लोकाची कापितो मान ॥१॥ ज्ञान सांगतो जनासी । नाहीं अनुभव आपणासी ॥ २ ॥ कथा करितो देवाची । अंतरीं आशा बहु लोभाची ॥३॥ तुका ह्मणे तोचि वेडा । त्याचें हाणूनि थोबाड फोडा ॥४॥

---

## २७. दृष्टान्तपर.

१६७. लोहो परिसाशीं रूसलें । सोनेंपणासी मुकलें ॥ १ ॥ येथें कोणाचें काय गेलें । ज्याचें तेणें अनहित केलें ॥ २ ॥ गंगा आली आळश्यावरी । आळशी देखोनि पळे दूरी ॥३॥ गांवा खालील ओहळें । रागें गंगेसी न मिळे ॥४॥ तुका केशवाचा दास । गुरूसी न भजे शिष्य ॥५॥

१६८. शूकरासी विष्ठा माने सावकास । मिष्टान्नाची त्यास काय गोडी ॥ १ ॥ तेवीं अभक्तांसी आवडे पाखांड । न लगे त्यां गोड परमार्थ ॥ २ ॥ श्वानासी भोजन दिलें पंचामृत । तरी त्याचें चित्त हाडावरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्प पाजिलिया क्षीर । वमितां विखार विष झालें ॥ ४ ॥

१६९. दुर्बळा वाणीच्या एक दोनि सिद्धी । सदैवा समाधि विश्वैरूपीं ॥ १ ॥ काय त्याचें वांयां गेलें तें एक । सदा प्रेममुख सर्वकाळ ॥ २ ॥ तीर्थ देव दुरी तया भाग्यहीना । विश्व त्या सज्जना दुमदुमिलें ॥३॥ तुका ह्मणे एक वाहाती मोळिया । भाग्यें आगळिया घरा येती ॥ ४ ॥

१७०. तोंवरि तोंवरि जंबुक करि गर्जना । जंव त्या पंचानना देखिलें नाहीं ॥ १ ॥ तोंवरि तोंवरि सिंधु करि गर्जना । जंव त्या अगस्तिं ब्राह्मणा देखिलें नाहीं ॥ २ ॥ तोंवरि तोंवरि शूरत्वाच्या गोष्टी । जंव परमाईचा पुत्र दृष्टी देखिला नाहीं ॥ ३ ॥ तोंवरि तोंवरि माळामुद्रांचीं भूषणें । जंव तुक्याचें दर्शन जालें नाहीं ॥ ४ ॥

१७१. तोंवरि तोंवरि शोभतील गारा । जंव नाही हिरा प्रकाशला ॥ १ ॥ तोंवरि तोंवरि शोभती दीपिका । नुगवतां एका भास्करासी ॥ २ ॥ तोंवरि तोंवरि सांगती संतांचिया गोष्टी । जंव नाहीं भेटी तुक्यासवें ॥ ३ ॥

१७२. माकडें मुठीं धरिले फुटाणे । गुंतले ते नेणे

---

१ भाग्यहीनाला एक दोन सिद्धी प्राप्त होतात-नुसतें वक्तृत्व प्राप्त होतें. परंतु भाग्यवंतांना विश्वाशीं तन्मयता, प्राप्त होते.
२ अगस्ति ऋषीनें आचमन करून समुद्र पिऊन टाकला होता.

हात तेथें ॥ १ ॥ काय तो तयाचा लेखावा अन्याय । हित नेणें काय आपुलें तें ॥ २ ॥ शुकें नळिकेशीं गोवियेले पाय । विसरोनि जाय पक्ष दोन्ही ॥ ३ ॥ तुका ह्मणे एक ऐसे पशु जीव । न चले उपाय कांहीं तेथें ॥४॥

१७३. दुबळें सदैवा । ह्मणे नागवेल केव्हां ॥ १ ॥ आपणा ऐसें करूं त्या पाहे । स्वभावासी कारिल काये ॥२॥ मूढ सभेआंत । इच्छी पंडिताचा घात ॥ ३ ॥ गांढें देखुनियां शूरा । उगें करितें बुरबुरा ॥ ४ ॥ आणिकांचा हेवा । न करीं शरण जांई देवा ॥ ५ ॥ तुका ह्मणे किती । करूं दुष्टांची फजिती ॥ ६ ॥

१७४. हालवूनि खुंट । आधीं करावा बळकट ॥१॥ मग तयाच्या आधारें । करणें अवघेचि बरें ॥ २ ॥ सुख दुःख साहे । हर्षामर्षी भंगा नये[1] ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवें । आधीं मरोनि रहावें ॥ ४ ॥

१७५. मृगाचिये अंगीं कस्तूरीचा वास । असे ज्याचा त्यास नसे ठावा ॥ १ ॥ भाग्यवंत घेती वेंचूनियां मोलें । भारवाही मेले वाहतां वोझें ॥ २ ॥ चंद्रामृतें तृप्ति पारणें[2] चकोरा । भ्रमरासी चार सुगंधाचा ॥ ३ ॥ अधिकारी येथें घेती हातवटी । परीक्षवंता दृष्टीं रत्न जैसें ॥ ४ ॥ तुका ह्मणे काय अंधळिया हातीं । दिलें जैसें मोतीं वांयां जाय॥५॥

१७६. कमोदिनी काय जाणे तो परिमळ । भ्रमर सकळ भोगीतसे ॥ १ ॥ तैसें तुज ठावें नाहीं तुझें नाम । आह्मीच तें प्रेमसुख जाणों ॥ २ ॥ माते तृण बाळा

१ आनंदात विसर पडूं देऊं नये. २ भोजन.

दुधाची ते गोडी । ज्याची नये जोडी त्यासी कामा ॥३॥ तुका ह्मणे मुक्ताफळ शिंपीपोटीं । नाहीं त्याची भेटी भोग तिये ॥ ४ ॥

१७७. साधनें तरी हींच दोन्ही । जरी कोणी साधील ॥ १ ॥ परद्रव्य परनारी । यांचा धरी विटाळ ॥ २ ॥ देवभाग्यें[1] घरा येती । संपत्ती त्या सकळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे तें शरीर । गृह भांडार देवाचें ॥ ४ ॥

१७८. लटिकें तें रुचे । साच कोणांही न पचे ॥१॥ ऐसा माजल्याचा गुण । भोगें कळों येईल शीण ॥ २ ॥ वाढवी ममता । नाहीं वरपडला तो दूतां ॥ ३ ॥ कांहीं न मनी हेकड । तुका उपदेश माकड ॥ ४ ॥

१७९. बरें जालीयाचे अवघे सांगाती । वाइटाचे अंतीं कोणी नाहीं ॥ १ ॥ नोहे मातापिता नोहे कांता सुत । इतरांची मात काय सांगों ॥ २ ॥ तुका ह्मणे जन दुतोंडी सावज[2] । सांपडे सहज तिकडे धरी ॥ ३ ॥

१८०. परद्रव्य परनारी । अभिलाषूनि नाक धरी ॥ १ ॥ जळो तयाचा आचार । व्यर्थ भार वाहे खर ॥२॥ *सोंवळ्याची स्फीती । क्रोधें विटाळला चित्तीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे सोंग । दावी बाहेरील रंग ॥ ४ ॥

---

२८. बोधपर.

१८१. दर्पणासि बुजे । नखटें तोंड पळवी लाजे॥१॥ गुण ज्याचे जो अंतरीं । तोचि त्यासी पीडा करी ॥ २ ॥

---

१ देवाचें वैभव. २ पशू. * ( सोहोळ्याची स्थिति. )

चोरा रुचे निशी । देखोनियां विटे शशी ॥ ३ ॥ तुका ह्मणे जन । देवा असे भाग्यहीन ॥ ४ ॥

१८२. मुळाचिया मुळें । दुःखें वाढती सकळें ॥ १ ॥ ऐसा योगियांचा धर्म । नव्हे वाढवावा श्रम ॥ २ ॥ न कळे आवडी । कोण आहे कैसी घडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे थित । [1]दुःख पाववावें चित्त ॥ ४ ॥

१८३. पर्जन्यें पडावें आपुल्या स्वभावें । आपुलाल्या दैवें पीके भूमि ॥ १ ॥ बीज तेंचि फळ येईल शेवटीं । लाभहानीतुटी ज्याची तया ॥ २ ॥ दीपाचिये अंगीं नाहीं दुजा भाव । धणी चोर साव सारिखेचि ॥ ३ ॥ काउळें ढोंपरा कंकर तित्तिरा । राजहंसा चारा मुक्ताफळें ॥ ४ ॥ तुका ह्मणे येथें आवडी कारण । पिकला नारायण जयां तैसा ॥ ५ ॥

१८४. आपणा लागे काम वाण्याघरीं गुळ । त्याचें याति कुळ काय कीजे ॥ १ ॥ उकरड्यावरी वाढली तुळसी । टाकावी ते कैसी ठायागुणें ॥ २ ॥ गाईचा जो भक्ष अमंगळ खाय । तिचें दुध काय सेवूं नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय सलपटाशीं काज । फणसांतील बीज काढुनि घ्यावें ॥ ४ ॥

१८५. वाईटानें भलें । हीनें दाविलें चांगलें ॥ १ ॥ एकाविण एका । कैंचें मोल होतें फुका ॥ २ ॥ विषें दाविलें अमृत । कडू गोड घातें हित ॥ ३ ॥ काळिमेनें ज्योती । दिवस कळों आली राती ॥ ४ ॥ उंच निंच गारा । हिरा परिस मोहरा ॥ ५ ॥ तुका ह्मणे भले । ऐसे नष्टांनीं कळले ॥ ६ ॥

---

१ मनाला दुःख द्यावें हें व्यर्थ.

१८६. सिंचन करितां मूळ । वृक्ष ओलावे सकळ ॥ १ ॥ नको पृथकाचे भरीं । पडों एक मूळ धरीं ॥ २ ॥ पाण-चोऱ्याचें दारें । वरिल दटावें तें थोर ॥ ३ ॥ वश झाला राजा । मग आपुल्या त्या प्रजा ॥ ४ ॥ एक चिंतामणी । फिटे सर्व सुखधणी ॥ ५ ॥ तुका ह्मणे धांवा । आहे पंढरीं विसांवा ॥ ६ ॥

१८७. कल्पतरु रुंया नव्हती बाभुळा । पुरविती फळा ईंच्छितिया ॥ १ ॥ उदंड त्या गाई ह्मैसी आणि शेळ्या । परि त्या निराळ्या कामधेनु ॥ २ ॥ तुका ह्मणे देव दाख-वील दृष्टी । तयासवें भेटी थोर पुण्य ॥ ३ ॥

१८८. काठिण नारळाचें अंग । बाहेरी भीतरी तें चांग ॥ १ ॥ तैसा करीं कां विचार । शुद्ध कारण अंतर ॥ २ ॥ वरि कांटे फणसफळा । माजि अंतरीं जिव्हाळा ॥ ३ ॥ ऊंस बाहेरी काठिण काळा । माजी रसाचा जिव्हाळा ॥ ४ ॥ मिठें रुचविलें अन्न । नये सतंत कारणें ॥ ५ ॥

१८९. बीज पेरे सेतीं । मग गाडेवरी वाहती ॥ १ ॥ वांयां गेलें ऐसें दिसे । लाभ त्याचे अंगीं वसे ॥ २ ॥ पाल्याची जतन । तरी प्रांतीं येती कण ॥ ३ ॥ तुका ह्मणे आळा । उदक देतां लाभे फळा ॥ ४ ॥

---

१ फुटक्या मडक्याचें दार ह्मणजे तोंडच बंद केलें तर सर्व छिद्रें आपोआप बंद होतात. २ एक चिंतामणी जवळ असला कीं सर्व प्रकारचें सुख पूर्ण प्राप्त होतें. ३ रुईचें झाड. ४ इच्छा करणारास. ५ रसभरित रसाळ. ६ मिठानें अन्नाला रुचि येते परंतु तें स्वतंत्र करितां नये; स्वतंत्रपणें त्यास गोडी नाहीं.

१९०. लेंकरा लेववी माता अलंकार । नाहीं अंतपार आवडीसी ॥ १ ॥ कृपेचें पोसणें तुमचें मी दीन । आजि संतजन मायबाप ॥ २ ॥ आरुष उत्तरीं संतोषे माउली । कवळुनि घाली हृदयांत ॥ ३ ॥ पोटीं आलें त्याचे नेणे गुणदोष । कल्याणची असे असावें हें ॥ ४ ॥ मनाची ते चाली । मोहाचिये सोई । ओघें गंगा काई परतों जाणे ॥ ५ ॥ तुका ह्मणे कोठें उदार मेघा शक्ति । माझी तृषा किती चातकाची ॥ ६ ॥

१९१. सोनें दावी वरी तांबे तया पोटीं । खरियाचे सोटीं[1] । विकूं पाहे ॥ १ ॥ पारखी तो जाणे तयाचे जीवींचें निवडी दोहींचें वेगळालें ॥ २ ॥ क्षीरा नीरा कैसें होय एकपण । स्वादी तोचि भिन्न भिन्न काढी ॥ ३ ॥ तुका ह्मणे धीता नागवलाचि खोटा । अपमान मोटा पावईल ॥ ४ ॥

१९२. थोडें परी निरें । अविटें[2] तें ध्यावें खरें ॥ १ ॥ ध्यावें जेणें नये तुटी । बीज वाढे बीजापोटीं ॥ २ ॥ चित्त ठेवीं ग्वाही । आणिकांशीं चाड नाहीं ॥ ३ ॥ आपलें तें हित फार । तुका ह्मणे खरें सार ॥ ४ ॥

---

## २९. उपदेशपर.

१९३. लटिकें तें ज्ञान लटिकें तें ध्यान । जरि हरि-कीर्तन प्रिय नाहीं ॥ १ ॥ लटिकेंचि दंभ घातलें दुकान । चौळविलें[3] जन पोटासाठीं ॥ २ ॥ लटिकेंचि केलें वेद-पारायण । जरि नाहीं स्फुंदनें[4] प्रेम कथे ॥ ३ ॥ लटिकें तें

---

१ बरोबरीनें. २ शुद्ध. ३ नादीं लावलें. ४ कळवळा.

तप लटिका तो जप । ओळस निद्रा झोंप कथीकाळीं ॥ ४ ॥ नाम नावडे तो करील बोहरी । नाहीं त्याची खरी चित्तशुद्धि ॥ ५ ॥ तुका ह्मणे ऐसीं गर्जती पुराणें । शिष्टांचीं वचनें मागिलाही ॥ ६ ॥

१९४. जायांचें अंगुलें[1] लेतां नाहीं मान । शोभा नेदी जन हांसविलें ॥ १ ॥ घुसळितां ताक कांडितां भूस । साध्य नाहीं क्लेश जाती वांयां ॥ २ ॥ तुका ह्मणे नाहीं स्वता भांडवल । भिकेचें तें फोल बीज नव्हे ॥ ३ ॥

१९५. मुंगीचिया घरा कोण जाय मूळ । देखोन्दियां गूळ धांव घाली ॥१॥ याचकाविण काय खोळंबला दाता । तोचि धांवे हिता आपुलिया ॥ २ ॥ उदक अन्न काय ह्मणे मज खा ये । भुकेला तो जाय चोजवीत ॥ ३ ॥ व्याधी पिडिला धांवे वैद्याचिया घरा । दुःखाच्या परिहारा आपुलिया ॥ ४ ॥ तुका ह्मणे जया आपुलें स्वहित । करणें तोचि प्रीत धरी कथे ॥ ५ ॥

१९६. देव तीर्थीं येर दिसे जया ओस । तोचि तया दोष जाणतिया ॥ १ ॥ तया बरें फावे देवा चुकवितां । संचिताची सत्ता अंतराय ॥ २ ॥ शुद्धाशुद्ध ठाव पापपुण्य बीज । पाववील दुजे फळभोग ॥ ३ ॥ तुका ह्मणे विश्वंभराऐसें वर्म । चुकलिया धर्म अवघे मिथ्या ॥ ४ ॥

१९७. मस्तकीं सहावें टांकियासी जाण । तेव्हां देवपण भोगावें गा ॥ १ ॥ आपुलिये स्तुती निंदा अथवा मान । टाकावा थुंकोन पैलीकडे ॥ २ ॥ सद्गुरुसेवन तेंचि

---

१ अंगठी.

अमृतपान । करूनी प्राशन बैसावें गा ॥३॥ आपुल्या मस्तकीं पडोत डोंगर । सुखाचें माहेर टाकूं नये ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां सांगूं तुला किती । जिण्याची[1] फजिती करूं नये ॥५॥

१९८. सत्य आह्मां मनीं । नव्हों गाबाळाचे धनी ॥ १ ॥ ऐसें जाणा रे सकळ । भरा शुद्ध टाका मळ ॥ २ ॥ देतों तीक्ष्ण उत्तरें । पुढें व्हावयासी बरें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बरें घडे । देशोदेशीं चाले कोडें ॥ ४ ॥

१९९. थोर ती गळाली पाहिजे अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ॥ १ ॥ व्यर्थ भराभर केलें पाठांतर । जोंवरि अंतर शुद्ध नाहीं ॥ २ ॥ घोडें काय थोडें वागविते ओझें । भावाविणा तैसें पाठांतर ॥ ३ ॥ तुका ह्मणे धरा निष्ठावंत भाव । जरी पंढरीराव पाहिजे तो ॥ ४ ॥

२००. वाटे या जनाचें थोर बा आश्चर्य । न करिती विचार कां हिताचा ॥ १ ॥ कोण दम ऐसा आहे यांचे पोटीं । येईल शेवटीं कोण कामा ॥ २ ॥ काय मानुनियां राहिले निश्चिती । काय जाब देती यमदूतां ॥ ३ ॥ कां हीं विसरलीं मरण बापुडीं । काय यांसी गोडी लागलीसे ॥ ४ ॥ काय हातीं नाहीं करील तयासी । काय जालें यांसी काय जाणों ॥ ५ ॥ कां हीं नाठविती देवकीनंदना । सुटाया बंधनापासूनियां ॥ ६ ॥ काय मोल यांसी लागे धन वित्त । कां हें यांचें चित्त घेत नाहीं ॥७॥ तुका ह्मणे कां हीं भोगितील खाणी । कां त्या चक्रपाणी विसरलीं ॥८॥

---

१ आयुष्याची.

२०१. अन्नाच्या परिमळें जरी जाये भूक । तरि कां हे पाक घरोघरीं ॥ १ ॥ आपुलाल्या तुह्मी करा रे स्वहित । वाचे स्मरा नित्य राम राम ॥ २ ॥ देखोनि जीवन जरी जाय तान । तरी कां सांठवण घरोघरीं ॥ ३ ॥ देखोनियां छाया सुख न पवीजे । जंव न बैसीजे तया तळीं ॥ ४ ॥ हित तरी होय गातां अईकतां । जारी राहे चित्ता दृढ भाव ॥ ५ ॥ तुका ह्मणे होसी भावेंचि तूं मुक्त । काय करिसी युक्त जाणिवेची[1] ॥ ६ ॥

२०२. निरोधाचें[2] मज न साहे वचन । बहु होतें मन कासावीस ॥ १ ॥ ह्मणऊनि जीवा न साहे संगति । बैसतां एकांतीं गोड वाटे ॥ २ ॥ देहाची भावना वासनेचा संग । नावडे उबग आला यांचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देव अंतरे यामुळें । आशामोहजाळें दुःख वाढे ॥ ४ ॥

२०३. आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥ सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ २ ॥ हित तें करावें देवाचें चिंतन । करूनियां मन एकविध ॥ ३ ॥ तुका ह्मणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥ ४ ॥

२०४. बोलिलों तें कांहीं तुमचिया हिता । वचन नेणतां क्षमा कीजे ॥ १ ॥ वाट दावी तया न लगे रुसावें । अतित्याई जीवें नाश पावे ॥२॥ निंब दिला रोग तुटाया अंतरीं । पोभाळितां[3] वरी आंत चरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे हित देखण्यासी कळे । पडती अंधळे कूपामाजीं ॥ ४ ॥

---

१ ज्ञानाच्या युक्तीस काय करतोस ? २ विरोधाचें. ३ चोळितां.

२०५. साधकाची दशा उदास असावी । उपाधि नसावी अंतर्बाहीं ॥ १ ॥ लोलुपता काय निद्रेसी जिंकावें । भोजन करावें परिमित ॥ २ ॥ एकांतीं लोकांशीं स्त्रियांशीं भाषण । प्राण गेल्या जाण बोलों नये ॥ ३ ॥ संग सज्जनांचा उच्चार नामाचा । घोष कीर्तनाचा अहर्निशीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐशा साधनीं जो राहे । तोचि ज्ञान लाहे गुरुकृपा ॥ ५ ॥

२०६. महारासी शिवे । कोपे ब्राह्मण तो नव्हे ॥ १ ॥ तया प्रायश्चित्त कांहीं । देहत्याग करितां नाहीं ॥ २ ॥ नातळे[1] चांडाळ । त्याचा अंतरीं विटाळ ॥ ३ ॥ ज्याचा संग चित्तीं । तुका ह्मणे तो त्या याती ॥ ४ ॥

२०७. कोणा चिंता आड । कोणा लोकलाज नाड ॥ १ ॥ कैंचा राम अभागिया । करी बडबड वांयां ॥ २ ॥ स्मरणाचा राग । क्रोधें विटाळलें अंग ॥ ३ ॥ तुका ह्मणे जडा । काय चाले त्या दगडा ॥ ४ ॥

२०८. अर्थेविण पाठांतर कासया करावें । व्यर्थचि मरावें घोकूनियां ॥ १ ॥ घोकूनियां काय वेगीं अर्थ पाहे[2] । अर्थरूप राहे होऊनियां ॥ २ ॥ तुका ह्मणे ज्याला अर्थी आहे भेटी । नाहीं तरी गोष्टी बोलों नका ॥ ३ ॥

२०९. कुचराचें श्रवण । गुणदोषांवरी मन ॥ १ ॥ असोनियां नसे कथे । मूर्ख अभाग्य ते तेथें ॥ २ ॥

---

१ ज्याला स्पर्श करतां येत नाहीं असा चांडाळ जो राग त्याचा अंतर्यामीं त्याला विटाळ होतो. २ नुसतें घोकून काय लवकर अर्थ कळणार आहे ?

निरर्थक कारणीं । कान डोळे वेची वाणी ॥ ३ ॥ पापाचे सांगाती । तोंडीं ओढाळांचे माती ॥ ४ ॥ हिताचिया नांवें । वोस पडिले देहभावें ॥ ५ ॥ फजीत करूनि सोडी । तुका करी बोडाबोडी ॥ ६ ॥

२१०. आपुल्या विचार करीन जिवाशीं । काय या जनाची चाड मज ॥ १ ॥ आपुलें स्वहित जाणती सकळ । निरोधितां बळें दुःख वाटे ॥ २ ॥ आइको नाइको कथा कोणी तरीं । जाऊनियां घरीं निजो सुखें ॥ ३ ॥ माझी कोण वोजें झाला हा शेवट । देखोनियां वाट आणिकां लावूं ॥ ४ ॥ तुका ह्मणे भाकूं आपुली करुणा । जयाची वासना तया फळे ॥ ५ ॥

२११. कारणापें असतां दृष्टी । शंका पोटीं उपजेना ॥ १ ॥ शूर मिरवे रणांगणीं । मरणींच संतोष ॥ २ ॥ पाहिजे तो कळवळा । मग बळा काय उणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे उदारपणें । काय उणें मनाचें ॥ ४ ॥

२१२. दर्पणासी बुजे । नकटें तोंड पळवी लाजें ॥ १ ॥ गुण ज्याचे जो अंतरीं । तोचि त्यासी पीडा करी ॥ २ ॥ चोरा रुचे निशी । देखोनियां विटे शशी ॥ ३ ॥ तुका म्हणे जन । देवा असे भाग्यहीन ॥ ४ ॥

२१३. वेशा नाहीं बोल अवगुण दूषीले । ऐशा बोला भले झणें क्षोभा ॥ १ ॥ कोण नेणें अन्न जीवाचें जीवन ।

---

१ विटंबना. २ बळानें प्रतिकार केला असतां. ३ पाड, प्रभाव. माझ्या अंगीं अशी कसली प्रतिष्ठा आहे कीं स्वतांच्या अनुभवानें मीं इतरांना मार्गदर्शक व्हावें. ४ मीच आपली. ५ खिन्न होतो. ६ अशा बोलण्यानें, भले लोकहो, तुह्मी रागावूं नका.

विष मेळवण विष होय ।। २ ।। सोनें शुद्ध नेणें कोण हा विचार । डांकें हीनवर केलें त्यासी ।। ३ ।। याती शुद्ध परी अधम लक्षण । वांयां गेलें तेणें सोंगेंही तें ।।४।। तुका म्हणे शूर तोचि पावे मान । आणीक मंडण भारवाही ।। ५ ।।

२१४. चित्ता ऐसी नको देऊं आठवण । देवाचे चरण अंतरे तें ।। १ ।। आलिया वचनें रामनामध्वनि । ऐकावीं कानीं ऐसीं गोडें ।। २ ।। मत्सराचा ठाव शरीरीं नसावा । लाभेंविण जीवा दुःख देतो ।। ३ ।। तुका म्हणे राहे अंतर शीतळ । शांतीचें तें बळ क्षमा अंगीं ।। ४ ।।

✓२१५. भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें। ऐसियासी नारायणें । उपेक्षीजे सर्वथा ।। १ ।। देवा पायीं नाहीं भाव । भक्ति वरी वरी वाव । समर्पिला नाहीं जीव । जाणावा हा व्यभिचार ।। २ ।। जगा घालावें सांकडें । दीन होऊनि बापुडें । हेंचि अभाग्य रोकडें । मूळ आणि अविश्वास ।। ३ ।। काय न करी विश्वंभर । सत्य करितां निर्धार । तुका ह्मणे सार । दृढ पाय धरावे ।। ४ ।।

✓२१६. धनवंतालागीं । सर्वमान्यता आहे जगीं ।।१।। माता पिता बंधु जन । सर्व मानिती वचन ।। २ ।। जंव मोठा चाले धंदा । तंव बहिण ह्मणे दादा ।। ३ ।। सदा शृंगारभूषणें । कांता लवे बहुमानें ।। ४ ।। तुका ह्मणे धन । भाग्य अशाश्वत जाण ।। ५ ।।

२१७. भावें गावें गीत । शुद्ध करूनियां चित्त ।।१।। तुज व्हावा आहे देव । तरि हा सुलभ उपाय ।।२।। आणि-

---

१ .

कांचे कानीं । गुण दोष मना नाणीं ॥३॥ मस्तक ठेंगणा । करीं संतांच्या चरणा ॥ ४ ॥ वेचीं तें वचन । जेणें राहे समाधान॥५॥ तुका ह्मणे फार । थोडा तरी परउपकार ॥६॥

२१८. आर्तभूतां द्यावें दान । खरें पुण्य त्या नांवें ॥ १ ॥ होणार तें सुखें घडो । लाभ जोडो महाबुद्धी ॥२॥ सत्य संकल्पाचे साठीं । उजळा पोटीं रविबिंब ॥ ३ ॥ तुका ह्मणे मनीं वाव । शुद्ध भाव राखावा ॥ ४ ॥

२१९. आह्मां सोयरे हरिजन । जनीं भाग्य निकंचन ॥ १ ॥ ज्याच्या धैर्या नाहीं भंग । भाव एकविध रंग ॥ २ ॥ भुके तान्हे चित्तीं । सदा देव आठविती ॥ ३ ॥ तुका ह्मणे धन । ज्याचें निज नारायण ॥ ४ ॥

२२०. उदकीं कालवी शेण मलमूत्र । तो होय पवित्र कासयानें ॥ १ ॥ उद्धारासी ठाव नाहीं भाग्यहीना । विन्मुख चरणां संतांचिया ॥ २ ॥ दुखवी तो बुडे सांग-डीचा तापा । अतित्याई पापाचीच मूर्ति ॥ ३ ॥ तुका ह्मणे जेव्हां फिरतें कपाळ । तरी अमंगळ योग होतो ॥४॥

२२१. कोणाच्या आधारें करूं मी विचार । कोण देइल धीर माझ्या जीवा ॥ १ ॥ शास्त्रज्ञ पंडित नव्हें मी वाचक । यातिशुद्ध एक ठाव नाहीं ॥ २ ॥ कलियुगीं बहु

१ दुसऱ्यांचे गुणदोष ऐकूं नकोस आणि त्यांना मनांत ठाव देऊं नकोस. २ संतचरणीं नम्रता धर. ३ खर्च कर, बोल. ४ उजळलेल्या आकाशाच्या पोटीं ज्याप्रमाणें रविबिंब असतें त्याप्रमाणें शुद्ध हेतू बरोबर पुण्य असतेंच. ५ दारिद्र्य. ६ भुकेले आणि तहानेले असतांही जे देवास निरंतर आठवितात. ७ ज्यानें संतांचा त्याग केला आहे अशा अभाग्याला प्रायश्चितानेंसुद्धां उद्धार नाहीं.

कुशळ हे जन । छळितील गुण तुझे गातां ॥ ३ ॥ मज हा संदेह झाला दोहीं सवा । भजन करूं देवा किंवा नको ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां दुरावितां जन । किंवा हें मरण भलें दोन्ही ॥ ५ ॥

२२२. दुर्बुद्धि ते मना । कदां नुपजो नारायणा ॥१॥ आतां मज ऐसें करी । तुझे पाय चित्तीं धरीं ॥ २ ॥ उपजला भावो । तुमचे कृपें सिद्धी जावो ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां । लाभ नाहीं यापरता ॥ ४ ॥

२२३. नको सांडूं अन्न नको सेवूं वन । चिंतीं नारायण सर्व भोगीं ॥ १ ॥ मातेचिये खांदीं बाळ नेणे शीण । भावना त्या भिन्न मुंडाविया ॥ २ ॥ नको गुंपों भोगीं नको पडों त्यागीं । लावुनि सरें अंगीं देवाचिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे नको पुसों वेळोवेळां । उपदेश वेगळा उरला नाहीं ॥ ४ ॥

२२४. काय दरा करील वन । समाधान नाहीं जंव ॥ १ ॥ तरी काय तेथें असती थोडीं । काय जोडी तयांसी ॥ २ ॥ रिघतां धांवा पेंवामध्यें । जोडे सिद्धि ते ठायीं ॥ ३ ॥ काय भस्म करील राख । अंतर पाक नाहीं तों ॥ ४ ॥ वर्णाआश्रमाचे धर्म । जाती श्रम जालिया ॥५॥ तुका ह्मणे सोंग पाश । निरसे आस तें हित ॥ ६ ॥

२२५. आह्मांघरीं धन शब्दांचींच रत्नें । शब्दांचींच वस्त्रें यत्न करूं ॥ १ ॥ शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन ।

---

१ कडे, पक्षीं.

शब्दें वांटूं धन जनलोकां ॥ २ ॥ तुका ह्मणे पाहा शब्दाचि हा देव । शब्दोंचि गौरव पूजा करूं ॥ ३ ॥

२२६. करावा वर्षाव । तृषाक्रांत जाला जीव ॥ १ ॥ पाहें आकाशाची वास । जाणता तूं जगनिवास ॥ २ ॥ संयोगें विस्तार । वाढी लागे तो अंकुर ॥ ३ ॥ तुका ह्मणे फळें । चरणांबुजें तीं सकळें ॥ ४ ॥

२२७. हो कां नर अथवा नारी । ज्यांचा आवडता हरि ॥ १ ॥ ते मज विठोबासमान । नमूं आवडी ते जन ॥ २ ॥ ज्याचें अंतर निर्मळ । त्याचें सबाह्य कोमळ ॥३॥ तुका ह्मणे भावें । जिव्हें प्रेमें वोसंडावें ॥ ४ ॥

२२८. तेचि करीं मात । जेणें होईल तुझें हित ॥१॥ काय बडबड अमित । सुख जिव्हारीं सिणविसी ॥ २ ॥ जो मुळव्याधी पीडिला । त्यासी देखोन हांसे खरजुला ॥ ३ ॥ आरथकरी सोसी । त्यासि हांसे तो आळसी ॥ ४ ॥ क्षयरोगी ह्मणे परता । सर रोगिया तूं आतां ॥ ५ ॥ वडस दोहीं डोळां वाढले । आणिकां काने कोचें ह्मणे ॥ ६ ॥ तुका ह्मणे लागों पायां । शुद्ध करा आपणियां ॥ ७ ॥

२२९. न ह्मणे कवणां सिद्ध साधक गव्हार । अवघा विश्वंभर वांचूनियां ॥ १ ॥ ऐसें माझे बुद्धि काया वाचा मन । लावीं तुझें ध्यान पांडुरंगा । गातां प्रेमगुण शंका माझ्या मनीं । नाचतां रंगणीं नाठवावीं ॥ ३ ॥ देई चरणसेवा भूतांचें भजन । वर्णो अभिमान सांडवूनि ॥ ४ ॥

---

१ हांव धरून पैसा करणारा.

आशापाश माझी तोडीं माया चिंता । तुजविण व्यथा नको कांहीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे सर्व भाव तुझे पायीं । राहे ऐसें देईं प्रेम देवा ॥ ६ ॥

२३०. माझी आतां लोक सुखें निंदा करू । ह्मणती विचारू सांडियेला ॥ १ ॥ कारण होय तो करावा विचार । काय भीड भार करूं देवा ॥ २ ॥ तुका ह्मणे काय करूं लापनिक । जनाचार सुख नासिवंत ॥ ३ ॥

२३१. मान अपमान गोवें । अवघें गुंडूनि ठेवावें ॥ १ ॥ हेंचि देवाचें दर्शन । सदा राहे समाधान ॥ २ ॥ शांतीची वसती । तेथें खुंटे काळगती ॥ ३ ॥ आली ऊर्मी साहे । तुका ह्मणे थोडें आहे ॥ ४ ॥

२३२. योगाचें तें भाग्य क्षमा । आधीं दमा इंद्रियें ॥ १ ॥ अवधीं भाग्यें येती घरा । देव सोयरा जालिया ॥ २ ॥ मिरासीचें ह्मणूं सेत । नाहीं देत पीक उगें ॥ ३ ॥ तुका ह्मणे उचित जाणां । उगीं शिणा काशाला ॥ ४ ॥

२३३. धाईं अंतरिंच्या सुखें । काय बडबड वाचा मुखें ॥ १ ॥ विधिनिषेध उर फोडी । जंव नाहीं अनुभव गोडी ॥ २ ॥ वाढे तळमळ उभयतां । नाहीं देखिलें अनुभवितां ॥ ३ ॥ आपुल्या मतें पिसें । परि तें आहे जैसेंतैसें ॥ ४ ॥ साधनाची सिद्धि । मौन करा स्थिर बुद्धि ॥ ५ ॥ तुका ह्मणे वादें । वांयां गेलीं ब्रह्मवृंदें ॥ ६ ॥

२३४. अधिकार तैसा करूं उपदेश । साहे ओझें त्यास तेंचि द्यावें ॥ १ ॥ मुंगीवरी भार गजाचें पाळण । घालितां ते कोण कार्यसिद्धि ॥ २ ॥ तुका ह्मणे फांसे वाघुरा कुन्हाडी । प्रसंगीं तो काढी पारधी तो ॥ ३ ॥

२३५. जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥ १ ॥ येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रु ॥ २ ॥ प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य माता निंदु भरतें केली ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्व धर्म हरिचे पाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥ ४ ॥

२३६. साकरेच्या गोण्या बैलाचिये पाठी । तयासी शेवटीं करबाडें ॥ १ ॥ मालाचे पैं पेटे वाहाताती उंटें । तयांलागीं कांटे भक्षावया ॥ २ ॥ वाउगा हा धंदा आशा वाढविती । बांधोनियां देती यमा हातीं ॥ ३ ॥ ज्यासी असे लाभ तोचि जाणे गोडी । येर तीं बापुडीं शिणलीं वांयां ॥ ४ ॥

२३७. कैं वाहावें जीवन । कैं पलंगीं शयन ॥ १ ॥ जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ॥ २ ॥ कैं भोज्य नानापरी । कैं कोरड्या भाकरी ॥ ३ ॥ कैं बसावें वाहनीं । कैं पायीं अनवाणी ॥ ४ ॥ कैं उत्तम प्रावर्णे । कैं वसनें तीं जीर्णें ॥ ५ ॥ कैं सकळ संपत्ती । कैं भोगणें विपत्ती ॥ ६ ॥ कैं सज्जनाशीं संग । कैं दुर्जनाशीं योग ॥ ७ ॥ तुका ह्मणे जाण । सुख दुःख तें समान ॥ ८ ॥

२३८. नव्हे ब्रह्मज्ञान बोलतां हें सिद्ध । जंव हा आत्मबोध नाहीं चित्तीं ॥ १ ॥ काय कारसी वांयां लटिकाचि पाल्हाळ । श्रम तो केवळ जाणिवेचा ॥ २ ॥ मीच देव ऐसें सांगसी या लोकां । विषयांच्या सुखा टोकोनियां ॥ ३ ॥ अमृताची गोडी पुढिलां सांगसी । आपण उपवासी मरोनियां ॥ ४ ॥ तुका ह्मणे जरि राहील तळमळ । ब्रह्म तें केवळ सदोदित ॥ ५ ॥

---

१ इच्छा धरून.

२३९. गाढवाचे अंगीं चंदनाची उटी । राखेसवें भेटी केली तेणें ॥ १ ॥ सहज गुण जयाचिये देहीं । पालट ते कांहीं नव्हे तया ॥ २ ॥ माकडाचे गळां मोलाचा तो मणि । घातला चावुनी टाकी थुंकोनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे खळा नावडे हित । अविद्या वाढवी आपुलें मत ॥ ४ ॥

२४०. न सांगावें वर्म । जनीं असों द्यावा भ्रम ॥१॥ उगींच लागतील पाठीं । होती रितींच हिंपुटीं ॥ २ ॥ शिकविल्या गोष्टी । शिकोन न धरिती पोटीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे शीण । होईल अनुभवाविण ॥ ४ ॥

२४१. पाया जाला नारू । तेथें बांधला कापुरू । तेथें बिब्ब्याचें काम । अधमासी तों अधम ॥ १ ॥ रुसला गुलाम । धणी करीतो सलाम ॥ तेथें चाकराचें काम । अधमासी तों अधम ॥ २ ॥ रुसली घरची दासी । धणी समजावी तियेसी । तेथें बटकीचें काम । अधमासी तों अधम ॥ ३ ॥ देव्हाऱ्यावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला । तेथें पैजारेचें काम । अधमासी तों अधम ॥ ४ ॥ तुका ह्मणे जाती । जातीसाठीं खाती माती ॥ ५ ॥

२४२. गंगा न देखे विटाळ । तेंचि रांजणींही जळ ॥ १ ॥ अल्पमहदा नव्हे सरी । विटाळ तो भेद धरी ॥२[1]॥ काय खंडिली भूमिका । वर्णा पायरिकां लोकां ॥ ३ ॥ तुका ह्मणे अगीवीण । बीजें वेगळीं तों भिन्न ॥ ४ ॥

---

१ लहान आणि मोठें ह्यांची बरोबरी नाहीं. भेदाच्या ठायींच विटाळ असतो. भेदभाव विटाळाचें मूळ. धान्य विस्तवांत घातलें कीं सर्वच राख अथवा शिजविलें कीं एकच रस; मग भेदाचें नांव नाहीं.

## ३०. श्रद्धा.

२४३. सोंगें छंदें कांहीं । देव जोडे ऐसें नाहीं ॥१॥ सारा अवघें गाबाळ । डोळ्या आडील पडळ ॥ २ ॥ शुद्ध भावाविण । जो जो केला तो तो शीण ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळे । परि होताती अंधळे ॥ ४ ॥

२४४. धन्य शुद्ध जाती । धरीं लौकरी परती ॥ १ ॥ ऐकिलें तेंचि कानीं । होय परिपाक मनीं ॥ २ ॥ कळवळा पोटीं । सावधान हितासाठीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भाव । त्याचा तोचि जाणां देव ॥ ४ ॥

२४५. पाषाण देव पाषाण पायरी । पूजा एकविरी पाय ठेवी ॥ १ ॥ सार तो भाव सार तो भाव । अनुभवीं देव तेचि जाले ॥ २ ॥ उदका भिन्न पालट काई । गंगा गोड येरां चवी काय नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे हें भाविकांचें वर्म । येरीं धर्माधर्म विचारावे ॥ ४ ॥

२४६. कासिया पाषाण पूजिती पितळ । अष्ट धातु खळ भावाविण* ॥१॥ भावाचि कारण भावचि कारण । मोक्षाचें साधन बोलियेलें ॥ २ ॥ काय करिल जपमाळा कंठमाळा । करिशी वेळोवेळां विषयजप ॥ ३ ॥ काय करिशील पंडित हे वाणी । अक्षराभिमानी थोर होय ॥ ४ ॥ काय करिशील कुशल गायन । अंतरीं मळीण कुबुद्धि ते ॥ ५ ॥ तुका ह्मणे भाव नाहीं करी सेवा । तेणें काय देवा योग्य होशी ॥६॥

२४७. चित्त ग्वाही तेथें लौकिकाचें काई । स्वहित तें ठायीं आपणापें ॥ १ ॥ मनाशीं विचार तोचि साच भाव । व्यापक हा देव अंतर्बाहीं ॥ २ ॥ शुद्ध भावा न लगे

---

* (भावहीन.)

सुचावा परिहार । उमटे साचार आणिके ठायीं ॥ ३ ॥ भोगित्यासी काज अंतरींचें गोड । बाहिरल्या चाड नाहीं रंगें ॥४॥ तुका ह्मणे भाव शुद्ध हें कारण । भाट नारायण होईल त्यांचा ॥ ५ ॥

२४८. लापनिक शब्दें नातुडे हा देव । मनिंचें गुह्य-भाव शुद्ध बोला ॥ १ ॥ अंतरिंचा भेद जाणे परमानंद । जयासी संवाद करणें लागे ॥ २ ॥ तुका ह्मणे जरी आपुलें स्वहित । तरी करीं चित्त शुद्धभावें ॥ ३ ॥

२४९. कायावाचामनें झाला विष्णुदास । काम क्रोध त्यास बाधीतना ॥ १ ॥ विश्वास तो करी स्वामीवरी सत्ता । सकळ भोगिता होय त्याचें ॥ २ ॥ तुका ह्मणे चित्त करावें निर्मळ । येउनि गोपाळ राहे तेथें ॥ ३ ॥

## ३१. देवाच्याठायीं विश्वास.

२५०. पक्षीयांचे घरीं नाहीं सामुगरी । त्यांची चिंता करी नारायण ॥ १ ॥ अजगर जनावर वारुळांत राहे । त्याजकडे पाहे पांडुरंग ॥ २ ॥ चातक हा पक्षी नेघे भूमिजळ । त्यासाठीं घननीळ नित्य वर्षे ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी पिपीलिकांची जात । पुरवीं मनोरथ पांडुरंगा ॥ ४ ॥

२५१. देव सखा जरी । जग अवघे कृपाकरी ॥ १ ॥ ऐसा असोनि अनुभव । कासाविस होती जीव ॥२॥ देवाची जतनें[1] । त्यासी बाधूं न शके अग्न ॥३॥ तुका ह्मणे हरी । प्रल्हादासी यत्न[2] करी ॥ ४ ॥

---

१ ईश्वरानें ज्याचें रक्षण केलें आहे. २ प्रल्हादाचें रक्षण करण्याकरितां ईश्वरानें अनेक प्रयत्न केले.

२५२. आलिया संसारा उठा वेग करा । शरण जा उदारा पांडुरंगा ॥ १ ॥ देह हें देवाचें धन कुबेराचें । तेथें मनुष्याचें काय आहे ॥ २ ॥ देता देवविता नेता नेवविता । तेथें याची सत्ता काय आहे ॥ ३ ॥ निमित्याचा धणी केला असे प्राणी । माझें माझें ह्मणोनी व्यर्थ गेला ॥ ४ ॥ तुका ह्मणे कां रे नाशवंतासाठीं । देवासवें आटी पाडितोसी ॥५॥

२५३. आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूं नये ॥ १ ॥ मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंक ॥ २ ॥ भयाचिये पोटीं दुःखाचिया राशी । शरण देवासी जातां भलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥ ४ ॥

२५४. हेचि थोर भक्ति आवडते देवा । संकल्पावी[१] माया संसाराची ॥ १ ॥ ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें । चित्तीं असों द्यावें समाधान ॥२॥ वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवांपायीं ॥ ४ ॥

२५५. अनंता जीवांचीं तोडिलीं बंधनें । मजहि येणें काळें[२] कृपा कीजे ॥ १ ॥ अनंत पवाडे तुझे विश्वंभरा । भक्त करुणाकरा नारायणा ॥ २ ॥ अंतरींचें कळों देईं गुह्य गुज । अंतरीं तें बीज राखईन ॥ ३ ॥ समदृष्टी तुझीं पाहेन पाउलें । धरीन संचलें हृदयांत ॥ ४ ॥ तेणें या चित्ताची राहेल तळमळ । होतील शीतल सकळ गात्रें ॥ ५ ॥ तुका ह्मणे शांति करील प्रवेश । मग नव्हे नाश अखंड तो ॥६

१ सोडावी. २ ह्या काळीं, आतां.

२५६. तरिच जन्मा यावें । दास विठ्ठलाचें व्हावें ॥१॥ नाहीं तरि काय थोडीं । श्वानशूकरें बापुडीं ॥ २ ॥ जाल्याचें तें फळ । अंगीं लागों नेदी मळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे भले । ज्याच्या नांवें मानवले ॥ ४ ॥

२५७. नाहीं देवाचा विश्वास । करी संतांचा उपहास ॥१॥ त्याचे तोंडीं पडे माती । हीन शूकराची जाती ॥२॥ घोकुनी अक्षर । वाद छळणा करीत फिरे ॥ ३ ॥ ह्मणे देवासी पाषाण । तुका ह्मणे भावहीन ॥ ४ ॥

२५८. जिव्हा जाणे फिकें मधुर कीं क्षार । येर मास पर हाता न कळे ॥ १ ॥ देखावें नेत्रीं बोलावें मुखें । चित्ता सुखदुःखें कळों येती ॥ २ ॥ परिमळासी घ्राण ऐकती श्रवण । एकाचें कारण एका नये ॥ ३ ॥ एक देहीं भिन्न ठेवियेल्या कळा । नाचवी पुतळा सूत्रधारी ॥४॥ तुका ह्मणे ऐशी जयाची सत्ता । कां तया अनंता विसरलेती ॥५॥

२५९ कांहीं न मागती देवा । त्यांची करूं धावे सेवा ॥ १ ॥ हळूहळू फेडी ऋण । होउनियां रूपें दीन ॥ २ ॥ होऊं न शके वेगळा । क्षण एक त्यां निराळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भक्तिभाव । हाचि देवाचाही देव ॥ ४ ॥

२६०. पडतां जडभारी । दासीं आठवावा हरी ॥ १ ॥ मग तो होऊं नेदी शीण । आड घाली सुदर्शन ॥ २ ॥ नामाच्या चिंतनें । बारा वाटा पळती विघ्नें ॥ ३ ॥ तुका ह्मणे प्राण । करा देवासी अर्पण ॥ ४ ॥

२६१. कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जनासी एकला तो ॥ १ ॥ बाळा दुध कोण करितें उत्पत्ती ।

वाढवी श्रीपती सर्वे दोन्ही ॥ २ ॥ फुटती तरुवर उष्ण-काळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥ ३ ॥ तेणें तुझी काय नाहीं केली चिंता ।राहें त्या अनंता आठवूनि॥४॥

२६२. नित्य उठोनियां खायाचीच चिंता । आपुल्या तूं हिता नाठवीसी ॥ १ ॥ जननीचे पोटीं उपजलासी जेव्हां । चिंता तुझी तेव्हां केली तेणें ॥ २ ॥ चातकांलागूनि मेघ नित्य वर्षे । तो तुज उदास करील केवीं ॥ ३ ॥ पक्षी वन-चरें आहेत भूमीवरी । तयांलागीं हरि उपेक्षीना ॥ ४ ॥ तुका ह्मणे भाव धरुनि राहें चित्तीं । तरि तो श्रीपति उपेक्षीना ॥ ५ ॥

२६३ गर्भी असतां बाळा । कोण पाळी त्याचा ळळा ॥ १ ॥ कैसा लाघवी सूत्रधारी । कृपाळुवा माझा हरी ॥२॥ सर्प पिलीं वितांचि खाय । वांचलिया कोण माय ॥३॥ गगनीं लागला कोसेरा[1] । कोण पुरवी तेथें चारा ॥ ४ ॥ पोटीं पाषाणांचे जीव । कवण जीव त्याचा भाव ॥ ५ ॥ तुका ह्मणे निश्चळ राहें । होईल तें सहज पाहें ॥ ६ ॥

२६४. अभयाचें स्थळ । तें हें एक अचळ ॥ १ ॥ तरि धरिला विश्वास । ठेलों होउनियां दास ॥ २ ॥ पुरली आवडी । पायीं लागलीसे गोडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कंठीं नाम । अंगीं भरलेंसे प्रेम ॥ ४ ॥

२६५. ह्मणउनि शरण जावें । सर्वभावें देवासी ॥१॥ तो हा उतरील पार । भवदुस्तर नदीचा ॥ २ ॥ बहु आहे करुणावंत । अनंत हें नाम ज्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे साक्षी आलें । तरी केलें प्रगट ॥ ४ ॥

---

१ पक्षी विशेष.

२६६. त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं । आमचें त्या काई असे ओझें ॥ १ ॥ पाषाणाचे पोटीं बैसला दर्दुर । तया मुखीं चारा कोण घाली ॥ २ ॥ पक्षी अजगर न करी संचित । तयासि अनंत प्रतिपाळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तया भार घातलिया । उपेक्षीना दयासिंधु माझा ॥ ४ ॥

२६७. काय देवापाशीं उणें । हिंडे दारोदारीं सुनें ॥ १ ॥ करी आक्षरांची आटी । एके कवडीच साठीं ॥२॥ निंदी कोणां स्तवी । चिंतातुर सदा जीवीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भांड । जळो जळो त्याचें तोंड ॥ ४ ॥

२६८. आलें देवाचिया मना । तेथें कोणाचें चालेना ॥ १ ॥ हरिश्चंद्र ताराराणी । वाहे डोंबा घरीं पाणी ॥ २ ॥ पांडवांचा साहाकारी । राज्यावरोनि केले दुरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे उगेचि राहा । होईल तें सहज पाहा ॥ ४ ॥

२६९. माझें मागणें तें किती । दाता लक्ष्मीचा पती ॥ १ ॥ तान्हेल्यानें पीतां पाणी । तेणें गंगा नव्हे उणी ॥ २ ॥ कल्पतरु झाला देता । तेथें पोटाचा मागता ॥३॥ तुका म्हणे संता ध्यातां । परब्रह्म आलें हातां ॥ ४ ॥

## ३२. भक्ति.

२७० पूर आला आनंदाचा । लाटा उसळती प्रेमाच्या ॥१॥ बांधुं विठ्ठल सांगडी[1] । पोहुनि जाऊं पैल थडी ॥२॥ अवघे जन गडी । घाला उडी भाईनो ॥ ३ ॥ हें तों नाहीं सर्वकाळ । अमुप अमृताचें जळ ॥ ४ ॥ तुका ह्मणे थोरा पुण्यें । ओघ आला पंथें येणें ॥ ५ ॥

१ सांडा.

२७१. जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि देवाचा पुतळा ॥ १ ॥ आणीक नये माझ्या मना । हो का पंडित शाहाणा ॥ २ ॥ नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित॥३॥तुका ह्मणे नवविध । भक्ति जाणे तोचि शुद्ध ॥४

२७२. ऐका महिमा आवडीची । बोरें खाय भिलटींचीं १ थोर प्रेमाचा भुकेला । हाचि दुष्काळ तयाला ॥ २ ॥ अष्टमा सिद्धींला । न मानी क्षीरसागराला ॥३॥ पोहे सुदामदेवाचे । फके मारी कोरडेच ॥ ४ ॥ न ह्मणे उच्छिष्ट अथवा थोडे । तुका ह्मणे भक्तीपुढें ॥ ५ ॥

२७३. नामधारकासी नाहीं वर्णावर्ण । लोखंड प्रमाण नाना जात ॥ १ ॥ शस्त्र अथवा गोळे भरत प्रकार । परिसीं संस्कार सकळ हेम ॥ २ ॥ पर्जन्य वर्षतां जीवना वाहावट । तें समसकट गंगे मिळे ॥ ३ ॥ सर्व तें हें जाय गंगाचि होऊन । तैसा वर्णावर्ण नाहीं नामीं ॥४॥ महापुरीं जैसें जातसे उदक । मध्यें ते तारक नाव जैसी ॥ ५ ॥ तये नावेसंगें ब्राह्मण तरती । केवीं ते बुडती अनामिक ॥ ६ नाना काष्ठजात पडतां हुताशनीं । ते जात होउनी एकरूप ॥ ७ ॥ तेथें निवडेना धुरे कीं चंदन । तैसा वर्णावर्ण नामीं नाहीं ॥ ८ ॥ पूर्वानुवोळख तेंचि पैं मरण । जरि पावे जीवन नामामृत ॥९॥ नामामृतें झालें मुळींचें स्मरण । सहज साधन तुका ह्मणे ॥ १० ॥

---

१-(९) श्रवण. २ कीर्तन. ३ नामस्मरण. ४ पादसेवन. ५ अर्चन. ६ वंदन. ७ दास्य. ८ सख्य. ९ आत्मनिवेदन अशी नऊ प्रकारची भक्ति आहे. २ महार. ३ अग्नींत.

२७४ सदा माझे डोळे जडो तुझे मूर्तीं । रखुमाईच्या पती सोयरिया ॥ १ ॥ गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्व काळ ॥ २ ॥ विठोमाउलिये हाचि वर देईं । संचरोनि[1] राहीं हृदयामाजीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं न मागें आणिक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ४ ॥

२७५. नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥ १ ॥ नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल । येईल तैसा बोल रामकृष्ण ॥ २ ॥ देवापाशीं मागें आवडीची भक्ति । विश्वासेंसीं प्रीति भावबळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ॥ ४ ॥

२७६. पाहतां श्रीमुख सुखावलें सुख । डोळियांची भूक नवजे माझी ॥ १ ॥ जिव्हे गोडी तीन अक्षरांचा रस । अमृत जयास फिकें पुढें ॥ २ ॥ श्रवणांची वाट चोखाळली शुद्ध । गेले भेदाभेद वारोनियां ॥ ३ ॥ महामळें मन होतें जें गांदलें[2] । शुद्ध चोखाळलें स्फटिक जैसें ॥ ४ ॥ तुका म्हणे माझ्या जीवाचें जीवन । विठ्ठल निधान[3] सांपडलें ॥ ५ ॥

२७७. कस्तुरीचे अंगीं मिनली मृत्तिका । मग वेगळी कां येईल लेखूं ॥ १ ॥ तयापरि भेद नाहीं देवभक्तीं । संदेहाच्या युक्ति सरों द्याव्या ॥ २ ॥ इंधनें तें आगी संयोगाच्या गुणें । सागरा दरुषणें वाहाळ तोंचि ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझें साक्षीचें[4] वचन । येथें तों कारण शुद्ध भाव ॥ ४ ॥

---

१ संचार करून. २ मळलेलें. ३ ठाव. ४ अनुभवाचें.

२७८. कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनी[1] पाहे ॥ १ ॥ तैसें जालें माझ्या जीवा । केव्हां भेटसी केशवा ॥ २ ॥ चुकलिया माये । बाळ हुरू हुरू पाहे ॥ ३ ॥ जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥ ४ ॥

२७९. कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता । बहिणी बंधु चुलता कृष्ण माझा ॥ १ ॥ कृष्ण माझा गुरु कृष्ण माझें तारूं । उतरी पैलपारु भवनदीची ॥ २ ॥ कृष्ण माझें मन कृष्ण माझें जन । सोईरा सज्जन कृष्ण माझा ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझा श्रीकृष्ण विसांवा । वाटे न करावा परता जीवा ॥ ४ ॥

२८०. आली सिंहस्थपर्वणी । न्हाव्या भटा झाली धणी ॥ १ ॥ अंतरीं पापाच्या कोडी । वरीवरी बोडी डोई दाढी ॥ २ ॥ बोडिलें तें निघालें । काय पालटलें सांग वेहिलें[2] ॥ ३ ॥ पाप गेल्याची काय खुण । नाहीं पालटले अवगुण ॥४॥ भक्तिभावेंविण । तुका ह्मणे अवघा शीण ॥५॥

२८१. मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया ॥ १ ॥ तैसा भक्तिवाद काय । रंगबेगडीचा न्याय ॥ २ ॥ वेठी धरिल्या दावी भाव । मागें पळायाचा पाव ॥ ३ ॥ काजव्याच्या ज्योती । तुका ह्मणे नलगे वाती ॥ ४ ॥

२८२. गोहो[3] यावा गांवा । ऐसे नवस करी आवा[4] ॥ १ ॥ कैचें पुण्य तिचे गांठी । व्रतें वेची लोभासाठीं ॥ २ ॥ वाढावें संतान । गृहीं व्हावें धनधान्य ॥ ३ ॥

---

१ राशी. २ पहिलें. ३ पति. ४ स्त्री.

मागे गारगोटी । परिसाचीये साटोवाटी ॥ ४ ॥ तुका ह्मणे मोल । देऊन घेतला सोमल ॥ ५ ॥

---

### ३१ ज्ञान आणि भक्ति.

२८३. उदंड शाहाणे होत तर्कवंत । परि नेणवे अंत विठोबाचा ॥ १ ॥ उदंड अक्षरां करोत भरोवरी । परि ते नेणवे थोरी विठोबाची ॥ २ ॥ तुका ह्मणे नाहीं भोळेपणाविण । जाणीव ते शीण रितें माप ॥ ३ ॥

२८४. भक्तिप्रेमसुख नेणवे आणिकां । पंडित वाचकां ज्ञानियांसी ॥ १ ॥ आत्मनिष्ठ जरी झाले जीवन्मुक्त । तरी भक्तिसुख दुर्लभ त्यां ॥ २ ॥ तुका ह्मणे कृपा करील नारायण । तरिच हें वर्म पडे ठावें ॥ ३ ॥

२८५. पंडित तो भला । नित्य भजे जो विठ्ठला ॥१॥ अवघें सम ब्रह्म पाहे । सर्वां भूतीं विठ्ठल आहे ॥ २ ॥ रिता नाहीं कोणी ठाव । सर्वांभूतीं वासुदेव ॥ ३ ॥ तुका ह्मणे तोचि दास । त्या देखिल्या जाती दोष ॥ ४ ॥

२८६. मज नाहीं तुझ्या ज्ञानाची ते चाड । घेतां वाटे गोड नाम तुझें ॥ १ ॥ नेणतें लेंकरूं आवडीचें तान्हें । बोलतों वचनें आवडीनें ॥ २ ॥ भक्ती नेणें कांहीं वैराग्य तें नाहीं । घातला विठाई भार तुज ॥३॥ तुका ह्मणे नाचें निर्लज्ज होऊनि । नाहीं माझे मनीं दुजा भाव ॥ ४ ॥

२८७. अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती । तयाचिये चित्तीं बोध कैंचा ॥ १ ॥ अज्ञानाची पूजा कामिकें भावना ।

---

१ अदलाबदल. २ इच्छेच्या.

तयाचिया ध्याना देव कैंचा ॥ २ ॥ अज्ञानाचें कर्म॰फळीं ठेवी मन । निष्कॉम साधन तया कैंचें ॥ ३ ॥ अज्ञानाचें ज्ञान विषयावरी ध्यान । ब्रह्म सनातन तया कैंचें ॥ ४ ॥ तुका ह्मणे जळो ऐसियांचें तोंड । अज्ञानाचें बंड वाढविती ॥ ५ ॥

२८८. ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठी लागे ॥ १ ॥ ह्मणोनियां अवघे सांडिले उपाय । धरियेले पाय दृढ तुझे ॥ २ ॥ वेदपरायण पंडित वाचक । न मिळती एक एकांमधीं ॥ ३ ॥ पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा । तेथें देखे चेष्टा विपरीत ॥ ४ ॥ आपुलिया नाहीं निवाले जे अंगें । एकी† करती रागें गुरगुरू ॥ ५ ॥ तुका म्हणे मज कोणाचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आतां ॥ ६ ॥

२८९. ठेवा जाणींव गुंडून । येथें भावचि प्रमाण ॥ १ ॥ एका अनुसरल्या काज । अवघें जाणे पंढरिराज ॥ २ ॥ तर्कवितर्कासी । वाव नलगे सायासीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भावेंविण । अवघा बोलती तो शीण ॥ ४ ॥

२९०. कुशळ गुंतले निषेधा । वादी प्रवर्तले वादा ॥ १ ॥ कैसीं ठकलीं बापुडीं । दंभविषयांचे सांकडीं ॥ २ ॥ भुस उँपणुनि केलें काय । हारपले दोन्ही ठाय ॥ ३ ॥ तुका ह्मणे लागे हातां । काय मथिलें घुसळितां ॥ ४ ॥

२९१. गोड नांवें क्षीर । परी साकरेचा धीर ॥ १ ॥ तैसें जाणा ब्रह्मज्ञान । बापुडें तें भक्तीविण ॥ २ ॥ रुची

---

† (योगी करती.) २ अंकित. ३ पाखडून.

नेदी अन्न । ज्यांत नसतां लवण ॥ ३ ॥ अंधळ्याचे श्रम । शिकविल्याचेंचि नाम* ॥ ४ ॥ तुका ह्मणे तारा । नांवें तंबुऱ्याचे सारा ॥ ५ ॥

## ३४. करुणापर.

२९२. माउलीसी सांगे कोण । प्रेम वाढवी तान्हें ॥ १ ॥ अंतरींचा कळवळा । करीतसे प्रतिपाळा ॥ २ ॥ मायबापाची उपमा । तुज देऊं मेघश्यामा ॥ ३ ॥ तेही साजेना पाहातां । जीवलगा पंढरिनाथा ॥ ४ ॥ माय पाळी संसारीं । परलोकीं राहे दूरी ॥ ५ ॥ तैसा नव्हेसी अनंता । काळावरी तुझी सत्ता ॥ ६ ॥ तुका ह्मणे नारायणा । तुह्मां बहुत करुणा ॥ ७ ॥

२९३. घेई घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥ तुह्मी घ्यारे डोळे सुख । पाहा विठोबाचें मुख ॥ २ ॥ तुह्मी ऐका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ॥ ३ ॥ मना तेथें धांव घेई । राहें विठोबाचे पायीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे जीवा नको सोडूं या केशवा ॥ ५ ॥

२९४. समर्थाचें बाळ कींविलवाणें दिसे । तरी कोणा हांसे जन देवा ॥ १ ॥ अवगुणी जरी झालें तें वोंगळ । करावा सांभाळ लागे त्याचा ॥ २ ॥ तुका ह्मणे तैसा मी एक पतित । परि मुद्रांकित झालों तुझा ॥ ३ ॥

२९५. वोडवविलें अंग । आतां करूनि घ्यावें सांग ॥ १ ॥ काय पूजा ते मी नेणें । जाणावें जी सर्वजाणें ॥ २ ॥ पोटा

* (काम). २ दीनवाणें. ३ अर्पण केलें. ४ सर्वज्ञ.

आलें बाळ । त्याचें जाणावें सकळ ॥३॥ तुका ह्मणे हरी । वाहावें जी कडियेवरी ॥ ४ ॥

२९६. धांव घालीं आई । आतां पाहातेसी काई ॥१॥ धीर नाहीं माझे पोटीं । झालों वियोगें हिंपुटी ॥ २ ॥ करावें शीतळ । बहु झाली हळहळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे डोई । कधी ठेवीन हे पायीं ॥ ४ ॥

२९७. आमुची कृपाळू तूं होसी माउली । विठ्ठले साउली शरणागता ॥१॥ प्रेमपान्हा स्तनीं सदा सर्वकाळ । दृष्टि हे निर्मळ अमृताची ॥ २ ॥ भूक तान दुःख वाटों नेदीं शीण । अंतरींचा गुण जाणोनियां ॥ ३ ॥ आशा तृष्णा माया चिंता दवडीं दुरी । ठाव आह्मां करीं खेळावया ॥ ४ ॥ तुका ह्मणे लावीं संतांचा सांगात । जेथें न पवे हात कळिकाळाचा ॥ ५ ॥

२९८. आला भागासी तो करीं वेवसाव । परी राहो भाव तुझ्या पायीं ॥ १ ॥ काय चाले तुह्मीं बांधलें दातारा । वाहिलिया भारा उसंतितों ॥ २ ॥ शरीर तें करी शरीराचे धर्म । नको देऊं वर्म चुकों मना ॥ ३ ॥ चळण फिरवी ठाव बहुवस । न घडो आळस चिंतनाचा ॥ ४ ॥ इंद्रियें करोत आपुले व्यापार । आवडीसी थार देई पायीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे नको देऊं काळा हातीं । येतों काकुलती ह्मणऊनि ॥ ६ ॥

२९९. आमची कां नये तुह्मासी करुणा । किती नारा-

---

१ हेतु. २ हे दयानिधे तुह्मीं बांधलें असल्यामुळें माझें काय चालतें. वाहिलेल्या भाराला मी शेवटास नेत आहें. ३ मृत्यूच्या.

यणा आळवावें ॥ १ ॥ काय जाणा तुह्मी दुर्बळाचें जिणें। वैभवाच्या गुणें आपुलिया ॥ २ ॥ देती घेती करिती खटपटा आणिकें। निराळा कौतुकें पाहोनियां ॥ ३ ॥ दिवस घोटीं आह्मीं धरियेलें माप। वाहातों संकल्प स्वहिताचा॥४॥ तुका ह्मणे मग देसी कोण्या काळें। चुकुर दुर्बळें होतों आह्मी ॥ ५ ॥

३००. विठ्ठला रे तूं उदाराचा राव। विठ्ठला तूं जीव या जगाचा ॥ १ ॥ विठ्ठला रे तूं उदाराची राशी। विठ्ठला तुजपाशीं सकळ सिद्धी ॥ २ ॥ विठ्ठला रे तुझे नाम बहु गोड। विठ्ठला रे कोड पुरविसी ॥ ३ ॥ विठ्ठला रे तुझें श्रीमुख चांगलें। विठ्ठला लागलें ध्यान मनीं ॥ ४ ॥ विठ्ठला रे वाचे बोला बहु रस। विठ्ठला रे सोस घेतला जीवें॥५॥ विठ्ठला रे शोक करीतसे तुका। विठ्ठला तूं ये कां झडकरी ॥ ६ ॥

३०१. आवडेल तैसें तुज ओंळवीन[1]। वाटे समाधान जीवा तैसें ॥ १ ॥ नाहीं येथें कांहीं लौकिकाची चाड। तुजविण गोड देवराया ॥ २ ॥ पुरवीं मनोरथ अंतरींचें आर्त। धायेवरी गीत गाई तुझें ॥ ३ ॥ तुका ह्मणे लेंकी आळवी माहेरा। गाऊं या संसारां तुज तैसें ॥ ४ ॥

३०२. तूं आह्मां सोयरा सज्जन सांगाती। तुजलागीं प्रीति चालो सदा ॥ १ ॥ तूं माझा जिव्हाळा जीवाचा जिवलग। होसी अंतरंग अंतरींचा ॥ २ ॥ गण गोत मित्र तूं माझें जीवन। अनन्य शरण तुझ्या पायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्वगुणें तुझा दास। आवडे अभ्यास सदा तुझा ॥४॥

१ स्तुति करीन.

३०३. नरस्तुति आणि कथेचा विकरा । हें नको दातारा घडों देऊं ॥ १ ॥ ऐसियें कृपेची भाकितों करुणा । आहेसि तूं राणा उदारांचा ॥ २ ॥ पराविया नारी आणि परधना । नको देऊं मनावरी येऊं ॥ ३ ॥ भूतांचा मत्सर आणि संतनिंदा । हें नको गोविंदा घडों देऊं ॥ ४ ॥ देह अभिमान नको देऊं शरीरीं । चढों कांहीं परी एक देऊं ॥ ५ ॥ तुका ह्मणे तुझ्या पायांचा विसर । नको वारंवार पडों देऊं ॥ ६ ॥

३०४. पतित मी पापी शरण आलों तुज । राखीं माझी लाज पांडुरंगा ॥ १ ॥ तारियेले भक्त न कळे तुझा अंत । थोर मी पतित पांडुरंगा ॥ २ ॥ द्रौपदी बहीणी वैरीं गांजियेली । आपणाऐसी केली पांडुरंगा ॥ ३ ॥ प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार । माझा कां विसर पांडुरंगा ॥ ४ ॥ सुदामा ब्राह्मण दरिद्रें पीडिला । आपणाऐसा केला पांडुरंगा ॥ ५ ॥ तुका ह्मणे तुज शरण निजभावें* । पाप निर्दाळावें पांडुरंगा ॥ ६ ॥

३०५. भागल्याचें तारूं शिणल्याची साउली । भुकेलिया घाली प्रेमपान्हा ॥ १ ॥ ऐसी हे कृपाळू अनाथांची वेशी । सुखाचीच राशी पांडुरंग ॥ २ ॥ सकळां सन्मुख कृपेचिया दृष्टी । पाहे बहु भेटी उतावीळां ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें आतां उरला कैंचा । अनंता जन्मींचा शीणभाग ॥ ४ ॥

३०६. गंगा गेली सिंधुपाशीं । जरी तो ठाव नेदी तिसी ॥ १ ॥ तिणें जावें कवण्या ठायां । मज सांगा

---

* ( जीवें भावें. )

४-५९१-६५००

पंढरिराया ॥ २ ॥ जळ क्षोभलें जलचरां । माता बाळा नेदी थारा ॥ ३ ॥ तुका ह्मणे आलों शरण । देवा त्वां कां धरिलें मौन ॥ ४ ॥

३०७. तुज ह्मणतील कृपेचा सागर । तरि कां केला धीर[1] पांडुरंगा ॥ १ ॥ आझुनि कां नये तुंज माझी दया । काय देवराया पाहतोसी ॥ २ ॥ आळवितों जैसें पाडस कुरंगिणी[2] । पीडिलिया वनीं तानभूक ॥ ३ ॥ प्रेमरस पान्हा पाजीं माझे आई । धांवें वो विठाई वोरसोनि ॥ ४ ॥ तुका ह्मणे माझें कोण हरी दुःख । तुजविण एक पांडुरंगा॥५॥

३०८. वेईन मी जन्म याजसाठीं देवा । तुझी चरण-सेवा साधावया ॥ १ ॥ हरिनामकीर्तन संतांचें पूजन । घालूं लोटांगण महाद्वारीं ॥ २ ॥ आनंदें निर्भर असों भलते ठायीं । सुखदुःखें नाहीं चाड आह्मां ॥ ३ ॥ आणीक सायास न करीं न धरीं आस । होईन उदास सर्व भावें ॥ ४ ॥ मोक्ष आह्मां घरीं कामारी[3] ते दासी । होय सांगों तैसी तुका ह्मणे ॥ ५ ॥

३०९. कासियानें पूजा करूं केशीराजा । हाचि संदेह माझा फेडीं आतां ॥ १ ॥ उदकें न्हाणूं तरी स्वरूप तें तुझें । तेथें काय माझें वेचे देवा ॥ २ ॥ गंधाचा सुगंध पुष्पांचा परिमळ । तेथें मी दुर्बळ काय वाहूं ॥ ३ ॥ वाहूं दक्षिणा तरी धातु नारायण । ब्रह्म तेंचि अन्न दुजें काई ॥४॥ गातां तूं ओंकार टाळी नादेश्वर । नाचावया थार नाहीं कोठें ॥ ५ ॥ फळदाता तूंच तांबोल अक्षता । तेथें मी

---

१ उशीर. २ हरणी. ३ काम करणारी.

अनंता काय वाहूं ॥ ६ ॥ तुका ह्मणे मज अवघें तुझें नाम । धूप दीप रामकृष्णहरि ॥ ७ ॥

३१०. बहु नांवें ठेविलीं स्तुतीचे आवडी । बहुत या गोडी आली रसा ॥ १ ॥ बहु सोसें सेवन केलें बहुवस । बहु आला दिस गोमट्याचा ॥ २ ॥ बहुतां पुरला बहुतां उरला । बहुतांचा केला बहु नटे ॥ ३ ॥ बहु तुका झाला निकट वृत्ती । बहु काकुलती येऊनियां ॥ ४ ॥

३११. आडलिया जना होसी सहाकारी । अंधळिया करीं काठी तूंचि ॥१॥ आडिले गांजिले पीडिले संसारीं । त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥ २ ॥ प्रल्हाद महा संकटीं राखिला । तुह्मीं आपंगिला नानापरी ॥ ३ ॥ आपुलेंची अंग तुह्मीं वोडविलें । त्याचें निवारलें महा दुःख ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुझे कृपे पार नाहीं । माझे विठाबाई जननीये ॥५॥

३१२. कृपावंता कोप न धरावा चित्तीं । छळूं वैक्रोक्तीं स्तुती करूं ॥ १ ॥ आह्मी तुझा पार काय जाणों देवा । नेणों कैसी सेवा करावी ते ॥ २ ॥ अनंता अरूपा अलक्षा अच्युता । निर्गुणा सच्चिता सर्वोत्तमा ॥ ३ ॥ चांगलीं हीं नामें घेतलीं ठेवून । जालासी लहान भक्तिकाजा ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुझ्या पायांवरी सदा । मस्तक गोविंदा असो माझा ॥ ५ ॥

३१३. एकांताचें सुख देई मज देवा । आघात या जीवा चुकवूनी ॥ १ ॥ ध्यानीं रूप वाचे नाम निरंतर । आपुला विसर पडों नेदीं ॥ २ ॥ मायबाळा भेटी सुखाची आवडी ।

---

१ सोंग. २ कुशब्दांनी.

तैशी मज गोडी देईं देवा ॥ ३ ॥ कीर्ती ऐकोनियां जालों शरणागत । दासाचें तूं हित करितोसी ॥ ४ ॥ तुका ह्मणे मी तों दीन पापराशी । घालावें पाठीशीं मायबापा ॥ ५ ॥

३१४. वेडें वांकडें गाईन । परि मी तुझाचि ह्मणवीन ॥ १ ॥ मज तारीं दीनानाथा । ब्रीद साच करीं आतां ॥ २ ॥ केल्या अपराधांच्या राशी । म्हणऊनि आलों तुजपाशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मज तारीं । सांडीं ब्रीद नाहीं तरी ॥ ४ ॥

३१५. तूं माझी माउली तूं माझी साउली । पाहातों वाटुली पांडुरंगे ॥ तूं मज येकला वडील धाकुला । तूं मज आपुला सोयिरा जीव ॥ २ ॥ तुका म्हणे जीव तुजपाशीं असे । तुजविण ओस सर्व दिशा ॥ ३ ॥

३१६. आणीक म्यां कोणा यावें काकुळती । कोण कामा येती अंतकाळीं ॥ १ ॥ तूं वो माझी सखी होसी पांडुरंगे । लवकरी ये गे वाट पाहें ॥ २ ॥ काया वाचा मनें हेचि आस करीं । पाउलें गोजिरीं चिंतीतसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझी पुरवीं हे आस । धालीं ब्रह्मरस भोजन हें ॥ ४ ॥

३१७. अपराध झाले जरी असंख्यात । तरी कृपावंत नाम तुझें ॥ १ ॥ तुझें लडिवाळ तुज कृपा यावी । म्यां वाट पहावी कवणाची ॥ २ ॥ मायबाप माझा रुक्मादेवीवर । हा दृढ निर्धार अंतरींचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोणे गोष्टीचें संकट । न घालीं मज भेट नारायणा ॥ ४ ॥

३१८. पहा ते पांडव अखंड वनवासी । परि त्या देवासी आठविती ॥ १ ॥ प्रल्हादासी पिता करितो जाचणी । परि तो स्मरे मनीं नारायण ॥ २ ॥ सुदामा ब्राह्मण दरिद्रें

पीडिला । नाहीं विसरला पांडुरंगा ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर झाले तरी ॥ ४ ॥

३१९. बोल नाहीं तुझ्या दातृत्वपणासी । आह्मी अविश्वासी सर्वभावें ॥ १ ॥ दंभें करी भक्ती सोंग दावी जना । अंतरीं भावना वेगळिया ॥ २ ॥ चित्ता तूं रे साक्षी तुज कळे सर्व । किती करूं गर्व आतां फुकें ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा तूं काय करिसी । कर्मा दुस्तरासी आमुचिया ॥ ४ ॥

३२०. हेंचि माझें धन । तुमचे वंदावे चरण ॥ १ ॥ येणें भाग्यें असों जीत । एवढें समर्पूनी चित्त ॥ २ ॥ सांभाळिलें देवा । मज अनाथाजी जीवा ॥ ३ ॥ जोडूनियां कर । तुका विनवितो किंकर ॥ ४ ॥

३२१. जाऊं देवाचिया गांवा । देव देईल विसांवा ॥ १ ॥ देवा सांगों सुखदुःख । देव निवारील भूक ॥ २ ॥ घालूं देवासीच भार । देव सुखाचा सागर ॥ ३ ॥ राहों जंवळी देवापाशीं । आतां जडोनी पायांसी ॥ ४ ॥ तुका ह्मणे आह्मी बाळें । या देवाचीं लडिवाळें ॥ ५ ॥

३२२. अमिषाचिये आशें गळ गिळी मासा । फुटोनियां घसा मरण पावे ॥ १ ॥ मरणाचे वेळीं करी तळमळ । आठवी कृपाळ तये वेळीं ॥ २ ॥ अंतकाळीं ज्याच्या नाम आलें मुखा । तुका ह्मणे सुखा पार नाहीं ॥ ३ ॥

३२३. मज अभयदान देई तूं दातारा । कृपेच्या सागरा मायबापा ॥ १ ॥ देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं ।

---

१ हेतु. २ च्या करंट्या कर्मास.

आणीक मी कांहीं दुजें नेणें ॥ २ ॥ सेवाभक्तीहीन नेणता पतित । आतां माझें हित तुझ्या पायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझें सर्वही साधन । नामसंकीर्तन विठोबाचें ॥ ४ ॥

३२४. मी तों दीनाहूनि दीन । माझा तुज अभिमान ॥ १ ॥ मी तों आलें शरणागत[१] । माझें करावें स्वहित ॥ २ ॥ दिनानाथा कृपाळुवा । सांभाळावें आपुल्या नांवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां । भलें नव्हे मोकलितां ॥ ४ ॥

३२५. देवा ऐकें हे विनंती । मज नको रे हे मुक्ती । तया इच्छा गति । हेंचि सुख आगळें ॥ १ ॥ या वैष्णवांचे घरीं । प्रेमसुख इच्छा करी । रिद्धिसिद्धि द्वारीं । कर जोडूनि तिष्ठती ॥ २ ॥ नको वैकुंठींचा वास । असे तया सुखा नाश । अद्भुत हा रस । कथाकाळीं नामाचा ॥ ३ ॥

३२६. न कळसी ज्ञाना न कळसी ध्याना । न कळसी दर्शना धुंडाळितां ॥ १ ॥ न कळसी आगमा न कळसी निगमा । न बोलवे सीमा वेदां पार ॥ २ ॥ तुका ह्मणे तुझा नाहीं अंतपार । ह्मणोनि विचार पडिला मज ॥ ३ ॥

३२७. बहुतां जातींचा केला अंगीकार । बहुतही फार सर्वोत्तमें ॥ १ ॥ सरलाचि नाहीं कोणाचिये वेचें । अक्षोभ ठायींचें ठायीं आहे ॥ २ ॥ लागतचि नाहीं घेतां अंतपार । वसवी अंतर अणुचेंही ॥ ३ ॥ तुका ह्मणे केला होय टाकीऐसा । पुरवावी इच्छा धरिली ते ॥ ४ ॥

३२८. तुह्मी तों सदैव । अधीरपणें माझी हांव ॥ १ ॥ जळो आशेचें तें जिणें । टोंकतसों दीनपणें ॥ २ ॥

---

१ सोडितां, त्यागितां.

येथूनि सोडवा । आतां अनुभवेंसी देवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे जालें । एक मग हें निमालें ॥ ४ ॥

३२९. हरिचिया भक्ता नाहीं भय चिंता । दुःखनिवारिता नारायण ॥ १ ॥ नलगे वाहणें संसारउद्वेग । जडों नेदी पांगे देवराव ॥ २ ॥ असों द्यावा धीर सदा समाधान । आहे नारायण जवळीच ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझा सखा पांडुरंग । व्यापियेलें जग तेणें एकें ॥ ४ ॥

३३०. कृपावंत किती । दीन बहु आवडती ॥ १ ॥ त्यांचा भार वाहे माथां । करी योगक्षेमचिंता ॥ २ ॥ भुलों नेदी वाट । करीं धरूनि दावी नीट ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवें । अनुसरतां एका भावें ॥ ४ ॥

३३१. आपुल्या महिमानें । धातु परिसें केलें सोनें ॥ १ ॥ तैसे नै मनीं माझे आतां । गुणदोष पंढरिनाथा ॥२॥ गांवाखालील वोहोळ । गंगा न मनी अमंगळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे माती । केली कस्तूरीनें सरती ॥ ४ ॥

---

### ३५. अनन्य भक्ति.

३३२. पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आह्मां नारायण तैशापरी ॥ १ ॥ सर्व भावें लोभ्या आवडे हें धन । आह्मां नारायण तैशापरी ॥ २ ॥ तुका ह्मणे एकविध झालें मन । विठ्ठलावांचून नेणें दुजें ॥ ३ ॥

३३३. तुजविण वाणीं आणिकांची थोरी । तरी माझी हरी जिव्हा झडो ॥ १ ॥ तुजविण चित्ता आवडे आणीक ।

---

१ पराधीनपणा, दैन्य. २ प्रभावानें. ३ न मानी. ४ मोलवान केली.

तरी हा मस्तक भंगो माझा ॥२॥ नेत्रीं आणिकांसी पाहीन आवडी । जातु तेचि घडी चांडाळ हे ॥ ३ ॥ कथामृतपान न करिती श्रवण । काय प्रयोजन मग यांचें ॥ ४ ॥ तुका ह्मणे काय वांचून कारण । तुज एक क्षण विसंबतां ॥ ५ ॥

३३४. काय करूं आन दैवतें । एकाविण पंढरीनाथें ॥ १ ॥ सरिता मिळाली सागरीं । आणिकां नांवां कैंची उरी ॥ २ ॥ अनेक दीपींचा प्रकाश । सूर्य उगवतां नाश ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेणें दुजें । एकाविण पंढरीराजें ॥४॥

३३५. कृष्ण गातां गीतीं कृष्ण ध्यातां चित्तीं । तेही कृष्ण होती कृष्णध्यानें ॥ १ ॥ आसनीं शयनीं भोजनीं जेवितां । ह्मणा रे हा भोक्ता* नारायण ॥ २ ॥ ओंवियें दळणीं गावा नारायण । कांडितां कांडण करितां काम ॥ ३॥ नर नारी याति हो कोणी भलतीं । भावें एका प्रीती नारायणा ॥ ४ ॥ तुका ह्मणे एका भावें भजा हरी । कांति ते दुसरी रूप एक ॥ ५ ॥

३३६. सर्वभावें आलों तुजचि शरण । कायावाचामनेंसहित देवा ॥ १ ॥ आणिक दुसरें नये माझ्या मना । राहिली वासना तुझ्या पायीं ॥ २ ॥ माझिये जत्रिंचें कांहीं जडभारी । तुजविण वारी कोण एक ॥३॥ तुझे आह्मी दास आमुचा तूं ऋणी । चालत दुरूनी आलों मागें ॥४॥ तुका ह्मणे आतां घेतलें धरणें । हिशोबाकारणें भेटी देईं ॥ ५ ॥

३३७. सर्व संगीं विट आला । तूं एकला आवडसी ॥ १ ॥ दिली आतां पायीं मिठी । जगजेठी न सोडीं

---

* ( भोगिता. ) १ निवारी.

॥ २ ॥ बहु जालों खेदेंक्षीण । येणें शीण तो नासे ॥३॥ तुका ह्मणे गंगे वास । बहु त्या आस स्थळाची ॥ ४ ॥

३३८. पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती । सर्वभावें पति ध्यानीं मनीं ॥ १ ॥ तैसें माझें मन एकविध जालें । नावडे विठ्ठलेविण दुजें ॥ २ ॥ सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा । गाय ते कोकिळा वसंतेंसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बाळ मातेपुढें नाचे । बोल आणिकांचे नावडती ॥ ४ ॥

३३९. धीर तो कारण एकविधभाव । पतिव्रते नाहों सर्वभावें ॥ १ ॥ चातक हे जळ न पाहाती दृष्टी । वाट पाहे कंठीं प्राण मेघा ॥ २ ॥ सूर्यविकासिनी नेघे चंद्रामृत । वाट पाहे अस्तउदयाची ॥ ३ ॥ धेनु येऊं नेदी जवळी आणिकां । आपुल्या बाळकाविण वत्सा ॥ ४ ॥

---

## ३६. स्वतांविषयीं.

३४०. संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें । काय म्यां ग-व्हारें जाणावें हें ॥ १ ॥ विठ्ठलाचें नाम घेतां नये शुद्ध । तेथें मज बोध काय कळे ॥ २ ॥ करितों कवतुक बोबड्या उत्तरीं । ह्मणीं मजवरी कोप धरा ॥ ३ ॥ काय माझी याति नेणां हा विचार । काय मी तें फार बोलों नेणें ॥४॥ तुका ह्मणे मज बोलवितो देव । अर्थ गुह्य भाव तोचि जाणे॥५॥

३४१. हीन माझी याती । वरि स्तुती केली संतीं ॥ १ ॥ अंगीं वसूं पाहे गर्व । माझें हरावया सर्व ॥ २ ॥ मी एक जाणता । ऐसें वाटतसे चित्ता ॥ ३ ॥ राख राख गेलों वांयां । तुका ह्मणे पंढरीराया ॥ ४ ॥

---

१ अत्यंत पश्चात्तापयुक्त.

३४२. वेळोवेळां हेंचि सांगें । दान मागें जगासी ॥ १ ॥ विठ्ठल हे मंगळवाणी । घेऊं धणी पंगती ॥ २ ॥ वेचतसे पळें पळ । केलें बळ पाहिजे ॥ ३ ॥ तुका ह्मणे दुश्चित नका । राहों फुका नाडे हा ॥ ४ ॥

३४३. हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥ गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥२॥ नलगे मुक्ति धन संपदा । संतसंग देई सदा ॥ ३ ॥ तुका ह्मणे गर्भवासीं । सुखें घालावें आह्मांसी ॥ ४ ॥

३४४. कळेल हें तैसें गाईन मी तुज । जनासवें काज काय माझें ॥ १ ॥ करीन मी स्तुती आपुले आवडी । जैसी माझ्या गोडी वाटे जीवा ॥ २ ॥ होऊनि निर्भर नाचेन मी छंदें । आपुल्या आनंदेंकरूनियां ॥ ३ ॥ काय करूं कळा युक्ती या कुसरी । जाणिवेच्या परी सकळिका ॥ ४ ॥ तुका ह्मणे माझें जयासवें काज । भोळा तो सहज पांडुरंग॥५॥

३४५. पोटीं शूळ अंगीं उटी चंदनाची । आवडी सुखाची कोण तया ॥ १ ॥ तैसें मज कां गा केलें पंढरिराया । लौकिक हा वांयां वाढविला ॥ २ ॥ ज्वरलियापुढें वाढिलीं मिष्टान्नें । काय चवी तेणें घ्यावी त्यांची ॥ ३ ॥ तुका ह्मणे मढें शृंगारिलें वरी । तेचि झाली परी मज देवा ॥ ४ ॥

३४६. नावडावें जन नावडावा मान । करूनि प्रमाण तूंचि होई ॥ १ ॥ सोडवूनि देहसंबंध व्यसनें । ऐशी

---

१ आपण सर्व पोटभर विठ्ठल हें मंगलनाम घेऊं या. २ तुका ह्मणे निराश गाफल राहूं नका. तो व्यर्थ दगा आहे. ३ संपत्तीचें वैभव.

नारायणें कृपा कीजे ॥ २ ॥ नावडावें रूप नावडावे रस । अवघी राहो आस पायांपाशीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां आपुलिया सत्ता । करूनि अनंता ठेवा ऐसें ॥ ४ ॥

३४७. ऐसें भाग्य कई लाहाता होईन । अवघें देखें जन ब्रह्मरूप ॥ १ ॥ मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ॥ २ ॥ शांति क्षमा दया मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिकां ॥ ३ ॥ विवेकासहित वैराग्याचें बळ । धगधगितो ज्वाळ अग्नि जैसा ॥ ४ ॥ भक्तिनवविधा भावशुद्ध बरी । अलंकारावरी मुगुटमणि ॥ ५ ॥ तुका ह्मणे माझी पुरवीं वासना । कोण नारायणा तुजविण ॥ ६ ॥

३४८. काय माझे नेती वाईट ह्मणोन । करूं समाधान कशासाठीं ॥ १ ॥ काय मज लोक नेती परलोका । जातां कोणा एका निवारेला ॥ २ ॥ न ह्मणें कोणासी उत्तम वाईट । सुखें माझी कूटं खावो मागें ॥ ३ ॥ सर्व माझा भार असे पांडुरंगा । काय माझें जगासवें काज ॥४॥ तुका ह्मणे माझें सर्वही साधन । नामसंकीर्तन विठोबाचें ॥ ५ ॥

३४९. आपुलिया बळें नाहीं मी बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची ॥ १ ॥ साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ॥ २ ॥ काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परी त्या विश्वंभरें बोलविलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगळां पायांविण ॥४॥

३५०. नव्हे हें कवित्व टांकसाळी नाणें । घेती भले जन भले लोकें ॥ १ ॥ लागलासे झरा पूर्ण नवनीतें ।

---

१ निंदा करोत. २ जे भले आहेत परिक्षक आहेत तेच हे घेतात. ३ नवनीतानें भरलेला.

सेविलियां हित फार होय ॥ २ ॥ तुका ह्मणे देवा केला बलात्कार । अंगा आलें फार महंतपण ॥ ३ ॥

३९१. नव्हों वैद्य आह्मी अर्थाचे भुकेले । भलते द्यावे पाले भलत्यांसी ॥ १ ॥ कुपथ्य करूनि विटंबावे रोगी । काय हे सलगी भीड त्याची ॥२॥ तुका ह्मणे लासूं फांसूं देऊं डाव । सुखाचा उपाव पुढें आहे ॥ ३ ॥

---

## तुकारामाच्या अभंगांतील निवडक वेंचे.

### थोरपण.

१ संकोचतो जीव महत्वाच्या भारें । दासत्वचि बरें बहु वाटे.
२ जननिंदा होय तो बरा विचार । थोरवीचा भार कामा नये.
३ तुका ह्मणे थोरपणें । नरक होती अभिमानें.

### संगति.

४ तुका ह्मणे संग उत्तम असावा । याविण उपावा काय सांगों.
५ तुका ह्मणे करूं ऐसीयाचा संग । जेणें नव्हे भंग चिंतनाचा.

### दया.

६ धन्य ते संवसारीं । दयावंत जे अंतरीं.
७ परउपकारें कायावाचामन । वेचे सुदर्शन रक्षी तया.
८ जीवा ऐसें देखे आणिकां जिवांसी । निखळचि राशी गुणांचीच.
९ नारायण भूतीं न कळे जयासी । तयां गर्भवासीं येणें जाणें.
१० आत्मा नारायण सर्वां घटीं आहे । पशुमध्यें काय कळों नये.
११ देव सारावे परते । संत पूजावे आरते.
१२ भीत नाहीं आतां आपुल्या मरणा । दुःखी होतां जना न देखवे.

### क्षमा-शांति.

१३ सुख देते शांती । तुका ह्मणे धरितां चित्तीं.
१४ योग्याची संपदा त्याग आणि शांति। उभय लोकीं कीर्ति सोहळा मान.

१५ अभिमानाची स्वामिनी शांति । महत्व घेती सकळ.

१६ तुका ह्मणे क्षमा सुखाची हे राशी । सांडूनि कां ऐसी दुःखी व्हावें.

## धैर्य.

१७ तुका ह्मणे अंगा येतां । तरी सत्ता धैर्याची.

१८ धीर तो कारण । साह्य होतो नारायण.

१९ शूरत्वासी मोल । नये कामा फिके बोल.

२० तुका ह्मणे नाहीं ज्यासी निर्धार । नाडला साचार तोची एक.

२१ हा गे आलों कोणी ह्मणे बुडातिया । तेणें किती तया बळ चढे.

## शब्द आणि क्रिया.

२२ बोलाचिच कढी बोलाचाचि भात । जेवूनियां तृप्त कोण झाला.

२३ तुका ह्मणे करूनि दावी । त्याचे पाय माझे जीवीं.

२४ बोले तैसा चाले । तुका ह्मणे तो अमोल.

२५ तुका ह्मणे जे जैसें करिती । ते पावती तैसींच फळें.

## वर्म.

२६ तुका ह्मणे वर्म । येरां नाचवितो भ्रम.

२७ वर्म जाणावें हा मुख्य धर्म सार । अवघे प्रकार तयापाशीं.

२८ कर्म चुकालिया नव्हे तें कारण । केला होय शीण आवघाचि.

## गर्व.

२९ मान दंभासाठीं । केली अक्षरांची आटी.

३० पंडित ह्मणतां थोर सुख । परि तो पाहतां अवघा मुर्ख.

३१ विद्या अल्प परी गर्व शिरोमणि । मजहुनि ज्ञानी कोण आहे.

## लाज.

३२ लाज पुढें उभी राहिली आडवी । ते करी गाढवी थोर घात.

३३ जरी हे आड येती लाज । कैसें काज साधतें.

३४ उल्लंघिली लाज । तेणें साधियेलें काज.

८६

## आळस.

३५ कार्य करूं मज नागविलें आळसें । बहुत या सोसें पीडा केली.

३६ तुका ह्मणे आळस । तोचि कारणांचा नास.

## शंका.

३७ संदेह निरसे तरि रुचिकर । फिक्यासी आदर चवी नाहीं.

३८ तुका ह्मणे शंका । हित आड या लौकिका.

## मन.

३९ आपुलेंचि मन । करवी आपणां बंधन.

४०. अवघ्या उपचारा । एक मनचि दातारा.

४१ शास्त्रज्ञ हो ज्ञाते असती बहुत । परि नाहीं चित्त हाता आलें.

४२ तुका ह्मणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा.

## चित्तशुद्धि.

४३ चित्त तें निर्मळ जैसें नवनीत । जाणिजे अनंत तयामाजी.

४४ उभयतां एक चित्त । तरी प्रीत वाढली.

४५ तुका ह्मणे बुद्धि । ज्याची तेच तया सिद्धि.

## शरीर.

४६ शरीर सोकलें देखलिया सुखा । कदान्न हें मुखा मान्य नाहीं.

४७ तुका ह्मणे जाला अवगुणांचा थारा । वाढली हे निद्रा आळस त्‍दु

४८ तुका ह्मणे पोटें केली विटंबना । दीन झाला जना कींव भाकी.

## मद्यपान.

४९ तुका ह्मणे मद्यपानाची आवडी । न रुचे त्या गोडी नवनीताची.

५० मद्यपी तो पुरा अधम यातीचा । तया उपदेशाचा राग वांयां.

## उपदेशपर.

५१ तुका ह्मणे कानीं । घालूं आले दुष्टवाणी.

५२ तुका ह्मणे जैसी वाणी । तैसे मनीं परिपाक.

५३ तुका ह्मणे बळें । उपदेशाचें तोंड काळें.
५४ बहुत सोसिले मागें न कळतां । पुढती काय आतां अंध व्हावें.
५५ तुका ह्मणे अझुनि तरी । उरलें तें जतन करीं.
५६ तुका ह्मणे कांहीं उघडा रे डोळे । जाणोनि अंधळे होऊं नका.
५७ कोणाही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें.
५८ खोल ओलें पडे तें पीक उत्तम । उथळाचा श्रम वायां जाय.
५९ उंबरांतील कीटका । हेंचि ब्रह्मांड ऐसें लेखा.
६० आंधळयाचे काठी लागले आंधळे । घात एक वेळे मागें पुढें.
६१ बीज पेरूनियां तेंचि घ्यावें फळ । डोरलीस केळ कैसें लागे.
६२ चिंतनासी नलगे वेळ । सर्वकाळ करावें.
६३ प्रीतीचिया बोला नाहीं पेसपाड । भलतेसें गोड करूनि घेई.
६४ तुका ह्मणे सांडी लटिक्याचा संग । आनंद तो मग प्रगटेल.
६५ शूरत्वावांचूनी शूरांमाजीं ठाव । नाहीं आविर्भाव आणिलिया.
६६ लोभावरी ठेवुनि हेत । करी असत्य न्यायनीत.
६७ शिकवूनि हीत । सोयी लावावे हे नीत.
६८ अंतरीचें ध्यान । मुख्य या नांवें पूजन.
६९ वेळो वेळां वाचे आठवितां नाम । अधिकचि प्रेम वाढे घेतां.
७० पेणावलें ढोर मार खाय पाठीं । बैसलें तें उठी तेथूनियां.
७१ स्तवूनियां नरा । केला आयुष्याचा मातेरा.
७२ चंदनाच्या वासें वसतां चंदन । होती काष्ट आन वृक्षयाती.
७३ तुका ह्मणे आधीं करावा विचार । शूरपणें तीर मोकलावा.
७४ कोठें नाहीं अधिकार । गेले नर वांया ते.
७५ घूसळितां ताक'कांडितां भूस । साध्य नाहीं क्लेश जाती वांयां.
७६ तुका ह्मणे रूप नाहीं दर्पणांत । संतोषाची मात दुसरें तें.
७७ रडोनियां मान । कोण मागतां भूषण.
७८ आणितां त्या गती । हंस काउळे न होती.
७९ बेडकानें चिखल खावा । काय ठावा सागर.

८० तुका ह्मणे भलते याती । विठ्ठल चित्तीं ते शुद्ध.
८१ आधीं सोज्वळ करावा मारग । चालतां तें मग गोवी नाहीं.
८२ अह्मां हें कौतुक जगा द्यावी नीत । करावे फजित चुकर्ता ते.
८३ नाहीं शीण आह्मां जालें कवतुक । पुनीत हे लोक करावया.

## परमेश्वराविषयीं.

८४ तुका ह्मणे सकळ तीर्थें । तुझे पायीं वसती तेथें.
८५ सत्य संकल्पाचादाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ.
८६ तुका ह्मणे सीमा नाहीं तुझे दये । कोमलहृदये पांडुरंगा.
८७ जे जे शरण आले ते ते आपंगीले । पवाडे विठ्ठले ऐसे तुझे.
८८ तुका ह्मणे देवा कांहीं बोल नाहीं । तुझा तूंचि पाहीं शत्रू सखा.
८९ तुका ह्मणे उदकीं तारिले दगड । तैसा मीही जड एक देवा.
९० अवघाचि आकार ग्रासियेला काळें । एकचि निराळें हरीचें नाम.
९१ बोल नाहीं तुझ्या दातृत्वपणासी । आह्मी अविश्वासी सर्वभावें.
९२ तुका ह्मणे भार घातलीयावरी । होईल कैवारी नारायण.

समाप्त.

# कांहीं कठिण अभंगांचें विशेष स्पष्टीकरण.

२ ॥ १ ॥ पुढें रोग होऊं नये, पुढील बाधा निवारण व्हाव्या ह्मणून आई मुलाला औषध देते. परंतु त्याला त्यापासून दुःख वाटतें.

३ ॥ १ ॥ [ दुसरा पाठ ]. वाळ निरवावें—आईजवळ वाळ सोपवावें लागत नाहीं. ॥ २ ॥ ज्यानें जन्म दिला त्याला काळजी; असें असतांना मी कां विचारांत पडलों. आघात—मार.

४ ॥ १ ॥ लळा लावून ती मुलाचें पालन करीत नाहीं काय ? कांटाळा—कंटाळा.

९ ॥ ३ ॥ स्त्री, पुत्र व सेवक ह्यांच्या नांवांनीं देवाचें स्मरण होतें. अजामीळ देवाचें नांव घेत नसे. परंतु मुलाचें नांव घेत-ल्यानें त्यानें देवास हांक मारली. ( ४ ) चिंधींत बांधलेलें रत्नच घ्यावयाचें असतें. परंतु चिंधी तें सांभाळून ठेवते ह्मणून तिचे उपकार.

१० ॥ ४ ॥ बालकाला बोलतां येत नाहीं तरी गोड, तिखट, खारट ह्यांची चव कळते. बरें काय, वाईट काय ह्याचा मनांतच विचार करावा. भल्यांनीं अधिक विचारण्याचें कारण नाहीं.

११ ॥ ४ ॥ तुका जाणोनियां नेणता, लोकांसारिखा नव्हे. लोकांना तोंडापुरतें कोणतें, खरें जिव्हाळ्याचें कोणतें, हें समजत नाहीं. कित्येक समजतात व मोहांत पडतात. तसा तुका नव्हे. तो हें जाणूनही अज्ञान बालक आहे. त्याचा भार त्याच्या आई-वर—पांडुरंगावर आहे.

१२ ॥ ३ ॥ अंगीं नम्रता असली कीं सर्व पण—हेतू साध्य होतात. ॥ ४ ॥ तुका ह्मणे पाणी पातळ, त्यांत ताठपणा नाहीं, तरी सुद्धां तें तळास, भुईस खणीत जातें.

१३ ॥ १ ॥ तंतु ज्या प्रमाणें वस्त्रांत मिळून जातात, नाश पावत नाहींत. ॥ ४ ॥ हत्ती सैन्याची दाणादाण करतो परंतु लहान मुंगी त्याच्या पायाखालीं मरत नाहीं. तिच्याबरोबर हत्तीच्या पा-याखालीं कोण जाऊं शकेल ? कारण ती लहान व नम्र आहे.

१७ ॥ २ ॥ नीति, अनीति ह्यांचा विचार न करतां जें करणें तें पाप. उन्मत्त नेहमीं असेंच भलतें करीत असतात. सार आणि असार निवडणें, वेगळालीं करणें हाच धर्म, हीच नीति.

१९ ॥ ३ ॥ हे आपल्या कर्मांचीं फळें भोगतील हें मी आपल्या डोळ्यांदेखत पाहीन.

२१ ॥ २ ॥ तो धांवून त्या घरास येतो आणि तेथें थारा धरून राहतो ॥ ४ ॥—तुका ह्मणे नामें पूजा घडे, नामें देव जोडे.

२३ ॥ ३ ॥ ४ ॥ काम क्रोधानें खवळल्यावर लोभ, मोह, दंभ इत्यादि प्रकारच्या अनेक व्याधी अंगीं भरतात परंतु त्यांचा त्याग करून शांति धरली कीं सर्व व्याधी आपोआप जातात.

३० ॥ ३ ॥ आपलीच रूढी तिनें प्रचारात आणली, परंतु पोटीं ती वाईट आहे, हें लोकांना समजत नाहीं. राउळा—आमच्या कीर्तन समारंभांत. देवळांत.

३१ ॥ ४ ॥ माहेर–आवडीचें स्थळ–ईश्वर चिंतन.–सुखासाठीं तिला खांद्यावर वाहिलें असतांना तिनें अवगुणांचा समुदाय मिळविला. केला चौघाचार इ० पंचाईत केली. लोकांमध्यें खेंचून नेलें. अध्यात्मिक अर्थ–मला पंचेंद्रियांच्या स्वाधीन केलें.

३६ ॥ ४ ॥ ह्या देहाची पाठवणी–बोळवण करून स्वर्ग साध्य करूं.

३९ ॥ २ ॥ बाजारांत त्याचा मोठा दगा झाला. चोर त्याच्या गांठीचें भांडवल घेऊन गेले. भांडवल जाऊन ही तो मोकळा नाहीं. दंभ लोभ यांनीं त्याचा गळा बांधला. ॥ ४ ॥ त्याच्या गांठीस नागवण पडली असें दिसे.

४५ आशाबद्ध वक्ता व श्रोता ह्यांची गांठ ह्मणजे बहिऱ्या मुक्याची गांठ, अशा भजनाचा लाभ कोणता. तुका ह्मणे तें मापही रिकामें आणि ती गोणीही रिकामीच.

४६ ॥ १ ॥ उदास—निस्पृह, जो नेणता त्याचे मागें उपाधी नाहीं. तो भजनास किंवा भोजना तयार.

४८ ॥ ४ ॥ देवा तुला हव्यास फार आहे. धनलोभ्यासारखी तुझी तऱ्हा आहे.

५८ ब्रह्मचाऱ्यानें विद्यार्जन करावें, गृहस्थाश्रमी मनुष्यानें शट्कर्मविहित आचरण करावें. वानप्रस्थाश्रमी यांनें संसारांत राहून कर्मफलाचा त्याग करावा आणि संन्याशानें सर्व संकल्पांचा परित्याग करावा. जो ह्या विरहित वागतो तो वेदाज्ञेप्रमाणें पतित होतो. तुका ह्मणे नेमावांचून कार्यसिद्धि नाहीं, ज्याला नेम नाहीं तो शीण पावतो, दुःख पावतो.

६० ॥ २ ॥ वासनेच्या द्वारें काम वाढे, भय वाढे. योग्य काळानें तें सर्व धुळीस मिळविलें, ॥ ४ ॥ लटिक्याची स्तुति होतां जिव्हेसी मळ विटाळ करी.

६२ ॥ ४ ॥ वर्म न समजतां जो खटपट करतो. ती त्याची बुद्धि त्याला अवकळा पाठविते.

७० ॥ ४ ॥ वाऱ्यानें काळवेळ, अनुमान, थंडी, वारा, इत्यादि समजतात.

७४ ॥ ४ ॥ हा अग्नि आहे, ह्यांत पाय घालूं नये, तो आपणास जाळील—हा विचार सती जसा पहात नाहीं, तद्वत् साधकानें इतर विचार सोडून देऊन मन घट्ट करावें.

७७ ॥ ३ ॥ अवघें साधन, अवघें साध्य हें कीं तुझ्या पायांवर माझा सर्व जीवभाव असावा.

८० ॥ ५ ॥ या अनुभवानें समजलें जातें.

८७ ॥ ४ ॥ जिवंत आहां तोंपर्यंत जीवाला निश्चित ठिकाणीं लावा, गुंत्यांत पडलां असतांना देशोधडीस लागाल, वाहावाल.

८८ ॥ ४ ॥ आधीं तुका नागवला. तो मनुष्य कोटींतून पलीकडे गेला.

९१ ॥ १ ॥ वनस्पतींना बोलावून ॥ ३ ॥ बाबांनों जागे व्हा असें ह्मणून सूर्य लोकांना जागे करीत नाहीं. लोक आपोआप जागे होतात. किरणांनों प्रकाश करा असेंही तो ह्मणत नाहीं, तो स्वतः प्रकाशमान असतो.

९३ ॥ २ ॥ धन्य जाती असली तर भाग्यें वेधलीं जाऊन सन्मुख होतात. किंवा पूर्व संचितानें धन्य जाती साध्य केल्यावर

भाग्यें सन्मुख होतात. ॥ ४ ॥ तुका ह्मणे भीति किंवा काळजी कशाची त्या ठिकाणीं सुजाती आहे. किंवा-जेथें सुजाती आहे ते ठाकणीं-त्या जागेला भीति कशाची.

९४ ॥ ३ ॥ कुत्र्याला खीर घातली असतां ती त्याला ओकविते. परंतु भोक्ता जो असतो तो ती पोटभर खातो. ती त्याला पुष्टी देते.

९६ ॥ ४ ॥ नरजन्म हें भांडवल. ॥ ५ ॥ मी वायां गेलों आहें असें दिसतें, आणि मी जो हा लौकिक वाढविला आहे याचें हांसूं होईल.

९७ ॥ ४ ॥ लग्नकार्यांत पुष्कळ पैसे खर्च केले, उत्तम तयारी केली परंतु नवरा नवरीस ठिकाण नाहीं तर त्याचा काय उपयोग? सर्व फुकट.

१०० ॥ २ ॥ सोपारें-सोपें.

१०४ ॥ ३ ॥ दयेकरितां हा सर्व पसारा, ही खटपट. जड जीवांना तारण्याकरितांच या कथारूपी नावा, तरी केल्या, तारा-तरी, उताराच्या जागा.

१०५ ॥ ५ ॥ सूर्याप्रमाणें तुका हा सर्व ठिकाणीं आहे. याचें अंतःकरण विश्वमय झालें आहे.

१०६ ॥ १ ॥ चंदनाच्या झाडाचे सर्वच भाग चंदनयुक्त सुवासिक.

११५ ॥ ४ ॥ तुका गाण्यांत तन्मय होतो.

११४ ॥ ३ ॥ जो चतुर तो लक्षणांनीं, खुणांनीं ओळखून राखतो. ॥ ४ ॥ सर्वश्रम एके ठिकाणीं. एक दिवा हातीं असला कीं त्याला सर्वच बरें.

१३१ ॥ ४ ॥ तुका ह्मणे त्यांची जातच अशी कीं ते नरकाकडेस पायांनीं चालत जातात.

१०४ ॥ १ ॥ जो धोंड्यापेंक्षां सर्व गुणांनीं अधिक परंतु भला. सरते-मार्गाला लागणारे, चालतील असे.

१४८ ॥ १ ॥ विटाळसें—अस्पृश्य, अमंगळ, वस्तूप्रमाणें ॥४॥ त्याच्या ठायीं तें पाप मोठ्या आदरानें राहातें.

१४९ ॥ ४ ॥ तुका ह्मणें सर्पा नवनीत पाजूनि काय उपयोग, अमृताचें विष निश्चित होतें.

१५० ॥४॥ वेळूस चंदनाच्या संगतींत व जवळ असूनही त्यांना सुवास लागत नाहीं.

१५१ ॥ ३ ॥ भावार्थ वचन—खऱ्या अर्थाचें भाषण.

१५४ ॥ १ ॥ कुदळ घेऊन मारण्यास धांवतो.

१६३ ॥ १ ॥ लौकिकाचारांत तो उत्तम दिसतो.

१६७ ॥ ५ ॥ जो शिष्य गुरुला भजणार नाहीं तो आपलें अन-हित करून घेईल.

१७२ ॥ २ ॥ आपुलें हित काय आहे हें त्याला समजत नाहीं. पोपट नळीवर बसून ती पायांनीं घट्ट धरतो आणि आपणास कोणीं बांधलें आहे अशी त्याची कल्पना होते. त्याला आपल्या पंखांची विस्मृति पडते.

१७४ ॥ ३ ॥ हर्षाहर्षीं मंगा न ये—आनंद झाला असतां किंवा राग आला असतांही समवृत्ति सोडूं नको. तुका ह्मणे जीवानें अगोदर मरून रहावें. ह्मणजे मरणाचें भय नाहीं. जीवाच्या सर्व भावना अगोदर नाहींशा कराव्या.

१७६ ॥ ४ ॥ मोतीं शिंपे पोटीं मात्र उत्पन्न होतें. परंतु तिला त्याचा भोगही नाहीं आणि भेटही नाहीं.

१७६ ॥ ४ ॥ जोपर्यंत तो यमदुतांच्या हातीं पडला नाहीं, स्वाधीन झाला नाहीं, तोंपर्यंत ममता वाढवितो. तुका मात्र उपदेश करतो. परंतु हेकड माकड कांहीं ऐकत नाहींत.

१८० ॥ ३ ॥ सोंवळ्याचा मात्र डौल, परंतु अंतर्यामीं क्रोधानें विटाळलेला असतो. तुका ह्मणें तें सोंग बाहेरील रंग दाखवितें.

१८२ ॥ ४ ॥ तुका ह्मणे व्यर्थ चित्त कां दुःखपाववावें.

१८३ ॥ २ ॥ लाभ हानी ज्याची त्याला. त्याला पावसानें काय करावें ? भूमीनें काय करावें ? त्यांची स्वाभाविक क्रिया चालू असते.

१८४ ॥ ३ ॥ जो भक्ष अमंगळ तो ती खाय—खाते.

१८६ ॥ ३ ॥ ह्या चरणाचा अर्थ बरोबर लागत नाही.

१८७ ॥ ३ ॥ तुका ह्मणे जो धन्य पुरुष देव दाखवील त्याची भेट होणें महत् पुण्य होय. कारण तो कल्पतरु किंवा कामधेनू प्रमाणें अलौकिक असणार.

१८९ ॥ ३ ॥ पाल्यास जतन केलें असतांना ( प्रांतीं ) शेवटीं धान्य, फळें येतात.

१९० ॥ ५ ॥ मोहाच्या ओघानें मन चालत असतें. ओहोळ गंगेला मिळतात ह्मणून गंगा परतेल काय ?

१९१ ॥ ३ ॥ स्वादी–पारखी. तुका ह्मणे जो खोटा तो खात्रीनें नागवलाच आणि शेवटीं तो अपमान पावणारच.

१९८ ॥ ४ ॥ आमचा उपदेश ऐकिला असतां बरें घडेल. हा चांगला माल भरला कीं, तो देशोदेशीं सर्व ठिकाणीं कौतुकानें चालेल.

२०५ ॥ २ ॥ लोलुपता काय—काय उपयोगाची.

२१० ॥ ५ ॥ करुणा भाकणें हें माझें काम तें मी करीन. ज्याची जशी वासना तसें त्याला फळ.

२१३ ॥ १ ॥ वेषाला बोल नाहीं, अवगुणांला दोष. दुसरा वीराचे अलंकार घालतो, त्यांचे भार वहातो; परंतु त्याला शूराचा मान मिळेल काय ?

२१४ ॥ ४ ॥ शांतीचें बळ क्षमा ती अंगीं असलीं ह्मणजे अंतर शीतळ रहातें.

२१५ ॥ २ ॥ व्यभिचार–कर्तव्यांतर, कर्तव्य टाकून इतर काम करणें ॥ ३ ॥ हेंच खरोखर अभाग्य, विश्वास मूळ आणी-- विश्वासाला बोलावणें पाठवून तो आण.

२१८ ॥ २ ॥ महाबुद्धीचा लाभ जोडो. महात्मेपणाचा लाभ घडो. ॥ ३ ॥ ( दुसरा अर्थ ) अंतर्यामीं जी ईश्वरी ज्योत आहे ती सत्यसंकल्पा (साठीं) करितां, शुद्ध हेतू करितां–उजळा. तुका ह्मणे मनीं कांहीं वाऊगें न टेवितां शुद्ध भाव राखावा.

२१९ ॥ ४ ॥ ज्यांचें निजधन नारायण ते आमचे सोयरे.

२२० ॥ ३ ॥ जो सांगडीचा ताफा दुखवी तो बुडे. ॥ ४ ॥ जेव्हां दैव फिरतें तेव्हां वाईट गोष्टी घडून येतात.

२२१ ॥ ४ ॥ भजन करूं किंवा नको, हा मजला दोन्हीकडून संशय उत्पन्न झाला आहे. कारण भजन करूं लागलों तर पंडित छळतील, बरें न करावें तर मी बुडतों.

२२३ ॥ २ ॥ भिन्न भावना मुंडाव्या—नाहींशा कराव्या.

२२४ ॥ ३ ॥ धांवा–बळद्--बळदांत आणि पेंवांत शिरल्यानें त्या ठिकाणीं सिद्धि प्राप्त होतील काय ? ॥ ५ ॥ वर्णाश्रमाचे धर्म पाळतांना संकट वाटलें तर ते व्यर्थ होतात. ॥ ६ ॥ सोंग हा एक पाशच आहे.

२२६ ॥ २ ॥ आकाशाची वास—वाट पाहे ॥ ४ ॥ तुझ्या चरण कमलांच्या योगानें सर्व फळें मिळतात.

२२८ ॥ २ ॥ सुख वर्मीच बीजाचे ठायींच दुखवितो.

२३१ ॥ ४ ॥ मनाचे आवेग सहन कर. तुका ह्मणे हें वर्म थोडें आहे.

२३३ ॥ ४ ॥ आपणांस वाटतें तें वेडें. परंतु तें आहे तसेंच आहे, वेडें नाहीं. वादें—वितंड वादानें.

२३४ ॥२॥ हत्तीचें पोषण करण्याचा भार मुंगीवर घातला तर ती गोष्ट घडून येईल काय ? पारध्याजवळ फांसे, जाळीं व कुऱ्हाडी हीं असतात परंतु प्रसंग पाहून तो तीं उपयोगांत आणतो.

२४२ ॥ ३ ॥ श्रेष्ठ व कनिष्ट वर्णाच्या लोकांकरितां भूमि वेगळाली केली आहे काय ?

२४७ ॥ १ ॥ जेथें चित्त साक्षी आहे तेथें लौकिकाची काय तमा. आपल्याच ठिकाणीं आपलें स्वहित आहे. ॥ ३ ॥ शुद्ध भावाला पाल्हाळ किंवा खुलाला नको. जें खरें तें दुसऱ्या ठिकाणीं तेव्हांच उमटतें. भाट--स्तुतिपाठक.

२५६ ॥ ४ ॥ ज्याच्या नांवानें मान्यता पावले ते भले.

२७३ ॥ १ ॥ पूर्व--आदि--ब्रह्म स्थितीची अनओळख ह्मणजे ओळखीचा आभाव हेंच मरण. त्या मरणापासून जगविणारें नामामृत होय. ( २ ) नामामृत जीवन जरी पावे तरी मरण जें तेंच पूर्वानुओळख. पूर्वीची ओळख.

२७६ ॥ १ ॥ तुझें श्रीमुख पाहतां सुख सुख पावलें.

२७७ ॥ सागराचें दर्शण झालें कीं ओहोळ सागरच होतो.

२८८ ॥ १ ॥ जे ज्ञानी आहेत त्यांच्या घरीं देवाचा शोध केला असतां तेथें अहंभाव पाठ पुरवितो.

२९१ ॥ १ ॥ अंधळ्याचे श्रम शिकविल्यावांचून व्यर्थ. जो जो त्याला शिकवितो त्याचेंच नांव होतें.

२९८ ॥ ४ ॥ पायांना चलन आहे ते पुष्कळ ठिकाणीं फिरवितात. तरी तुझ्या चिंतनाचा आळस घडूं नये.

२९९ ॥ ५ ॥ आह्मी दुर्बळ चुकलेलों आहों असें वाटतें.

३१० ॥ ३ ॥ बहुतांची बहुत प्रकारचीं सोंगें केलीं. बहुत काकुळती येऊनियां तुका निकट वृत्ति झाला. त्यानें जवळ येण्याचा प्रयत्न चालविला.

३२० ॥ २ ॥ ह्या भाग्यानें जिंकलेला असो. ह्या भाग्याचा मला सदा लाभ असो.

३३५ ॥ ४ ॥ नर नारी किंवा कोणी कोणत्याही जातींचे असो त्यांनीं नारायणाचा एकविध प्रेमानें धांवा करावा.

३५० ॥ १ ॥ मर्मज्ञ लोकच हे घेतात. याची कदर त्यांनाच आहे. हे टांकसाळींतून विपुल भराभर निघणारें नाणें नव्हे.

३५२ ॥ २ ॥ आह्मांला त्या रोग्यांची अशी कोणती सलगी किंवा भीड आहे कीं भलत्यांला भलतें औषध देऊन त्यांची विटंबना करावी किंवा कुपथ्य होईल असें करावें, रोग्यांच्या कला प्रमाणें बोलण्याची आह्मांला काय गरज ?

# कठिण शब्दांचा कोश.

अ.

अंगें–स्वतः
अघोर–भयंकर
अणु–अल्प, थोडें
अंतर–चित्त, अंतःकरण
अंतरंग–मन
अंतराय–वियोग, विघ्न
अतित्याई–माहित असून वाईट काम करणारा, घातक,
अधम–नीच
अनामिक–महार
अनुचित–अयोग्य
अभिलाष–दुसऱ्याची वस्तु हरण करण्याची इच्छा
अमित–पुष्कळ
अवकळा–तेजोहीनपणा
अवगुण–वाईट गुण
अवसानीं–शेवटीं
अनर्गळ–स्वच्छंदी, निष्प्रतिबंध
असार–खोटें
अहंता–मीपणा
अक्षर–विद्या

आ.

आगळा–अधिक, मोठा
आगम–शास्त्र
आचावाचा–बडबड
आटी–खटपट, तुटी
आणिक–दुसरा
आर्त–उत्कट इच्छा
आतळणें–जवळ येणें
आवांका–अवसान, बळ
आतुडणें–प्राप्त होणें.
आधिव्याधि–षड्रिपु
आन–दुसरा
आपसया–आपोआप
आपंगिता–सांभाळणारा
आमिष–पशुपक्षी धरण्याकरितां सांपळ्यांत किंवा गळास भक्ष्य लावून ठेवतात तें.
आराणूक–शांति, सौख्य
आरुष–आर्ष–असमंजस, छांदिष्ट
आहाच–वरवर
आळवणें–आर्जवानें खुष करणें

उ.

उगलें–उगें, शांत
उचित–योग्य
उक्ती–भाषण
उदास–निराश, निस्पृह
उद्वेग–अस्वस्थपणा, त्रास
उपाधी–त्रास, दुःख जनक गोष्टीचा संसर्ग
ऊर्मी–मनाचा आवेग
उरी–बाकी, ठाव, भीड, भेद
उसंतणें–शेवटास नेणें, आटोपणें

ए.

एकविध–अनन्य, एक प्रकारचा

क.

कइवाड–कैवाड–युक्ति, कारस्थान
कंकर–खडा
कंटक–कांटा, दुष्ट
कल्लोळ–मोठी लाट

५—५९१—१५००

करवाडें–कडवा
कपाट-दार
कनक–सोनें
कल्प-दीर्घकाळ
कव–मिठी
काई–काय
काज–काम, कारण
काम–इच्छा, मदन
कामारी–सेवक, चाकर
काळ–वेळ, मृत्यु, यम
कुचर–न भिजणारा २ खोटा
कुडा-कुडी–वांकडा
कुमुदिनी–चंद्रविकासी कमळ
कुसरी–कौशल्य
कूट–निंदा
कुंभिपाक–एक नरक तेथें पातक्याला मडक्यांत घालून शिजवितात
कैं–केव्हां
कैंचा–कशाचा
कैवल्य–मोक्ष
कोड–कौतुक, आवड, लाड.

## ख.

खळ–दुष्ट, दुर्जन
खाणी–योनी.

## ग.

गव्हार–मुर्ख
गांढें–दुर्बळ
गाढ–दृढ
गात्र–शरीर, अवयव
गांदलें–खचून भरलेलें, कोंदलेलें
गावाळ–केरकचरा, बाजारबुणगा
गुज–गुह्य
गुंडून–गुंढाळून
गुमान–पर्वा, तमा,
गोठी–गोष्ट
गोमटें–चांगलें
गोऱ्हवाडी–गुखाडी
गोवा–गुंता
गोहो–नवरा
ग्वाही–साक्ष

## च.

चर्म–कातडें
चांग–चांगला
चाड–गरज, आवड
चार–चेष्टा
चावटी-वाचाळपणा
चाळवावें–नादीं लावावें
चिंतामणी–स्वर्गांतील एक रत्न कीं ज्याच्या योगानें सर्व सिद्धि प्राप्त होतात
चिरा–दगड
चोख–चांगला
चोज–कौतुक
चोजविणें–शोधकरणें, उल्हासानें जाणें.
चोहटा-चव्हाटा
चौऱ्यायशी–चौऱ्यायशी लक्ष योनी

## छ.

छळ–गांजणूक

## ज.

जडभारी–संकट
जति–यति, संन्यासी

जनाचार–लोकाचार, पंचाईत
जन–लोक
जलचर–पाण्यांत रहाणारे प्राणी
जाच–गांजणूक, त्रास
जाणीव–अहंपणा पंडितंमन्यता ज्ञानमद
जार–गर्भ वेष्टण
जिणें–वांचणें, जीवन
जिणावें–जिंकावें
जिवलग–प्राणप्रिय
जिव्हार–अंत:करण, बीज
जिव्हाळा–जिवंत झरा
जेवीं–जसें, जेव्हां
जैं–जई–जेव्हां
जों–जोंपर्यंत
जोगी–गोसावी
जोडे–मिळे
जोड / जोडी –संपादणी, ठेवा.

### झ.

झणें–झणीं–लवकर, नाहीं
झोटी–शेंडी, केश

### ट.

टाकणी–ठाकणी, ठिकाण
टोंकणें–चित्त, मन लावणें

### ठ.

ठकलीं–चुकलीं
ठाय–ठाव–ठिकाण, जागा
ठावें–माहित आहे

### ढ.

ढेंपर–व्रण

### त.

तई–तेव्हां
तन–तृण, गवत
तंव–तोंपर्यंत
तांतडी–घाई
तिमिर–अंधार
त्राण–रक्षण
त्रिविध–तीन प्रकारचें

### थ.

थडी–तीर
थार–आश्रय
थिटें–लहान
थिता–थीत–वांया, व्यर्थ, खात्रीचा, निश्चित,
थिंकणें–खेद, दु:ख करणें
थिल्लर–डबकें
थोडका–लहान
थोरी–थोरीव–मोठेपणा

### द.

दर्पण–आरसा
दर्दुर–बेडूक
दंभ–अहंकार
दुम–धुम
दुस्तर–खडतर

### ध.

धणी–समाधान, तृप्ती, चंगळ
धाणें–तृप्त होणें
धीर–उशीर, दम
धुनी–धुणारी

### न.

नवणीत–लोणी
न मनी–न मानी, जुमानित नाहीं

नळी–नरडी
नागवणें–लुबाडणें
नाड–विघ्न, दगा
नातळतां–न मिळतां
नातुडे–न मिळणें
नाणी–आणूं नको
नाहो–नवरा
निकें–नेटकें, खरें, चांगलें
निखळ–शुद्ध, निव्वळ
निगम–वेद
निजबोध–आत्मज्ञान
निधान–स्थान
निंब–औषध
निंब देणें–औषध देणें
निरंजन–गुणी गुणातीत स्थिति, अलिप्त स्थिति
निर्दाळणें–नाहींसें करणें
निर्भर–पूर्ण
निरवणें–सोंपवणें
निरय–नरक
निरें–शुद्ध
निरुतें–खरें, चांगलें
निर्वाणीं–अंतीं, शेवटीं
निःसंग–निसंग
निरोधणें–आडविणें, प्रतिकार करणें
निवती–संतोष पावतात
नुमजे–न उमजे
नुरे–न उरे
नेणे–न जाणें
नेघे–न घे, घेत नाहीं
नैश्वर्य–नाशवंत

## प.

पंचानन–सिंह
पतंग–एक पाखरूं
पर–दुसरा
परमपद–श्रेष्ठ स्थिति
परता–पलिकडे
परावा–दुसरा
परि–परंतु
परी–प्रकार, स्थिति, गत
परिचार–सेवा
परिस–एकेप्रकारचा दगड ज्याच्या योगानें लोखंडाचें सोनें होतें.
परिसावी–ऐकावी
पवसी–पावसी
परिहार–खुलासा, विवेचन
परमाई–वीरमाता
प्रतिग्रह–दान
पाईक–सेवक, चाकर
पाक–शुद्ध, स्वयंपाक
पांग–पराधीनपणा
पाखर–करुणा
पाणचोरा–भोंकाचा घट, मडकें
पाणोवाणी–पाठोपाठ
पामर–गरीब, दीन
पायवणी–तीर्थ
पायरिका–पायरीच्या
पार–सीमा, अंत
पिशुन–चहाडखोर
पींड–शरीर
पीयूष–अमृत
पुढती–पुनः

क्र. १०१(५४3)

पुढीलांचे–दुसऱ्यांचे
पुस–पुच्छ
पृथक्-वेगळा
पेणावलें-उठवणीस आलेलें
पेसपाड–डांवपेंच
पें–पाशीं, कडे
पैल–पलीकडे
पोभाळणें–चोळणें

**फ.**

फिका–निस्तेज
फुका–व्यर्थ, फुकट
फुंदणें–डौल करणें
फोल–व्यर्थ

**ब.**

बक–बगळा, ढोंगी
बडिवार–थोरवी
बराडी–भिकारी
बहुवस–पुष्कळ
बापुडा–दीन, गरीब
बाहणें–बोलावणें
बांदवडी–बंदीजन
ब्रीद–बाणा
बुझावणें–समजावणें
बोभाट–बभ्रा
बोहरी–नाश

**भ.**

भव–संसार
भरोवरी–सामुग्री
भाकणें–मागणें, विनंति करणें
भाक–वचन
भागास–नशीबीं
भांड–वाच
भातुकें–खाऊ
भाव–भावना, श्रद्धा
भार–समुदाय
भीतरी–मध्यें
भे–भेव–भय
भेष–वेष
भोग–विषयसेवन
भोरपी–बहुरूपी

**म.**

मईद–मैंद–ठक
मंडण–भूषण, शोभा
मद्य–दारू
मवाळ–मऊ
मशक–घुंगुरडें
महिमा–महत्व
मळ–पातक
मात–गोष्ट
माती–देह ( अलंकारिक )
मायिक–दांभिक
माव–माया
मागुती–पुनः
मांदी–समुदाय, मेळा
मित–थोडें
मिनणें–मिळणें, ऐक्यपावणें
मीन–मासा
मीस–सोंग
मुक्ताफळ–मोतीं
मुद्रा–चिन्ह
मुद्रांकित–दास
मूळ–बोलावणें, आमंत्रण
म्हूण–ह्मणून
मोकलणें–सोडणें

मोहरा–सर्पाच्या डोक्यांतील म[illegible]
णि,औषधी-मणि,ज्या मण्या[illegible]
वर सूत गुंडाळून तो अग्नी[illegible]
टाकला असतां सूत जळ[illegible]
नाहीं

य.

याग–यज्ञ
याचक–भिकारी
याति–जात
येह–इह, ह्या
येर–अन्य, दुसरा
योग–संग, प्राप्तकाल
योगक्षेम-मिळविणें व रक्षण क–
रणें, निर्वाह

र.

रंक–भिकारी
रंग-वर्ण
रज–कण
रत्नाकर–समुद्र
राऊळ–देऊळ
रासभ–गाढव
रितें–रिकामें
रिद्धिसिद्धि-सर्व प्रकारच्या इच्छा
तृप्त करणाऱ्या सिद्धि
रुचि–गोडी, चव
रोकडें–खरोखर

ल.

लंड–पुंड, लबाड
लडिवाळ–लाडकें
लवण–मीठ, नम्रता
लवलाहे–लागलींच, त्वरेनें
लहरी–लाट
लाधणें–मिळणें
लापनिक–वरवरचें, वरपंग
लाहे–मिळे
लाहो–छंद
लाहाणें–पावणें, मिळणें
लिगाड–लचांड
लीन–नम्र
लिंपें–शिवें
लोलुपता–लंपटपणा
लोह–लोहो–लोखंड

व.

वंचणें–फसविणें,
वजणें–जाणें
वरपंग–बाह्यरंगाची, वरवर
वर्ण–रंग, जाति
वर्णूं-वाणूं, स्तुति करूं
वक्ता–उपदेशक
वर्म–गुह्य, तत्व
वरो–वरी–पुष्कळ
वा–अथवा
वाटुली–वाट
वाद–वितंडवाद
वाव–वाउगें–वृथा, व्यर्थ
वाहाळ–ओढा
वाघुरा–जाळें, फासा
वाडें कोडें-कौतुकानें
विटंबना–निर्भत्सना, दुर्दशा
विटणें–खिन्न होणें
विनवणी–विनंति
विना–वीण–शिवाय, वांचून
विपरीत–भलता
विपिन–अरण्य

विषय–काम क्रोध, लोभ, वगैरे
विरोध–आड येणें, द्वेष
वृंदावन–कवंडळ, कडूफळ
वेचणें–खर्च होणें
वेवसाव–व्यवसाय, धंदा
वेशी–मार्ग
वेल्हाळ–प्रिय
वैकुंठ–विष्णु लोक
वैखरी–वाणी
वो–हे, अहो
वोखटा–वाईट
वोज–पात्रता, अधिकार
वोडवणें–सादर करणें, अर्पण करणें
वोसंडावें–वर्षाव करावा
वोरसणें–स्नेहभरित पान्हायेणें
वोळसा–चटक
व्यवसाय–उद्योग, धंदा

### श.

शठ–ठक
शर्त–पराक्रम
शूकर–डुक्कर
श्रुति–वेद

### स.

सकळ–सर्व
संकल्प–हेतु, इच्छा
संडी–सांडी, सोडी
सतंत–स्वतंत्र
सति–नवऱ्याच्या शवा बरोबर आपणास दहन करून घेणारी स्त्री. साध्वी स्त्री
संदेह–संशय
संपादनी–वतावनी
सम–बरोबर
सर–सरी–बरोबरी
सरसा–बरोबर
सरणें–चालणें, लागूं पडणें
सरता–आखेरचा, अधिक
सवा–कडे, कडून
सवें–बरोबर
सर्वथा–सर्व प्रकारें
साकडें–संकट
सांगडी–नाव
सांगातें–बरोबर
साच–खरें
साचार–खरें
साटी–बदला, संगतीनें
सांडी मांडी–खटपट उठाठेव
साधक–ज्याला कांहीं साध्य करून घ्यावयाचें तो.
साधन–अभ्यास, ज्या योगानें इच्छित प्राप्त होतें तें
सान–लहान
सायास–श्रम
सार–तात्पर्य, तत्व
सावकास–यथेच्छ
सावज–जनावर
साहे–सहन करी
सिंचणें–सिंपडणें
सिंधु–समुद्र
स्फिती–डौल, गर्व
सीण–त्रास, रोग
सुदर्शन–देवाच्या हातांतील चक्र
सुनें–कुत्रें

सोई–सोय
सोस–हांवरेपणा
सोयरिया–जिवलग, सोयरा
स्नेहवादें–स्नेह ह्मणून

## ह.

हव्यास–छंद
हरी–नाहींसे करी
हर्षामर्ष–आनंद व राग
हाट–बाजार
हातवटी–हातोटी
हारपले–हरवले
हाव–आटोक्या बाहेरची गोष्ट
मिळण्याची इच्छा
हिंपुटी–कष्टी, दुःखी
हेंगे–इकडे
हेवा–दुसऱ्याची वस्तु आपणास
असावी ही इच्छा

## क्ष.

क्षर–नाशवंत
क्षीर–दूध, खीर
क्षोभलें–संतप्त झालें

# शुद्धिपत्र.

| पान. | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | २१ | कंठी | कंठीं |
| २ | १५ | खडकचें | खडकाचें |
| ३ | १३ | वालोनेणें | वोलों नेणे |
| ६ | ३ | नेणें | नेणे |
| ७ | ६ | सर्पींण | सर्पांण |
| ९ | २ | देशोर्शी | देशोदेशीं |
| १० | १९,२१ | गांठींचे, गांटी | गांठींचे, गांठीं |
| ११ | १० | कैसे | कैसें |
| १२ | २३ | विर्मुलन | निर्मुलन |
| १३ | १२ | पांडुंग | पांडुरंग |
| १५ | २१ | टिरी | टिरी" |
| १७ | ७ | ह्मणें | ह्मणे |
| १८ | २० | अपणांसी | आपणांसी |
| २० | २,१३ | जातीं, मोढून | जाती, मोडून |
| २२ | १० | धरीं | धरी |
| २३ | ९ | त्रिभुयन | त्रिभुवन |
| २४ | १ | संन्निपात, | सन्निपात, |
| ३६ | ५ | निवडीं | निवडी |
| ३४ | ५ | नेणें | तेणें |
| ३५ | ७ | साधण | साधन |
| ३७ | ४ | सांहूं | सांडूं |
| ३९ | ४,११ | तेथे, * लावितां | तेथें, लाविती |
| ... | १७ | वरव | बरवें |

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४२ | १७,२४ | वोझें, (टीप)आनंदांत, | ओझें,क्रोधांत व आनंदांत |
| ५० | ३ | लोकांशीं | लोकांतीं |
| ५१-५२ | २१,१ | नेणें | नेणे |
| ५२ | १४ | अविश्वास | विश्वास |
| ५९ | २३ | स... भाव | साच भाव |
| ६२ | १ | विठ्ठलाचें | विठ्ठलाचे |
| ६५ | १९,१८ | भलत चंद | भलते, चंदन |
| ६६ | २१ | डोळियांचीं | डोळियांची |
| ७१ | ६,२२ | कधी, तुह्मासी | कधीं, तुह्मांसी |
| ७२ | १ | जाणा | जाणां |
| ८० | ८ | पंढरीराजें | पंढरीराजे |
| ९१ | ११ | पाठविते | पावविते |

* हा मूळ गाथेंतील शब्द वर दर्शविल्याप्रमाणें वाचला असतां अधिक बोधप्रद होईल.

# अभिप्राय.

रा० अनंत सखाराम आठल्ये. बी. ए. प्रिन्सी० आर्यन. ए. सो. हायस्कूलः—वेंचें फार मार्मिकपणाणें काढलेले असून सुबोध आहेत. हे वेंचे वाचून तुकारामाच्या कवित्वाची कल्पना फार चांगली होईल. शेवटीं जोडलेल्या कोशामुळें पुस्तकाची उपयुक्तता फार वाढली आहे. शाळेंत लावण्याकरितां योग्य वेंच्यांची हल्लीं भासून येणारी वाण ह्या पुस्तकानें भरून येईल ह्यांत संशय नाहीं. मुलां मुलींनाच नव्हे तर सामान्य वाचकांनासुद्धां आपण ह्या पुस्तकाच्या रूपानें करमणुकीचें व ज्ञानप्राप्तीचें साधन करून ठेविलें आहे.

रा. वामन रामचंद्र जोशी. बी. ए. अध्यायक आर्यन. ए. सो. हायस्कूल—* * रा. वावीकर ह्यांची व मराठी वाचकांची ओळख बरीच जुनी आहे व त्यांचा स्वभाषा व्यासंग स्तुत्य आहे. प्रस्तुत पुस्तक फार मेहनतीनें तयार केलें आहे. अभंगाची निवड काळजीपूर्वक केलेली असून पुस्तकाचे शेवटीं कठिण शब्दांचे अर्थ दिले आहेत. धार्मिक विषयांवरील लेखक व वक्ते ह्यांनाही या पुस्तकाचा हरप्रसंगीं उपयोग होऊन गाथेंतून स्वतः अभंग शोधण्याचे त्यांचे श्रम वांचतील.

रा० एकनाथ गणेश भांडारेः—मुलांमुलींना हे ' निवडक अभंग ' फारच उपयुक्त होणार आहेत. त्यांची मनोवृत्ति उच्च, प्रगल्भ, धर्मशील, व ईशसेवानिरत होण्यास आपलें पुस्तक फार चांगलें साधन आहे. नीति शिक्षणाचा अभाव आमच्या सरकारी व कांहीं खाजगी शाळांतून बराच दिसून येतो. करितां ती उणीव भरून काढण्याचें जर सरकारानें मनावर घेतलें तर अशा पुस्तकास

शाळाखात्यांकडून उत्तेजन मिळणें अवश्य आहे, असें मला वाटतें. तुकारामाच्या अभंगांचे वेंचे निवडण्यास आपल्याला बरेच श्रम पडले असले पाहिजेत, कारण निवडकपणांत आपली मार्मिकता, सहृदयता, व सारासार विचारशक्ति ठिकठिकाणीं दिसून येतात. सारांश, प्रत्येक मुलामुलीचे हातीं देण्यास हे वेंचे सर्वथैव पात्र आहेत, अशी माझी ठाम समजूत आहे.

---

**श्री० पार्वतीबाई आठवले. अनाथबालिकाश्रम पुणें**—* * अभंग वाचून पहातां आपण ते फार श्रमपूर्वक व काळजीनें निवडिलेले आहेत. विषयवार मांडणी कल्यामुळें पुस्तक अति उपयुक्त झालें आहे. मुलांमुलींना हें पुस्तक अत्यंत उपयुक्त होईल ह्यांत संशय नाहीं. त्यांनीं हे अभंग पाठ केले व त्यांचें मनन केलें तर ते परोपकारी, कर्तव्यदक्ष, सन्मार्गवर्ती व पापभीरु निघतील, ईश्वराच्याठायीं त्यांची श्रद्धा राहील, यांत संशय नाहीं.

---

**श्री० कु० काशीबाई नवरंगे. बि. ए. एल्. एम्. ॲंड एस्**—* * * तुकोबाची गाथा आमच्या मुलांच्या हातीं दिल्यास कोणते अभंग वाचून आपणांस फायदा होईल, हें त्यांस कळणें शक्य नाहीं, ह्मणून मुद्दाम त्यांच्याकरितां तयार केलेल्या वेंच्यांची फार उणीव होती. आपलें पुस्तक ही उणीव बऱ्याच अंशानें भरून काढील असें मला वाटतें. आपण अभंगांची निवड फार काळजीपूर्वक केली असून आमचीं मुलें जर हे अभंग मुखोद्गत करतील, प्रत्येक अभंगाचा अर्थ आपलीं मातापितरें, शिक्षक किंवा आप्त ह्यांच्यापासून नीट समजून घेतील व ह्यांतील उपदेशानुसार आचरण ठेवण्याचा प्रयत्न करतील तर तीं श्रद्धाळू, शुद्धाचरणी, नम्र व कर्तव्यदक्ष अशीं निपजतील, यांत कांहीं संशय नाहीं.

---

REFBK 0000543

REFBK-0000543